रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, २५ फेब्रुवारी २०२४




# राहुल गांधींना आवरा

आधुनिक केसरी

**लोकसभा निवडणूक २०२४ ही काँग्रेस पक्षासाठी परीक्षा आहे.दुर्देव राष्ट्रीय पक्ष असलेला काँग्रेस पक्ष स्वबळावर निवडणूक लढवित नाहीये! तो प्रादेशिक पक्षाच्या कुबड्या घेवून भाजपा व मोदी विरोधात राजकीय लढाई करण्यास निघालेला आहे.काँग्रेस पक्ष दुबळा होण्यास गांधी परिवाराचे नेतृत्व कारणीभूत आहे.त्यात राहुल गांधी हे नेहमी वादग्रस्त विधान करत असतात,यामुळे पक्षाचे नुकसान होईल,याचेही ते भान ठेवत नाही.मोदींना चोर,पनौती,पाकीटमार आदी शिव्यांची लाखोळी वाहत असतात.आता तर त्यांची पंतप्रधान मोदींची जात काढण्यापर्यंत मज्जल गेली आहे. तीर्थक्षेत्र काशीला "नशेबाज' म्हंटले.यातून गांधी परिवारराचे नैराश्य दिसून येते.**

लोकसभा २०२४ च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला फायदा होईल,या अपक्षेने नेते राहुल गांधी यांची भारत जोडो,न्याययात्रा काढली गेली या यात्रेचे भारत जोडो,न्याय यात्रा या घोषवाक्य फसवे आहे.यात्रा निमित्त आहे,यात पक्षाचा प्रचार,भाजपा,मोदी व आय.एस.एस ला शिव्या देणे, या शिवाय दुसरा कार्यक्रम नाही. देशात व्देषाचे वातावरण निर्माण केले गेले,म्हणायचे आणि स्वतः मात्र व्देषमुलक वक्तव्य देशभर फिरत यात्रा काढली जात आहे. यात्रेतून काँग्रेस हा दलित व ओ.बी.सी मुस्लिम "व्होटबँक' पुन्हा जोडण्याचा खोटाटोप करत आहे.काँग्रेस सत्तेत असताना अन्याय करत आला आहे.आता न्यायाची भाषा करत आहे. मणीपूरला जळतोय ते पंतप्रधान जात नाहीत.मग पश्चिम बंगाल मधील संदेशखाली हिंसाचार, दहशत, महिलावर अत्याचार,चालू असताना गांधी तेथे का जात नाहीत?भाजपा राज्यात महिलावर अत्याचाराची घटना घडली की,गांधी परिवार पर्यटन यात्रा काढत असतो. गांधीच्या भारत जोडो यात्रेनंतर काँग्रेसने राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड ही तीन मोठी राज्य गमावली आहेत.आता इंडी आघाडी असताना गांधींनी ईतर पक्षाला सोबत न घेता न्याय यात्रा काढली. त्यामुळे प्रादेशिक पक्षाचा काँग्रेस पक्षाला विरोध सुरु झाला. दिवसेदिवस काँग्रेस पक्ष कुमकुवत चाललेला आहे,पक्षातील अनेक निष्ठावंत व मोठी नेते पक्षाला सोडून जात आहेत.प्रादेशिक पक्षानाही काँग्रेस पक्ष नको आहे,म्हणून तर जागा वाटपात काँग्रेसला दुय्यम स्थान देत आहेत.काँग्रेस पक्षावर प्रादेशिक पक्षाशी जागेसाठी मनधरणी करण्याची दुर्देवी वेळ आलेली आहे. देशात लोकसभेच्या सर्वात अधिक ८० जागा असलेल्या,उत्तर प्रदेशात आहेत, तेथे सपा नेते अखिलेश यादव यांनी स्वतः कडे ६३ जागा तर काँग्रेसला केवळ १७ जागा दिल्या.काँग्रेसने त्या जागा नाक मूरडत स्विकारल्या व समाधान मानात आहेत! सपा काँग्रेस पक्षाचा हा समझौता प्रियंका वाड्रांनी घडवून आणला, असे सांगितले जात आहे.श्रीमती वाड्रा यांनी पक्षात चर्चा न करता एकतर्फी निर्णय घेतला आहे.त्यामुळे पक्षाला मोठा फटका बसणार आहे.

**काँग्रेसला बहुमत मिळणे अशक्य!** आम आदमी पक्षाचे केजरीवाल यांनी घेत काँग्रसशी मैत्री करणार नाही म्हणून मुलाची शपथ घेतली होती काँग्रेसवर भ्रष्टाचाराचे आरोप करणारे काँग्रेसशी राजकीय आघाडी करत दिवाळी साजरी करत आहे.यासर्व जागा वाटपात काँग्रेसला वाट्याला कमी जागा येतील,मग काँग्रेसला बहुमत मिळेल याची शक्यता मावळी आहे.




कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

काँग्रेस पक्षात गांधी परिवारावर सल्याने चालतो हा परिवार त्यांचे श्रध्दास्थान,प्रेरणास्थान आहे.इतर पक्षाही कार्यकर्त्यांचे नेता श्रध्दा!प्रेरणास्थान आहेत! यामागे त्या नेत्याचे कर्तृत्व, त्याग, सेवा, आदर्श विचार म्हणून.मोदी यांचे नेतृत्व देशाने नव्हे,जगाने मान्य केले आहे.मग मोदी सरकारच्या कार्याची स्तुती करणारा मोदीभक्त' म्हंटले जाते! खर तर श्रध्देला कर्तृत्वाची जोड असावी लागते!तरच जग 'सलाम'करते! मग या गांधी परिवाराचे कर्तृत्व काय? श्रीमती सोनिया गांधी व राहुल गांधी यांचेकडे राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे अध्यक्षपद अनेक वर्षे होते.या नेतृत्वाने पक्षच रसातळाला नेला! २०२४ ची लोकसभा निवडणूक ही काँग्रेस पक्षाच्या अस्तित्वाची लढाई आहे.


काँग्रेस पक्षाकडून भाजपा हा दलित ओ.बी.सी. शेतकरी विरोधी असल्याचा आरोप केला जातोय !त्यात बेरोजगारी व महागाईचे तुणेतुणे वाजविले जाते.पण राजकीय पक्षातील वाढत्या भ्रष्टाचारावर ते बोलणार नाहीत.कारण त्यांचे इतर पक्षाशी राजकीय हितसबंध गुंतलेले आहेत. येत्या लोकसभा निवडणुकीत जनतेसमोर काँग्रेस पक्षाचे कोणते प्रश्न घेवून जाणार आहे? पक्षाकडे कोणताही कार्यक्रम नाही.पण आम्ही सत्तेत आलो हे देऊ ते देऊ असे छपरफाड आश्वासन दिली जात आहेत. पण काँग्रेसवर जनतेचा विश्वास राहिलेला नाही.भाजपाला दलित,ओ. बी.सी.व शेतकरी विरोधी म्हंटले जाते,तर मग काँग्रेस पक्षाने पहिल्याच निवडणुकीत घटनाकार डॉ. आंबेडकर यांचे विरोधात उमेदवार उभा का केला? तत्कालिन पंतप्रधान नेहरू यांची आरक्षणाच्या विरोधात होते,या पुरावा म्हणून नेहरुंचे पत्र पंतप्रधान मोदी यांनी संसदेत वाचून दाखविले. इतकेच नव्हे, पं.जवाहरलाल नेहरू (१९५५) व श्रीमती इंदिरा गांधींनी (१९७१ ) मध्ये पदावर असताना स्वतः ला भारतरत्न पुरस्कार घेतला. पण काँग्रेसने डॉ. आंबेडकर व शेतकरी नेते चौधरी चरणसिंग यांना मात्र भारतरत्न पुरस्कार देण्याचे टाळले.ओ.बी.सी समाजाला न्याय देणारा मंडल आयोग काँग्रेस सरकारने लागू केला नाही.यावरुन काँग्रेस पक्षाची दलित व ओ,बी.सी.विरोधी मानसिकता दिसून येते.काँग्रेस सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे देशात शेतकर्‍यांच्या आत्महत्या सत्र सुरु झाले. तेंव्हा काँग्रेस सरकारला याची चिंता केली नाही.या सरकारने तर शेतकरी कर्जमाफीच्या नावाखाली बुडीत बँकेच्या तिजोर्‍या भरल्या! काँग्रेस राजवटीत बेराजगारी व महागाईने कळस गाठलेला होता.त्यावेळी 'महागाईवर'चे अनेक गाणे गाजली.शेतकरी हिताचा स्वामीनाथन आयोग गुंडाळून ठेवला.या सर्वच आघाड्यावर काँग्रेस सरकार अपयशी ठरले. मतदार प्रत्येक निवडणुकीत काँग्रेसला नाकारतो आहे. भाजपा सरकारची दहा वर्षे व काँग्रेसची ५५ वर्षे याची तुलना जरुर केली पाहिजे आज काँग्रेस पक्ष गांधी परिवाराच्या नेतृत्वामुळे कमजोर होत आहे.त्यात पक्षाचे नेते राहूल गांधी बेतालपणे बोलण्याची भर पडत चालली आहे. आम्ही सत्तेत आलो तर जातीयगणना करू,असे म्हंटले आहे.पण पंडित नेहरू,श्रीमती गांधी व राजीव गांधी हे 'जातीयजनगणने"च्या विरोधात होते!यातून जातीयतता वाढेल,अशी तेंव्हा पक्षाची भूमिका होती.पण हे गांधी विस्तवाशी खेळत आहेत! दिल्लीच्या सीमेवर शेतकरी संघटनेच्या वतीने आंदोलन चालू आहे.यामागे निश्चतच राजकारण आहे. यात आम आदमीव काँग्रेस पक्षाचा चिथावणी आहे.पंजाबराज्यातून शेतकरी आंदोलनास निघाला असताना आम आदमी सरकारने त्यांना सीमेव रोकले नाही? शेतकरी दिल्लीकडे कूच करण्यापूर्वी गांधी यांनी हे अंबिकापूर येथे शेतकरी नेत्यांना भेटले,हे जयराम रमेश सांगितले आहे. यावरुन या आंदोलनाला फूस कोणाची हे लक्षात येते.निवडणुकीपूर्वी शेतकर्‍यांच्या नावावर राजधानीत मोठी घटना घडविण्याचा कट आहे. या आंदोलनात बुलडोझर,ट्रक्टर,पोकलेन, क्रेन,जेसीबी आदी मोठी मशिनांचा वापर केला जात आहे. तसेच महिनाभराचे,धान्य,इतर तर सर्व साहित्य घेवून जणू युध्दाला जावयाचेया तयारीने आंदोलनकर्ते आलेले आहेत.या आंदोलनाला पैसा व रसद कोण पुरवितो आहे? याचा शोध घेतला गेला पाहिजे.आंदोलनस्थळी ठिकाणी जेवण,चहा व दारूचेही वाटप होत आहे हे शेतकरी नाहीत,यामागे उपव्यापी नेत व मंडळी आहे.शेतकर्‍यांचे प्रश्न सुटले पाहिजे,यास विरोध नाही. लोकशाहीत आंदोलनाचा सर्वांना अधिकार आहे.पण आंदोलनजीवींना कर्तव्याचा विसर पडलेला आहे.या आंदोलनातून हिंसा दहशत , निर्माण करणे,सर्व सामान्यांना ठेवीस धरणे हाच उद्देश दिसतोय!.यात काँग्रेस नेते राहूल गांधी यांनी तर आम्ही सत्तेत आलो,तर शेतकर्‍यांना किमान आधारभूत किंमतीबाबत कायदा ( एम.एस पी.) करू"असे म्हणाले. त्यांचे हे वक्तव्य आगीत तेल टाकणारे आहे.काँग्रेस पक्ष ५५ वर्षे सत्तेत होता,तेंव्हात्यांचे हात कोण धरले होते. काँग्रेस सरकारने शेतकर्‍यांची सर्व आंदोलने चिरडून टाकली गेली, हजारो शेतकर्‍यांचा बळी घेतला. आता सत्ता गेल्यानंतर शेतकर्‍यांविषयी पुळका दाखवत आहेत.आज शेतकरी संघटनेच्या केवळ हमी भावाचा कायदा या एकाच मागणीचा विचार केला तर केंद्र सरकारवर दरवर्षी दहा हजार लाख कोटीचा बोझा व शेतकरी संघटनेच्या सर्व मागण्या मान्य केल्या तर सुमारे ४२ लाख कोटी रूपये लागतील! इतकेच नव्हे,महागाई वीस टक्यांनी वाढेल! असे अर्थतज्ज्ञांचे मत आहे. काँग्रेस राष्ट्रहिताचा विचार करणार आहे की नाही ?नेते राहूल गांधी बोलतात! तेच हे पक्षाचे धोरण आहे.हे अध्यक्ष खडगे यांनी जाहीर करून टाकावे.या शेतकरी आंदोलनात मोठी हिंसक घटना घडली तर त्याचा मोदी सरकारवर कलंक लागावा सत्ता येवू नये,हाच डाव आहे. स्व. शरद जोशी यांनी शेतकर्‍यांच्या प्रश्नावर अनेक आंदोलने केली!त्यांनी चर्चेतून प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. महात्मा गांधीनी हक्कासाठी सत्याग्रहाचा मार्ग दाखविला,हिंसेचा नाही. लोकशाहीत हिंसेला मुळीच स्थान नाही. हिंसक आंदोलनाने प्रश्न कधीच सुटत नाहीत.त्यासाठी संयम व चर्चेचा मार्ग स्विकारावा लागेल.याप्रमाणे महाराष्ट्रात आरक्षणाबाबत अशीच आडमुठी भूमिका घेतली जात आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या बेताल विधानामुळे स्वतःअडचणीत येत असतात!पण यामुळे पक्षाचे नुकसान होईल,याचे त्यांना भान नाही. २०१९ मध्ये त्यांनी 'मोदी आडनावाचे चोर कसे'असे विधान केले होते. यावरुन सुरत न्यायालयाने त्यांना दोन वर्षाची शिक्षा सुनावली होती. त्यांमुळे त्यांना लोकसभेचे सदस्यत्व गमावले होते.त्यांना सर्वोच्च न्यायालयात त्यांना दिलासा मिळाला! पण गांधी यांची वादग्रस्त विधाने करण्याची सवयच जडलेली आहे.त्यांनी पीएम म्हणजे 'पनौती' या हीन शब्दाचा वापर केला मोदी व शहा यांना 'पाकीटमारांचे उपमा दिली. आता तर ते ओ. बी.सी समाजाचे नेते नाहीत,म्हणून त्यांची तेली धांची जातीचे आहेत.१९९९ मध्ये गुजरातमधील १०४ जातीचा ओ.बी सी.मध्ये समावेश करण्यात आला आहे. त्यात मोदी यांची 'तेली धांची' समाज ३४ व्या क्रमांकावर आहे. राहुल गांधीच्या कैंब्रीज विद्यापीठाच्या प्रमाणपत्रावर "राउल विंसीं असे नाव असल्याचा दावा माजी खासदार सुब्रम्हण्यम स्वामी यांनी केला.त्यांच्या शैक्षणिक पात्रतेवर संशय व्यक्त केला आहे. तसेच सोनिया गांधी यांनी तर कैंब्रीज विद्यापीठात शिक्षण घेतले नाही,याबाबतची नेते स्वामी यांनी तक्रार लोकसभा सचिवाकडे केलेली आहे.प्रियंका यांचे पती ख्रिश्चन आहेत,मग त्या गांधी आडनाव का लावतात? गांधी परिवाराला नेहरूं आडनावाची घृणा आहे काय?.तेंव्हा मोदी यांचेकडे अंगलीनिर्देश करण्यापूर्वी त्यांनी स्वतःच्या चार पहावे.गांधी यांनी जर पंतप्रधान मोदी यांची जात काढून त्यांची इज्जत काढू शकतात!तर.मग राहुल गांधी किस झाड पत्ती!म्हणून त्यांचे विषयी लिहिण्याचा प्रपंच.

भारतात तेली समाजाची संख्या १४ कोटी आहे .तर ६० आमदार ४० खासदार आहेत .तेली समाजाचा पहिला राजा चालूक्य नरेश तेलंग असून त्यांना राजा भोज वर अतिक्रमण केले होते त्यात पराभव त्यांचा झाला .म्हणून कहाँ राजा भोज कहा गंगू तेली, अशी म्हण प्रचलित झाली .
मोदीचा पूर्वज हिंदू व एका जातीचे आहेत .मोदी राजकारणात येण्यापूर्वी तेली समाज ओ,बी,सी समावेश झाला आहे . याचे ज्ञान त्यांना नाही .मोदी मुर्ख लोकांना बनवत आहेत, असे ते म्हणाले . या उलट नकली गांधी परिवार हा देशाला मूर्ख समजतोय !
**गांधी परिवाराची कुंडली** : या गांधी परिवाराची कुंडली पाहिली तर त्यांचे आजोबाचे नाव फिरोज धांडी म्हणजे इंदिरा गांधी यांचे पती व फिरोज त्यांचे वडिलाचे नाव जहाँगीर फरतून धांडी असे आहे .धांडी या आडनावाचा अपंभ्रश झाला व "गांधी' असे झाले आहे . मग फिरोज गांधी यांचा धर्म कोणता ? जात कोणती ? फिरोज गांधी यांची प्रयागराज ( इलाहाबाद )येथे कबर आहे .ते सद्या परिवार कबरीवर फूल वाहण्यास जात नाही .

नकली गांधी हे गल्लीतले नेते नाहीत! राष्ट्रीय पक्षाच्या नेत्यांना शोभणारे मुळीच नाही. मग राहुल गांधी यांचा धर्म व जात कोणती?हे सांगतील काय? मी तर त्यांचे म्हणणे सौम्य शब्दात लिहिले आहे,त्यांची भाषा ऐकली तर कोणालाही संताप येईल!आता पंतप्रधान मोदी व मुख्यमंत्री योगी याचेवरचा राग त्यांनी उत्तरप्रदेश व वाराणशी (काशी ) तरुणांवर आणि मतदारावर काढला! 'दारू पिऊन,उत्तर प्रदेशचे भविष्य' नाचत असे विधान केले आहे.गांधीतर शुध्दीवर होते ना? ते न्याय यात्रेत राजकीय भाषण करत होते ? नशाबंदी कार्यक्रमात प्रबोधन करत होते काय?.या यात्रेतून उत्तरप्रदेश मतदारांचा पक्षावरचा विश्वास वाढेल, प्रोत्साहनपर बोलण्याऐवजी त्यांना हिणवणारे विधाने केले. त्यांनी.मेठी मतदारांनी गांधी परिवारावर वर्षे प्रेम करत निवडून देत आला. यांचेशी सवांद न साधता.तुम्ही भारत माता की जय!जय श्रीराम म्हणत बसता, तुमम्हा भीक मागण्याची वेळ येईल,अशा शब्दात सुनावले!कारण २०१९ मध्ये गांधी यांचा अमेठीच्या मतदारांनी पराभव केला होता.उत्तरप्रदेशात भाजपाचे सरकार असल्याने नैराश्यातून ते असे बरगळत असावेत !गांधी परिवाराने मतदारांचा संघाच्या विकासाकडे कधीच लक्ष दिले नाही!उलट तेथील करोडाचा शासकीय भूखंड रुग्णालयाच्या नावाने लाटला आहे. त्या जागेवर परिवारासाठी विश्रांतीगृह बांधून वापर केला जात आहे. इतेक नव्हे,गांधी परिवार पारंपारिक रायबेरली मतदार संघातून उभे राहण्याचे धाडस करत नाहीये!गांधी यांचे प्रत्येक विधानाचे काँग्रेस पक्ष समर्थन करत आला आहे,आता काशी उत्तर प्रदेशावरून केलेले विधान पक्षाला संकटात टाकणारे आहे.त्यांचे या विधानाचे काँग्रेस पक्ष समर्थन करणे 'पायावर कुर्‍हाड मारुन घेण्यासारखे,आहे.या आधुनिक गांधी यांच्या वादग्रस्त विधानांची 'गिनीज बूक वर्ल्ड रिकार्ड' मध्ये नोंद होवू शकते. त्यांना 'मिस्टर बीन' राजकीय पुरस्कार दिला तर योग्यच ठरेल!या गांधीनी पंतप्रधान मोदींना 'चौकीदार चोर' म्हंटले. न्यायालयाने टिप्पणी केलेली नसताना त्याचा आधार घेण्याचा उठाठेव केला.यातून त्यांना माफी मागावी लागली.त्यांना अनेकवेळा माफी मागावी लागली. गृहमंत्री शहा यांना २०१८ कर्नाटकच्या सभेत यांना 'खूनी' म्हंटले होते यावरुन त्यांचे विरोधात उत्तरप्रदेश सुलतानपुर न्यायालयात मानहानीचा खटला दाखल चालू होता.या खटल्यात त्यांना न्यायालयाने त्यांची २५ हजार रुपायांच्या जामीनावर सुटका झाली आहे.त्यांचे विरोधात दहा ते बारा खटले विविध राज्यातील न्यायालयात चालू आहे. झारखंड उच्च न्यायालयाने गांधीच्या विरोधात खटला चालविण्याचा नुकताच निर्णय दिला आहे. न्यायालयाने त्यांना बोलतांना आणि टीका करताना मर्यादा पाळा असा सल्ला दिला. पण तरी त्यांचे बेताल थांबलेले नाही.तेंव्हा 'गांधी यांचे तोंड आवरा, पक्षाला वाचवा" अशी म्हणण्याची नेत्यावर वेळ आली आहे. गांधीनी स्वातंत्र्यवीर सावरकरांना माफीवीर म्हंटले.पण सावरकरांच्या पायाच्या धुळीशी त्यांची लायकी नाही.काँग्रेस पक्षाला 'आरव्हीजे' त्रिकूटाने घेरले आहे.पक्षाचे निर्णय तेच घेत आहेत.यावरुन पक्षात नाराजी वाढत चालली आहे.हे त्रिकूट नेते रणजीत सुरजेवाला वेणूगोपाल, व जयराम रमेश हे आहेत. काँग्रेस पक्ष राहूल गांधी सारख्या अपरिपक्व नेत्याला देशाचे पंतप्रधान व भवितव्य हातात देण्याची प्रयत्न होत आहे, हेच भारताचे दुर्देव आहे. लोकसभा निवडणुकीत इंडी आघाडी आणणे म्हणजे देशात अस्थीर सरकार निमंत्रण देणे,आहे ते धोकादायक



मांडणी व सजावट
अतुल ह . खंडगावकर





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

आज मी बोलणार आहे महाराष्ट्राच्या त्या लाडक्या व्यक्तिमत्वाबद्दल . ओळखलंच असेल तुम्ही. आपले ते भाई हो. म्हणजेच सर्वांचे लाडके पुलं . तर आज त्यांचे एक दोन किस्से सांगून मी तुमची सकाळ आनंदी करणार आहे. पुलं म्हणजे मोठे साहित्यिक, गायक, वादक, संगीतकार, वक्ता. एक अष्टपैलू व्यक्तिमत्व. पण अशी माणसं माणूस म्हणून सुद्धा किती मोठी असतात, ते दर्शविणारी ही घटना. मधू गानू यांनी पुलंना ' माणसांनी मोहरलेलं झाड . असं त्यांच्या पुस्तकात म्हटलं आहे. ते खरंच आहे. कारण पुलंच्या घरी सतत गायक, वादक, कलाकार, साहित्यिक, त्यांचे चाहते इ चा सतत राबता असायचा. पण पुलं आणि सुनीताबाई न कंटाळता त्या सर्वांची सरबराई करत असायचे. जसं रानातलं एखादं चवदार आणि थंड पाण्याचं तळं असावं, आणि त्या तळ्यावर येऊन प्रत्येकानं आपली तहान भागवावी, तसे पुलंकडे येऊन प्रत्येकजण समाधानी आणि आनंदी होऊन जायचा. पण कधी कधी हे तळच तृषार्तांकडे आपण होऊन जायचं. एक प्रसंग घडला तो असा. पुलं इचलकरंजीच्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. या संमेलनात वारणानगरची काही मुले येऊन आपली कला सादर करणार होती. पण काही कारणाने ती मुले संमेलनात येऊ शकली नाहीत. पुलंना हे कळले तेव्हा त्यांनी संमेलन आटोपल्यानंतर त्या मुलांच्या भेटीसाठी जाण्याचे ठरवले. आणि ते वारणानगरला गेले.

जणू पुंडलिका भेटी परब्रह्म आले. त्यांना पाहिल्यावर मुलांचा आनंद गगनात मावेना. एक चुणचुणीत मुलगा म्हणाला, " आम्हाला साहित्य संमेलनात आमची कला सादर करायला मिळेल असे वाटले होते. पण आम्हाला आमंत्रणच आले नाही. पण आता साहित्य संमेलनाचे अध्यक्ष स्वतः आम्हाला भेटायला आले आणि आम्हाला खूप आनंद झाला. आता त्यांच्यासमोर आम्ही आपली कला सादर करू. पण आमची एक अट आहे. आमचा कार्यक्रम आवडला तर पुलंनी आम्हाला पेटी वाजवून दाखवावी. पुलंनी अर्थातच त्यांची ही अट मान्य केली.






# आनंदी पहाट

## मनात घर करून राहिलेल्या आठवणी साठवाव्यात

आधुनिक केसरी

आपल्या सर्वांच्या जीवनात अत्यंत महत्वाचा आणि जिव्हाळ्याचा विषय म्हणजे आपली मनाची शक्ती. ह्या मनाच्या शक्तीचा थेट संबंध आपल्या भाव भावनांशी असतो. आजच्या गतिमान, आधुनिक आणि स्पर्धेच्या युगात अन्न, वस्त्र आणि निवारा या किमान प्राथमिक गरजांचा विचार करून फक्त चालत नाही, तर बदलत चाललेल्या जीवनमुल्यांचाही स्विकार करावा लागतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655


आज आपल्या आयुष्यातील प्रत्येक सुखात आणि दुःखात आपल्याला शारीरिकदृष्ट्या साथ-सोबत करणारे, मानसिक आधार देणारे, अंतर्मनाला धीर देणारे, आर्थिकदृष्ट्या सक्षमता देऊ करणारे, सामजिक पत निर्माण करणारे, शैक्षणिक प्रगतीची दिशा दाखवणारे, कौटुंबिक एकोपा टिकवणारे, आपली नातीगोती जपणारे, उणीवा दूर करणारे, आपल्या जाणीवा जपणारे, आपल्या जाणीवांना नेणीवेपर्यंत घेवून जाणारे, आपल्या जीवनात अत्यंत महत्वाची भूमिका बजावणारे आपले हक्काचे साधन हे दुसरे-तिसरे कोणतेही नसून ते म्हणजे आपले मन. आपले मन आणि धन एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्यासारख्या असतात. आपल्या मनातले धन आणि धनाढ्य मन तसेच मनातले घर आणि घरातले मन या दोन्हींचा मेळ आपण घालू शकलो पाहिजेत. आपले प्रत्येक स्वप्न साकार होताना आपल्याला मिळणारा आनंद निश्चितच निराळा असतो. पण हि स्वप्न साकारण्यासाठी आपल्या मनाची यथायोग्य मशागत करणेही तितकेच जरुरीच असते. आपले मन या शब्दांमधूनच आपल्या स्वतःच्या मनाविषयीच्या भाव-भावना प्रकट होत असतात. आपल्याला आपल्या स्वतःच्या मनाची असलेली ऊब आणि त्यामुळेच निर्माण झालेलं आपल्या जागाबरोबरचं नाते अतूट असते. आपण शरीराने आपल्या घरापासून दूर असतो तेव्हा देखील आपल्या मनात आपले घर हे घर करून राहीलेले असते. हि घरघर प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य घटक असल्याप्रमाणे अनुभवली जात असते.

# वलय..

आधुनिक केसरी

शांत पाण्यावर खडा मारला की असंख्य वलय तयार होतात. जिथे खडा पडला तिथे खोल वलय दिसतं. त्याच्या आजूबाजूला लहान लहान वलय तयार होत जातात. आणि शेवटी ते वलय काठापर्यंत किंवा कडेपर्यंत येऊन नष्ट होतात . पाणी शांत असेल तरच वलय तयार होतात. वाहत्या पाण्यात ते वलय तयार होत नाही. वाहत्या पाण्यात दगड मारला असता वलय तयार होण्याआधीच ते पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहत जातात. आपल्या आयुष्याचं ही असंच आहे. आपल्या भोवती सुद्धा असे खूप वलय असतात. प्रथम आपल्या आई वडिलांच्या नावाचं वलय आपल्या भोवती असतं. त्यांची मुलं म्हणून आपल्याला समाज ओळखतो. नंतर आपल्या स्वतःच्या नावाचं वलय आपल्या भोवती तयार होत असतं. नावंही मोठी सुंदर असतात. फुलं ,नक्षत्र, देवीदेवता, दगडगोटे, नदी, गाव, ऋतू इत्यादी वरून मुलांची नावे ठेवली जातात. मधुमालती, जाई, जुई, गुलाब, कमल ,रेवती ,स्वाती, शरद ,वसंत, माधव, हरी, कृष्णा, राम ,दगडू, धोंडू, पुंजाराम, कल्याण, मंदा ,रोहिणी, रेणुका, शारदा, सरस्वती, नर्मदा, सरिता, गया,गंगाराम, रेवा ,अनिल, सागर, गोदा, काशी, प्रयाग, तारा अशी कितीतरी नावे सांगता येतील. या सुंदर नावाचे वलय आपल्या भोवती तयार होते आणि चांगले संस्कार झाल्यास आपण त्या नावाप्रमाणे घडत जातो. कधीतरी डोळे बंद करून मनातल्या मनात आपण आपलेच नाव उच्चारून बघा. पवित्र मंगलमय असे वलय आपल्या भोवती तयार झालेले दिसतात. धन्य धन्य आपले आई-वडील. त्यांनी इतकं सुंदर आपलं नामकरण केलेलं असतं. नावाप्रमाणेच आपल्या भोवती आणखी आपला स्वभाव, शिक्षण, नोकरी, बुद्धी ,अध्यात्म, विचार, वागणं, बोलणं, राहणं, असणं या सगळ्या गोष्टींचं वलय तयार होत असतं. चांगल्या वलयात सदैव राहावं. आणि वाईट वलयातून वेळीच बाहेर पडावं.....

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग.37

# कष्टाची कमाई श्रेष्ठ

आधुनिक केसरी

एका गावात दोन चोर राहत होते. ते प्रत्येक दिवशी चोरी करत आणि आलेले धन तीन हिस्से मध्ये वाटून घेत. आपापला हिस्से स्वतःसाठी व एक हिस्सा ईश्वराला ठेवतात.असे खूप दिवस चालत होते .एका रात्री ते चोरीसाठी दुसऱ्या गावात निघाले. बरीच वेळ भटकंती करूनहीसुद्धा त्यांना काही चोरी करण्याची संधी मिळाली नाही. ते दोघेही थकून एका मंदिरात बसले. तेथे त्यांना एक साधू संत मादिरामध्ये झोपलेले दिसले. त्यांनी संताला उठवले व म्हणाले कि काही असेल तर द्या नाही तर मारून टाकले जाऊ.संताने त्यांना विचारला तर त्या चोरांनी सांगितले कि आम्ही चोर आहोत.आम्ही चोरी करतो .हे ऐकून संत म्हनाले, तुम्ही करता ते चांगलेआहे की वाईट याचा कधी विचार केला ? चोर म्हणाले, आम्ही चांगलेच करतो कारण आम्ही चोरी करून जे धन मिळवतो ते आम्ही तीन हिस्से मध्ये वाटतो. एक एक भाग आम्ही घेतो आणि तिसरा भाग ईश्वराला चरणी अर्पण करतो.



हे सगळे ऐकल्यावर संत त्यांच्या जवळील एक जिवंत कोंबडा काढला आणि त्यांना दिला व म्हणाले "आज तुम्ही काहीही चोरी करू शकले नाहीत त्यामुळे तुम्हीला हा कोंबडादेऊ शकतो बाकी माझ्याकडे काही नाही.पण आता चोरापुढे प्रश्न पडला कि आता याचे हिस्से कसे करायचे. ते दोघेही चोर आश्चर्यचकित झाले. संताने त्यांना आशय समजावून म्हाणाले कि चोरी हा जगण्याचा पर्याय नाही. तुम्ही कष्टाची कमाई करून त्यातील एक हिस्सा ईश्वरचरणी ठेवा. ते खरे सार्थक आहे .हे सगळे म्हणणे त्या चोराला पटले आणि ते दोघेही संताला नमस्कार करून चोरी सोडून द्यायचा निर्णय करून तेथून निघून गेले.


# निरुपण

आधुनिक केसरी

वांग तिळ सुरमें लांसें । चामखिळ गलंडे मसें ।
चुकुर होइजे मानसें । या नांव आध्यात्मिक ॥५०॥
नाना फुग आणी आवाळें । आंगीं दुर्गंधी प्रबळे ।
चाईचाटी लाळ गळे । या नांव आध्यात्मिक ॥५१॥
नाना चिंतेची काजळी । नाना दुःखें चित्त पोळी ।
व्याधीवांचून तळमळी । या नांव आध्यात्मिक ॥५२॥

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

अष्ट चक्र इस देह में,
जासे तन संचाल ।
चक्र बोध योगी करें, जाने अन्तर हाल
।।२७।।(स्वर्वेद तृतीय मण्डल द्वितीय अध्याय) ०३/०२/२७
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
आपल्या शरीरात आठ चक्रं असतात, ज्यांच्या द्वारे या शरीराचे संचालन होते. या चक्रांचे ज्ञान योगी पुरुषास असते आणि तेच या अंतर स्थितीला जाणतात.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

..................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# गुणरूपनिरसन

आधुनिक केसरी

सचेतन म्हणजे जिवंत प्राण्यामध्ये जाणीव असते यात नवल काही नाही. परंतू अचेतन वस्तूमध्ये देखील जाणीव असते हा वेदातांचा सिध्दांत आहे.सर्व संतांचा हाच अनुभव आहे. विश्वांत सगळीकडे व्यापून असणारी जाणिवेची संवेदना अनुभवास येईल असे मन तयार करणे हाच परमार्थ साधनेचा प्राण आहे. ज्ञानी पुरूष सांगतात की हे संपूर्ण विश्व नामरूपानी भरलेले आहे.प्रत्येक वस्तूला नाम व रूप अशी दोन अंगे असतात. रूप म्हणजे वस्तूंचे बहिरंग ते पंचमहाभूतांचे बनलेले आहे व ते स्थूल आहे. नाम म्हणजे वस्तूंचे अंतरंग ते जाणीवमय व सुक्ष्म असुन शक्तिमान असे आहे. रूपांमध्ये बदल होतो पण नावामध्ये बदल होत नाही.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# भगवंतावर अकारण प्रेम करावे

आधुनिक केसरी

खरोखर, जगात आणि लौकिकात आपण अडाणी राहिलो तर काही वाईट नाही. भगवंताच्या मार्गामध्ये त्याचा फायदाच होईल. आपण अडाणी झाल्याशिवाय, म्हणजे आपली विद्या आणि मोठेपण विसरल्याशिवाय, परमार्थ साधत नाही. मुलगा गावाला जाताना ज्याप्रमाणे आई त्याला फराळाचे देते, त्याप्रमाणे परमात्मा आपल्याला ज्या परिस्थितीत जन्माला घालतो त्या परिस्थितीत राहण्यासाठी लागणारे समाधानही तो आपल्याला देत असतो. ते घ्यायची आपली लायकी मात्र पाहिजे. जिथे असमाधान फार, तिथे दुष्ट शक्तींना काम करायला वाव मिळतो. याच्या उलट, जिथे खरे समाधान आहे, तिथे चांगल्या शक्ती मदत करतात. आपण नामाला चिकटून राहिलो तर बाहेरची वाईट परिस्थिती बाधणार नाही. देहाचा मनाशी संबंध आहे, आणि मनाचा हृदयाशी संबंध आहे; म्हणून मन नेहमी अगदी समाधानात ठेवावे, म्हणजे प्रकृती चांगली राहून आयुष्य वाढेल. स्वार्थ सुटताना पहिल्या-पहिल्याने मनुष्य व्यवहाराच्या चौकटीत



बसणार नाही. जो येईल त्याला तो आपलाच म्हणेल. पण परमार्थ मुरला की तो व्यवहार बरोबर करून शिवाय निःस्वार्थी राहील.

खरोखर, परमार्थ हे एक शास्त्र आहे; त्यामध्ये सुसूत्रपणा आहे. व्यवहार न सोडावा; पण विषयाकडे गुंतणारी आपली वृत्ती भगवंताच्या आड येते, म्हणून तिला भगवंताकडे गुंतवावे. भगवंताची खरी आवड उत्पन्न झाली पाहिजे. भगवंतावर अकारण प्रेम करणे याचे नाव परमार्थ. परमार्थाला डोके शांत पाहिजे. एका गृहस्थाला सगळीकडे रामाची मूर्ती दिसू लागली. झाले ! त्याला वाटले की देव आपल्याला भेटला. पण हे काही खरे भगवंताचे दर्शन नव्हे. तो सर्व ठिकाणी आहे अशी भावना झाली पाहिजे. परमार्थाची काळजी करू नये; ती काळजीच प्रगतीच्या आड येते. वय वाढू लागले की आपले सर्व अवयव जसे प्रमाणात आपोआप वाढतात, तसेच परमार्थाला लागणाऱ्या गुणांचे आहे. आपण साधन करीत असताना, आपली प्रगती किती झाली हे सारखे पाहू नये. समजा, आपण आपल्या परसात एक झाड लावले, आणि ते किती वाढले हे पाहण्यासाठी रोज त्याच्या मुळ्या उपटून आपण जर पाहू लागलो, तर ते झाड वाढेल का ? अगदी तसेच परमार्थाच्या प्रगतीचे आहे. मनुष्याला परमार्थ किती साधला हे त्याच्या बोलण्यावरून आणि दृष्टीवरून ओळखता येते. **१५४. परमार्थ हा लोकांना उपदेश करण्यासाठी नाही. तो निव्वळ स्वतःकरिता आहे.**

# कल्याण स्वामी

आधुनिक केसरी

एकदा, सज्जनगडावर गडाच्या टोकाशी रामदास उभे राहिले असताना, त्यांची छाटी( वस्त्र) वाऱ्याने उडाली. तेव्हा समर्थ उच्चारले 'कल्याणा, छाटी उडाली'. हे ऐकताच गुरुभक्त कल्याण स्वामींनी कड्यावरून खाली उडी घेतली व ती छाटी हवेतच झेलली. ती जागा आजही सज्जनगडावर कल्याण छाटी या नावाने दाखवतात. समर्थांनी चोरांचे हृदयपरिवर्तन केले. एकदा चाफळला रात्री समर्थ अंथरुणात पहुडले होते.त्यांचा लाडका शिष्य कल्याण त्यांचे पाय चेपत होता.रात्रीचे जवळजवळ साडे बारा वाजले होते.पाय चेपताना कल्याण स्वामीना शंका आली कि, भांडार घरात चोर शिरले असावेत. कल्याणस्वामींचे अर्धे लक्ष पाय दाबण्याकडे तर अर्धे लक्ष चोरांकडे होते.कल्याणने जेव्हा समर्थांना चोर आले असावेत असे सांगितले तेव्हा समर्थ म्हणाले - 'अरे जाऊ दे, भांडारघरातील धान्य आपल्या एकट्याचे थोडेच आहे.त्या अन्नावर जर त्यांचे नाव लिहिले असेल तर ते त्यांना मिळेल.'कल्याणने जेव्हा भांडारघरात भिक्षेचे पैसे आहेत म्हणून सांगितले तेव्हा समर्थ म्हणाले - 'अरे जाऊदे आपण साधू आहोत. आपल्याला पैशाचा मोह काय करायचा ?'समर्थ तसे पक्के व्यवहारी होते.पण मुद्दाम कल्याणाची परीक्षा पाहण्यासाठी ते तसे बोलत होते.

रविवार, २५ फेब्रुवारी २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी · दैनिक
वर्ष - ०३ · अंक - १८६
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 25 FEBRUARY 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-186 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-05

# पुन्हा जनतेचे राज्य आणू

## रायगडावरुन शरद पवारांची गर्जना : सध्याचा काळ वैचारिक संघर्षाचा

आधुनिक केसरी न्यूज

**रायगड : ही तुतारी एका संघर्षाला सुरुवात करण्यासाठी प्रेरणा देणारी आहे. जनतेसाठी ही आनंदाची तुतारी असेल. राज्याची परिस्थिती बदलण्यासाठी जनतेचे राज्य आणावे लागेल असे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी रायगड किल्ल्यावर पक्षाच्या तुतारी चिन्हाच्या अनावरण प्रसंगी बोलताना म्हटले आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी आज शनिवारी रोजी किल्ले रायगडावर तुतारी फुंकणारा माणूस या आपल्या नव्या निवडणूक चिन्हाचे अनावर केले. यावेळी खासदार सुप्रियाताई सुळे, प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील, आमदार जितेंद्र आव्हाड, आमदार अनिल देशमुख, आमदार राजेश टोपे, खासदार फौजीया खान, खासदार अमोल कोल्हे, माजी खासदार वंदना चव्हाण, आमदार सुनील भुसारा, आमदार प्राजक्त तनपुरे, आमदार अशोक पवार, आमदार सुमन पाटील यांच्यासह पक्षाचे व फ्रंटल सेलचे इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शरद पवार म्हणाले की, सध्याचा संघर्ष हा वैचारिक आहे. या देशात अनेक राजे झाले, संस्थानिक झाले. परंतु, रयतेचा राजा एकच झाला. सध्या राज्यात अडचणी वाढतील अशी स्थिती आहे. शिवछत्रपतींचे राज्य सामान्यांची सेवा करणारे राज्य होते. आज महाराष्ट्राची स्थिती बदलायची असेल तर पुन्हा एकदा याठिकाणी जनतेचे राज्य येईल, यासाठी प्रयत्न करावे लागतील. निवडणूक आयोगाने रणशिंग फुंकायला तुतारी दिली आहे. संघर्षातून प्रेरणा देणारी ही तुतारी आहे. तुमच्या संघर्षातून, त्यागातून यश मिळणार याची खात्री आहे. या ऐतिसाहिक भूमीत आपण आलो आहोत. त्यामुळे छत्रपती शिवरायांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन, या ठिकाणाहून प्रेरणा घेऊन जनतेची सेवा करुया, असेही शरद पवार यांच्याकडून सांगण्यात आले.पुढे पवार म्हणाले की, निवडणूक आयोगाने रणशिंग फुंकायला तुतारी दिली आहे. संघर्षातून प्रेरणा देणारी ही तुतारी आहे. तुमच्या संघर्षातून, त्यागातून यश मिळणार याची खात्री आहे. या ऐतिसाहिक भूमीत आपण आलोय. या ठिकाणाहून प्रेरणा घेऊन जनतेची सेवा करुया, असेही आवाहन शरद पवार यांनी केले.



**सेवा सन्मान आणि स्वाभिमान :** सेवा मायबाप जनतेची, सन्मान शेतकऱ्यांचा–महिलांचा–ज्येष्ठ नागरिकांचा आणि स्वाभिमान तुमच्या माझ्या महाराष्ट्राचा असे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्ष तथा खासदार सुप्रियाताई सुळे यांनी किल्ले रायगडावर पक्षाच्या तुतारी चिन्हाच्या अनावर प्रसंगी खासदार सुप्रियाताई सुळे यांनी म्हटले आहे .

**दुग्ध–शर्करा योग :** महाराष्ट्राच्या काळजातील तुतारी आता राज्याची स्वाभिमानाची ललकारी होईल . शरद पवार साहेबांच्या नेतृत्वात प्रत्येक कार्यकर्ता आणि पदाधिकारी महाराष्ट्राचा स्वाभिमान कायम बुलंद राहण्यासाठी प्रयत्नशील राहील असे खासदार अमोल कोल्हे यावेळी म्हणाले .

सेना जेव्हा युद्धाला निघत असते, त्यावेळेस वाजवले जाणार वाद्य म्हणजे तुतारी आहे, आणि आपण जिंकल्यानंतर युद्धावरून जेव्हा परत येतो तेव्हादेखील तुतारीच वाजवली जाते निवडणुकीच्या युद्धात उतरताना ८४ वर्षांच्या योद्धाला तुतारी देऊन शुभ संकेत दिल्याचा विश्वास जितेंद्र आव्हाड यांनी व्यक्त केला आहे .

# दोन दिवसांत जागा वाटपाचा निर्णय जाहीर करा

## प्रकाश आंबेडकरांचे महाविकास आघाडीला पत्र

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाविकास आघाडीने दोन दिवसांत जागा वाटपाचा निर्णय जाहीर करावा, असे पत्र प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीने महाविकास आघाडीतील नेत्यांना पत्र लिहिलं आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार गट) आणि शिवसेना (ठाकरे गट) यांनी त्यांच्यात ठरलेल्या जागा वाटपाची माहिती दोन दिवसांत जाहीर करावी, अशी मागणी या पत्रातून केली आहे. वंचित बहुजन आघाडीने पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे की, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीची 22 फेब्रुवारीला पत्रकार परिषद झाली. ती आम्ही बघितली. यात महाविकास आघाडीच्या तिन्ही पक्षांमध्ये 39 जागांवर एकमत झाले असून, लवकरच 27 किंवा 28 फेब्रुवारीला औपचारिक आणि अंतिम निर्णय घेतला जाईल, असे महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी सांगितले होते. वंचित बहुजन आघाडीचा महाविकास आघाडीत समावेश करण्याबाबत माध्यमांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना चेन्नीथला म्हणाले होते की, काँग्रेसने किमान समान कार्यक्रमासाठी वंचित बहुजन आघाडीचा प्रस्तावित 39 कलमी अजेंडा स्वीकारला आहे. मात्र, वंचित बहुजन आघाडीकडून जागांची मागणी अद्याप आलेली नाही. किमान समान कार्यक्रमासाठी प्रस्तावित 39-पॉइंट अजेंडावर काँग्रेसने स्वीकारल्याचे आम्ही स्वागत करतो. आम्ही शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस यांना किमान समान कार्यक्रमासाठी त्यांचा मसुदा आम्हाला दाखवावा. मोदींच्या नेतृत्वाखालील भाजप-आरएसएसचा आगामी लोकसभा निवडणुकीत पराभव करण्यासाठी मविआतील तिन्ही पक्षांच्या मसुद्यासह एक किमान समान कार्यक्रम तयार करणे महत्वाचे आहे. आंबेडकर यांच्या अकोल्यातील पत्रकार परिषदेतील त्यांच्या विधानांचा पुनरुच्चार या पत्रात करण्यात आला आहे. मविआने वंचित बहुजन आघाडीला आत्तापर्यंत अंतिम झालेल्या जागा वाटपासंदर्भात माहिती द्यावी. 2 फेब्रुवारीला मुंबईतील ट्रायडंट हॉटेलमध्ये तीन पक्षांच्या प्रतिनिधींसोबत झालेल्या आमच्या शेवटच्या बैठकीतही आम्ही हीच विनंती केली होती.

# क्षत्रियाला उपोषण शोभत नाही, ते पंडित- पुजाऱ्यांनी करावे

## आमदार बच्चू कडू यांचा जरांगे पाटील यांना सल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आजपासून मराठा समाजाला आंदोलन करण्याचे आवाहन केले आहे. यावर आमदार बच्चू कडू यांनी जरांगे पाटलांना सबुरीचा सल्ला दिलाय. ते अकोला येथे बोलत होतेय. सरकारला अंमलबजावणीसाठी थोडा वेळ द्यावा असं बच्चू कडू म्हणालेय. जरांगेंनी उपोषण करू नये. उपोषण हे क्षत्रियाला शोभत नाहीय. उपोषण हे पंडीत-पुजाऱ्यांना शोभतं या बच्चू कडूंच्या वक्तव्यावर नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहेय. दरम्यान, जरांगे पाटलांनी लोकसभेपेक्षा विधानसभा लढवावी, असा सल्ला कडूंनी जरांगेंना दिलाय. सगेसोयऱ्यांच्या अध्यादेशाची अंमलबजावणी करण्यात कोणतीच तांत्रिक अडचण नसल्याचे आ. कडू म्हणालेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर माझा पूर्ण विश्वास

मराठा आरक्षणाचा संदर्भातील अधिसूचनेविरुद्ध सहा लाख तक्रारी आलेल्या आहेत. पुढील एक महिन्यात या तक्रारींचं निवारण केल्या जाईल, अशी माहिती सामाजिक न्याय सचिवालायाने दिली आहे. अधिसूचना जर लागू झाली तर सगेसोयरे हा विषय देखील लागू होईल. त्यामुळे सरकारने जो मराठा आरक्षणासंदर्भात कायदा पारित केला, त्यापेक्षा देखील अधिक चांगला कायदा पुढे लागू होईल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. मराठा आरक्षणाचा कायदा हा लागू होईल आणि तो न्यायालयात देखील टिकेल. तसेच कोर्टात टिकल्यानंतर मराठा समाजाला वेगळा आरक्षण मिळेल. मला व्यक्तिशः असं वाटतं, की ओबीसी सोबतच हे आरक्षण अधिक लाभदायक ठरेल आणि या महाराष्ट्रातील वाद देखील सुटेल, असा विश्वास बच्चू कडू यांनी बोलतांना व्यक्त केला. प्रकाश आंबेडकर यांनी दिलेल्या सल्ल्यानुसार मनोज जरांगे पाटील यांनी लोकसभा निवडणूक लढवली पाहिजे की नाही, हा त्यांचा व्यक्तिगत प्रश्न आहे. तसेच प्रकाश आंबेडकर यांनी दिलेला सल्ला हा त्यांचा देखील वैयक्तिक सल्ला असू शकतो. मी त्यांना सल्ला देण्यासाठी फार मोठा नाही. मात्र त्यांनी समजा निवडणूक लढण्याचा विचार केलाच, तर लोकसभा न लढता त्यांनी विधानसभा लढवली पाहिजे, असा सल्ला देखील आमदार बच्चू कडू यांनी मनोज जरांगे पाटील यांना दिला. माझे व्यक्तिगत मत असे आहे की, जरांगे पाटील यांनी दोन-तीन महिने सरकारला वेळ दिला पाहिजे.

# मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर काळाची गरज : डॉ. कापसे

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** रुग्णाच्या दृष्टीने बांधिलकी ठेवत मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर शिर्डी येथील श्री साईभक्त लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्ट व आर झुंनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल पनवेल मुंबई तसेच आयोध्या हॉस्पिटल शिर्डी यांनी आयोजित केलेले शिबिर कौतुकास्पद असुन साईबाबांच्या वैद्यकीय सेवेचा वसा खरोखरच आचरणात आणने हिच खरी सेवा असल्याचे मत डॉ राजेश कापसे यांनी व्यक्त केले

कापसे म्हणाले की शिर्डी येथे सामाजिक भावनेतून मोतीबिंदू मुक्त शिर्डी परिसर अभियानांतर्गत मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर संपन्न झाले वैद्यकीय खर्च मोठ्या प्रमाणावर वाढत असताना अशावेळी सेवाभावी संस्था मोठ्या प्रमाणावर पुढे येण्याची गरज असुन तीच खरी सेवा असल्याचे सांगितले लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्टचे विश्वस्त अरुणराव गायकवाड व साईराज गायकवाड यांनी सांगितले कि लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्टच्या माध्यमातून या अगोदर देखील



विविध सामाजिक उपक्रम नेहमीच राबविण्यात येतात त्याच धर्तीवर सामान्य गोरगरीब रुग्णाना मोफत वैद्यकीय सेवा सुविधा मिळाली पाहिजे हा हेतु ठेवून शिबिर संपन्न झाले या शिबिरात जवळपास एक हजार नगर सह मराठवाड्यातील रुग्णांनी लाभ घेतला या शिबिरात मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया प्रसंगी जाण्याची राहण्याची जेवणाची सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आली व मोफत नेत्र तपासणी करून रुग्णाना चष्मा वितरण देखील करण्यात आले या शिबिरात दिवसभर महिला वयोवृद्ध स्त्री पुरुष रुग्णानी आरोग्य सेवेचा लाभ घेतला लगतच्या काळात पुन्हा एकदा असे शिबिराचे आयोजन केले जाणार आहे.

# संन्यस्त राजकारणी : मा. नरेंद्र मोदी



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**भारताचे वर्णन अनेक प्रकारे केले जाते. त्यातील एक प्रकार म्हणजे हा देश विविधतेने जसा नटलेला आहे तसाच विविध निवडणुकांनी बहरलेला आहे. नेहमीच कशासाठी आणि कोठेतरी निवडणुका होतच असतात. यातूनच खरे तर आपली लोकशाही मजबूत आणि परिपक्व होत जाते, हे नाकारता येत नाही. साम, दाम, दंड, भेद किंवा वाट्टेल त्या मार्गाचा अवलंब करून निवडून येणे आणि निवडून आल्यानंतर आपले उखळ पांढरे करणे हे जनप्रतिनिधी म्हणून ठरलेलेच. या सर्व पार्श्वभूमीवर ज्यांच्याकडे सबंध भारतीयांनी काही राष्ट्रीय सामाजिक अपेक्षेने पहावे असे एकमेव ठिकाण म्हणजे या देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी हे होत.**



## क्षितिजापल्याड

केवळ लेखाचा मथळा वाचून अनेकांच्या भुवया उंचावणे अपेक्षित आहे. कारण आपल्या मनाच्या धारणा आपण एवढ्या पक्क्या करून ठेवलेल्या आहेत की, त्या पलीकडचा विचार आपण पचवू शकत नाही किंवा असेही काही असू शकते असे आपले मन मानायला तयार होत नाही. मा. नरेंद्र मोदी हे धार्मिक आहेत पण सांप्रदायिक धार्मिकता या अर्थाने ते धार्मिक नसून सबंध भारतीयांनाच नव्हे तर अखिल विश्वाला आपल्या कवेत घेणारी भारतीय मुलाधारावर अधिष्ठित धार्मिकता हा त्यांच्या जगण्याचा भाव आहे. आपले सामाजिक आणि राजकीय व्यक्तिमत्व विकसित करत असताना किती आणि कोणकोणत्या आव्हानांचा सामना करावा लागला, हे फक्त तेच जाणू शकतात. आजच्या काळात अत्यंत क्षुद्र स्वार्थापायी कोलांटउड्या मारणाऱ्या सामान्य माणूस ते राजकारणी लोक पाहिले असता तावूनसुलाखून जाणे काय असते याचा अर्थबोध करून घ्यायचा असेल तर आपणास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे पहावे लागेल. केवळ जातिजातींचे सेल उभारून आणि कोणाला तरी जवळ करण्याने आणि कोणाला तरी गृहीत धरण्याने आपली राजकीय पोळी शेकायची आणि वासरात लंगडी गाय शहाणी असे वागायचे, अशी राजकारणाची झालेली रीत एका निस्पृह, संन्यस्त आणि सर्वसमावेशक शासकाच्या येण्याने कशी राळ उडाली हे अवघ्या भारतानेच नव्हे तर अख्ख्या जगाने पाहिले आहे. या माणसाच्या मनात एक आग आहे, एक प्रकारची तळमळ आहे. ना खाऊंगा ना खाणे दुंगा हा केवळ निवडून येण्यासाठी त्यांनी वापरलेला जुमला नव्हता तर त्याचे प्रत्यंतर हरघडी आपण घेत आहोत. ज्यांचे अख्खे आयुष्य मोदींना शिव्याशाप देण्यात आणि त्यांच्या विरोधी अपप्रचार करण्यात गेले ते झाडून सगळे आज चरणाशी लीन होण्यात धन्यता मानत आहेत. हा केवळ काळाचा महिमा नाही तर बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले हा भाग महत्त्वाचा आहे. स्वातंत्र्यापूर्वी या भारतात जी शेकड्याने संस्थाने अस्तित्वात होती तीच गत स्वातंत्र्योत्तर काळातही खासदारकीच्या, आमदारकीच्या रूपाने या स्वतंत्र भारतात टिकवून ठेवण्यात आली. एक प्रामाणिक माणूस काय बदल घडवू शकतो, याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे होत. ज्या पक्षाने केवळ राजकारणी लोक कसे मोठे होतील आणि इतर त्यांच्या मागे फरफटत कसे येतील याची सोय पहिली त्यांनी आपल्या हाताने आपल्याच पायावर मोठ्ठा धोंडा पाडून घेतला. कारण हे नेते म्हणवून घेणारी मंडळी आज आपले घर सोडून जाताना घर चालवायला कोणी



सोम्या गोम्या देखील असू नये, हे फार दुर्दैवी आहे. आज नरेंद्र मोदी किंवा त्यांची टीम तीन चारदा मुख्यमंत्री राहिलेल्या नेत्यास बाजूला सारून त्या प्रांताची सूत्रे दुसऱ्याच्या हाती सोपवू शकतात. हे धाडस येते कोठून. आता हे राज्य त्यांच्या हातून निसटले म्हणून समजा असे भलतेसलते तर्क लावण्यात राजकीय पंडितांनी पानेच्या पाने खर्ची घालावीत आणि पुन्हा निवडणुका झाल्यावर इव्हिएमच्या नावाने खडे फोडावित हे आता नित्याचे झाले आहे. आम्हालाही मग काही सूचत नसेल तर खालच्या पातळीवर जाऊन टीका करायची, टर उडवायची असे प्रकार करून दुसऱ्याला हसविण्याच्या नादात स्वतःचे हसे करून घ्यायचे. जेवढी टीका नरेंद्र मोदी यांच्यावर झाली ती पाहता त्यांनी अवलंबिलेले धोरण अतिशय रास्त आहे असेच म्हणावे लागेल. कारण अनेकांच्या हितसंबंधांना बाधा पोहचत असेल तर टीका होणे स्वाभाविक आहे. ह्या टीकाकारांमध्ये कोण आहे. ज्यांना आपल्या कर्तव्यात कसूर करावा वाटतो असा नोकरदार वर्ग, भ्रमित झालेले विचारवंत, अहं दुखावलेले पत्रकार आणि गळती लागलेले विरोधी पक्ष. बस्स. पण सामान्य माणूस खुश आहे. आम्ही जेव्हा निवडणूक निकालांचे ठोकताळे बांधतो तेंव्हा आपल्या कंपूतील वातावरणाचा अंदाज घेऊन हे सगळे असते, परंतु आपल्या विशिष्ट गटापेक्षा मोठा समाज बाहेर आहे. हे आपण विसरून जातो. मा. नरेंद्र मोदी यांची उपलब्धता काय असे जर आपण विचारत असू तर ती यादी खूप मोठी होईल. कलम तीनशे सत्तर किंवा अयोध्या प्रश्न हे गौण आहेत. आज केवळ भारतीयांच्या मनावरच नव्हे तर जगातील अखिल मानवांच्या मनावर भारतीय संस्कृती म्हणजे काय हे दृढतापूर्वक बिंबवण्याचे महत्त्वाचे कार्य विवेकानंदांच्या नंतर जर कोणी केले असेल तर ते मा. नरेंद्र मोदी यांनी. ज्या अरबस्तानात मूर्तिपूजा निषिद्ध होती किंवा आहे त्या ठिकाणी भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविणारे भव्य मंदिर उभारून आम्ही कोणाचा द्वेष करणारे नसून सर्वांना आपल्यात सामावून घेणारे आणि विश्वबंधुत्व मानणारे आहोत, हा दिलेला संदेश महत्त्वाचा आहे. आम्ही भारताचे वर्तमानकालीन लोक हे खरेच भाग्यवान आहोत ज्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदींना अनुभवता आले. पाण्यात राहूनही पाण्यापासून अलिप्त राहण्याचे कौशल्य हा कमळपत्राचा गुण असतो तद्वतच लाभाच्या पदावर विराजमान होऊनही लोभापासून अलिप्त राहण्याचा गुण मा. नरेंद्र मोदी यांनी विकसित करून येणाऱ्या पिढ्यांसाठी वस्तुपाठ निर्माण करून ठेवला हे त्यांच्या कार्याचे वेगळेपण होय. चांगले होत असताना केवळ टीकेसाठी टीका हा सामान्य माणसाचा गुण नव्हे, तो राजकारण्यांचा डाव असतो. आपण सामान्य माणसांनी या सर्व गोष्टींकडे निर्लेप आणि निरपेक्षपणे पाहिले पाहिजे व वागले पाहिजे. **(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# छत्रपती संभाजीनगरसह चार जिल्ह्यातून चारा वाहतुकीस बंदी



किरणकुमार आवारे
संपर्क क्र. 9423086021

आधुनिक केसरी

**राज्यात पाणी आणि त्यासोबतच चारा टंचाई भीषण रूप घेत आहे. जसजसा उन्हाचा तडाखा वाढेल तस तसे हि परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते. छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, परभणी, नगर आणि अकोला जिल्ह्यातून चारा वाहतुकीस बंदी घालण्यात आली आहे. जिल्ह्यातील चाऱ्याची उपलब्धता वाढविण्यासाठी जिल्ह्याबाहेर चाऱ्याची वाहतूक होऊ नये यासाठी जिल्हाधिकारी प्रयत्न करताना दिसत आहेत. चाऱ्याची पळवापळवी होऊ नये यासाठी आदेश देण्यात आले आहेत. इतरही दुष्काळग्रस्त जिल्ह्यामध्ये हे निर्णय घेतले जाऊ शकतात. खाद्यतेलाची उपलब्धता भारतासोबत जागतिक स्तरावर अधिक आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत रिफाईंड सोया तेलाचे भाव या आठवड्यात २ टक्के ने घटले.**

खाद्यतेलाच्या मुबलक साठा आणि त्या तुलनेत कमी मागणी याचा परिणाम भावावर होत आहे. महाराष्ट्रात खुल्या बाजारपेठेत सोयाबीनचे भाव ४२०० ते ४३०० रुपये प्रतिक्विंटल दरम्यान आहेत. नजीकच्या काळात १०० ते १५० रुपयांची तेजी मंदी सुरु राहील. **खाद्यतेल आयात :-** केंद्र सरकारकडून खाद्यतेलाची आयात वाढत असल्यामुळे किमान आयात किंमतीत हलकीशी वाढ करण्यात आली आहे. बहुतांश खाद्य तेलावर ४ डॉलर पासुन ६ डॉलर प्रतिटन इतके वाढविण्यात आले. तर कच्च्या सोया तेलावर किमान आयात २२ डॉलरने कमी करण्यात आले. या निर्णयाचा देशातील खाद्यतेलाच्या भावावर जास्त परिणाम होणार नाही. नोव्हेंबर, डिसेंबर आणि जानेवारी या तीन महिन्यात खाद्यातेलाची आयात तब्बल २३ टक्के नी कमी झाली. साठा मुबलक प्रमाणात असल्याचा परिणाम आयातीवर होत आहे.

**भारतातून बासमती तांदळाची निर्यात :-** देशात बासमती तांदळामध्ये चांगला परतावा मिळत असल्यामुळे लागण क्षेत्र वाढले आहे. सन २०२३-२४ बासमती तांदळाचे उत्पादन २० लाख टनाने वाढून १३० लाख टनावर पोहोचले. निर्यातदारांकडून चांगली मागणी मिळत असल्यामुळे भारतातून निर्यात चांगली वाढली. पण, सध्या लाल समुद्रातील हुती विद्रोहांच्यामुळे आखाती देशांच्यासह युरोपीय देशांना होत असलेला पुरवठा प्रभावित झाला आहे. मागणी कमी झाली आहे. भावावर हलकासा दबाव टिकून आहे. जानेवारी २०२४ महिन्यामध्ये बसमतीची निर्यात २८ टक्के ने कमी झाली. जोपर्यंत लाल समुद्रातील अडचणी दूर होत नाहीत, तोपर्यंत बासमती तांदळाच्या भावावर दबाव टिकून राहील. **सोयाची निर्यात :-** खुल्या बाजारपेठेत सोयाबीनचे भाव घसरल्याने सोयाचे भावही कमी झाले. परिणामी भारतीय सोयाची निर्यात वाढू लागली. अर्जेंटिनामधून निर्यात कमी होत असल्यामुळे भारतीय डी.ओ.सी ला मागणी वाढली. मागील वर्षाच्या तुलनेत जानेवारी महिन्यामध्ये सोयाची निर्यात १.१ टक्के ने वाढून ४ लाख ७७ हजार टनावर पोहोचली. सोयाची निर्यात सर्वाधिक बांग्लादेशाला होत आहे त्या पाठोपाठ दक्षिण कोरीया आणि व्हिएतनामला ही सुरु आहे. लाल समुद्रातील अडचणींचा फायदा काही प्रमाणात भारताच्या डी.ओ.सी च्या निर्यातीत होत आहे. फेब्रुवारीमध्येही डी.ओ.सी ची निर्यात वाढेल असे वाटते. **अपेडाची निर्यात २६.७ अब्ज डॉलर्सवर :-** अपेडाच्या निर्यातीत दरवर्षी सरासरी १२ टक्क्यांनी वाढ होत आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये देशातून ५३.१ अब्ज डॉलर्स रुपये किमतीची कृषी निर्यात झाली होती. या निर्यातीत अपेडाचा वाटा सुमारे ५१ टक्के आहे. एप्रिल ते डिसेंबर २०२३ या कालावधीत २३ प्रमुख कृषी उत्पादनांपैकी १८ उत्पादनांच्या निर्यातीत मोठी वाढ झाली आहे. फळांच्या निर्यातीत २९ टक्क्यांनी वाढ झाली आहे. प्रक्रियायुक्त भाज्यांच्या निर्यातीत २४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. फळांच्या निर्यातीत वेगाने वाढ होत असून, देशातून १११ देशांमध्ये फळांची निर्यात होत आहे. **दि.१५ फेब्रुवारीपर्यंत २.५ टक्के ने साखरेचे उत्पादन कमी :-** देशात १५ फेब्रुवारीपर्यंत २२३.६८ लाख टन साखरेचे उत्पादन झाले. जे मागील वर्षाच्या तुलनेत अडीच टक्क्यांनी कमी आहे. इथेनॉल उत्पादनासाठी थेट उसाच्या रसाचा वापर करण्यास प्रतिबंध असतानाही साखरेच्या उत्पादनात घट झाली. महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये पाण्याच्या कमतरतेमुळे उत्पादकता घटली आहे. उसाअभावी कारखाने बंद होण्यास सुरु झाले. दि.१९ फेब्रुवारीपर्यंत महाराष्ट्रात एकूण २०७ साखर कारखान्यांनी ऊस गाळप केले. त्यापैकी ५ कारखान्यांनी त्यांचा गाळप हंगाम पूर्ण केला आहे. त्यामध्ये १०३ सहकारी आणि १०४ खाजगी साखर कारखान्यांचा समावेश असून ८३४.६३ लाख टन उसाचे गाळप झाले आहे. राज्यात आतापर्यंत सुमारे ८२.७२ लाख टन साखरेचे उत्पादन झाले आहे. सध्या राज्यात साखरेची सरासरी ९.९१ टक्के आहे. **समुद्रमार्गे रशियाला वीस टन केळीची निर्यात :-** भारतीय केळीच्या प्रमुख निर्यात स्थळांमध्ये इराण, इराक, संयुक्त अरब अमिरात, ओमान, उझबेकिस्तान, सौदी अरेबिया, नेपाळ, कतार, कुवेत, बहारीन, अफगाणिस्तान आणि मालदीव या देशांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, अमेरिका, रशिया, जपान, जर्मनी, चीन, नेदरलँड्स, ब्रिटन आणि फ्रान्स हे देश देखील भारताला निर्यातीच्या मुबलक संधी उपलब्ध करून देतात. केळीचा सर्वात मोठा जागतिक उत्पादक असूनही, भारताच्या निर्यातीमध्ये ते प्रतिबिंबित याचे होत नाही. जरी जगातील केळी उत्पादनापैकी २६.४५ टक्के (३५.३६ दशलक्ष मे.टन) भारतात होते, तरीही जागतिक बाजारपेठेत भारताच्या निर्यातीचा वाटा केवळ एक टक्का आहे. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात भारताने १७६ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स किमतीची केळी निर्यात केली, जे ०.३६ एमएमटी समतुल्य आहे. पुढील पाच वर्षांत भारतातून केळी निर्यातीचे एक अब्ज डॉलर्सचे लक्ष्य गाठणे अपेक्षित आहे. केंद्र सरकार केळीच्या नियंत्रणासाठी प्रयत्नशील आहे. इराण, ओमान, संयुक्त अरब, सौदी अरेबिया, नेपाळ, कतार, कुवेत, बहरेन, अफगाणिस्तान, मालदीवमध्ये निर्यात होत होती. कोरोनानंतर नव्या बाजारपेठ शोधण्यास सुरु केल्या. आता यामध्ये अमेरिका, रशिया, जपान, जर्मनी, चीन, नेदरलँड, युरोप, फ्रांस या देशांनाही निर्यात सुरु झाली. अपेडाने प्रसारित केलेल्या माहितीनुसार पुढील पाच वर्षात १ बिलियन डॉलर म्हणजे १०० कोटी डॉलरचा टप्पा पार करेल. राज्यातील जवळपास २५ हजार शेतकरी केळी निर्यातीमध्ये सहभागी होतील असे अंदाज दिले आहेत.

**लाल मिरचीची आवक :-** आंध्रपदेश, कर्नाटक भागात लाल मिरचीची आवक मोठ्या प्रमाणात होत आहे. गुंटूर या प्रमुख बाजारपेठेत सव्वा लाख गोणींची आवक होत आहे. भावात सरासरी ४० ते ५० रुपयांची घसरण या आठवड्यात झाली. पण ही घसरण तात्पुरती असेल असे वाटते. लाल मिरचीच्या भावात पुन्हा वाढ होऊ शकते. सध्या तेजालाल मिरचीला १८ हजार ते २० हजार रुपये, ३३४ नंबरच्या लाल मिरचीला १४ हजार ते १८ हजार रुपये तर फटकी मिरचीला १० हजार ते १३ हजार रुपये प्रतिक्विंटलपर्यंत भाव मिळत आहेत. वातावरण शुष्क होईल तसे मसाला विभागातुन मागणी हळूहळू जोर धरेल असे वाटते.

**ज्वारीचे लागण क्षेत्र २५ टक्के ने अधिक :-** राज्यात मागील वर्षाच्या तुलनेत पेरा क्षेत्रात ९ टक्के ने वाढ होऊन ५८.६० लाख टन वर पोहचले. ज्वारीचे लागण क्षेत्र १६.१७ लाख हेक्टर वर पोहचले जे मागील वर्षाच्या तुलनेत २५ टक्के ने अधिक आहे. ज्वारी मध्ये चांगला परतावा मिळत असल्याने लागण क्षेत्र जोरदार वाढले. पाण्याच्या कमतरतेने उत्पादकता मात्र कमीच राहील असे वाटते. **बर्ड फ्लूचा प्रसार :-** आंध्रप्रदेशमधील नेल्लोर जिल्ह्यात बर्ड फ्लूचा प्रसार झाल्याचे स्पष्ट झाले आहे. तेथील अधिकाऱ्यांनी इन्फल्युएंझा व्हायरस मधील एच ५ एन १ चा प्रादुर्भाव झाला असल्याचे स्पष्ट केले. बर्ड फ्लूचा प्रादुर्भाव नियंत्रणात आणण्यासाठी तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ समिती स्थापन करून उपाययोजना करण्यासाठी आदेश दिले आहेत. बर्ड फ्लू पसरणार नाही यासाठी १ किलोमीटर परिसरातील पोल्ट्री, चिकन शॉप पुढील ३ महिन्यासाठी बंद केले जाणार आहे.

**कपाशीच्या भावात हलकीशी वाढ :-** लांब धाग्याच्या कपाशीवरील आयात कर हटविल्यामुळे भितीपोटी आवक वाढली होती. याचा थेट परिणाम भावावर झाला. मागील ४ दिवस आवक वाढल्यामुळे कपाशीच्या भावावर हलकासा दबाव दिसला. पण आज सकाळच्या सत्रात पुन्हा कपाशीच्या भावात वाढ होऊन भाव पुर्ववत झाल्याचे पाहवयास मिळाले. आज सकाळच्या सत्रात ६९०० ते ७००० रुपये प्रतिक्विंटल इतके भाव मिळाले. तर उच्चांकी ७३०० रुपये प्रतिक्विंटल पर्यंत तुरळक व्यवहार होताना दिसले. **इथेनॉलनिर्मितीसाठी मक्याचा वापर :-** इथेनॉल उत्पादन वाढविण्यासाठी उसाच्या रसाला पर्याय म्हणून मक्याचा जास्तीत जास्त वापर करण्यास प्रोसाहन देण्यात येत आहे. त्यासाठी नाफेड आणि एनसीसीएफ कडून २०२३-२४ या पीक वर्षात २,०९० रुपये प्रतिक्विंटल या किमान आधारभूत किमतीवर मका खरेदी केला जाईल तर डिस्टिलरीजना २,२९१ रुपये प्रतिक्विंटल या दराने मका पुरवठा केला जाईल. **भारत ब्रँड अंतर्गत आटा :-** केंद्र सरकारकडून भारत ब्रँड अंतर्गत आटाची विक्री नोव्हेंबर २०२३ पासून तर तांदुळाची विक्री ६ फेब्रुवारीपासून सुरु झाली आहे. आजपर्यंत भारत ब्रँड अंतर्गत सुमारे ३.५ लाख टन गव्हाचे पीठ आणि २० हजार टन तांदूळ विक्री झाली आहे. पुढील ३ ते ४ महिन्यात १५ लाख टन तांदूळ आणि १५ लाख टन गव्हाचे पीठ विक्री करण्याचा अंदाज वर्तविला जात आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# हंसराज अहीर यांचा प्रकल्पग्रस्तांकडून सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** केपीसीएलच्या बरांज कोळसा प्रकल्पातील शेतकरी, कामगार व कंत्राटदारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक करण्याकरिता सातत्याने पुढाकार घेवून या सर्व घटकांना न्याय मिळवून देण्यात महत्वाची भुमिका बजावत असल्याने दि. 23 फेब्रुवारी रोजी बरांज प्रकल्पातील शेतकरी व कामगारांनी भद्रावती येथील स्वागत सेलीबेशन हॉल येथे राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहीर यांचा भावपूर्ण सत्कार केला.


हंसराज अहीर यांनी दि. 21 फेब्रुवारी रोजी आयोगाच्या कार्यालयात केपीसीएल संचालक, नागपूर विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी चंद्रपूर यांची संयुक्त बैठक घेवून सुनावणी घेतली होती. या दरम्यान प्रकल्पग्रस्त, कामगार व कंत्राटदारांचे अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यात महत्वपूर्ण भुमिका पार पाडल्याने अहीर यांना प्रकल्पग्रस्तांनी सन्मानित केले.

याप्रसंगी शामबाबु महाजन, जमील शेख, दत्तात्रय गुंडावार, संतोष आमने, बरांज चे उपसरपंच रमेश भुक्या, उमाकांत गुंडावार, नरेंद्र जिवतोडे, प्रशांत डाखरे, प्रविण सातपूते, किशोर गोवारदीपे, अफझलभाई, अंकुश आगलावे, माधव बांगडे यांचेसह प्रकल्पग्रस्त शेतकरी बांधव बहुसंख्येने उपस्थित होते.

# ६ देशी पिस्तूलसह काडतूस जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर सहा देशी



पिस्तूलसह मॅगझीन, काडतूस जप्त करण्यात आले आहे. मध्यप्रदेशला लागून असलेल्या बुलढाणा जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात सोनाळा पोलिसांनी ही मोठी कारवाई केली. सोनाळा ( जिल्हा बुलढाणा ) पोलीस हद्दीतील टूनकी बुद्रुक ते लाडणापूर मार्गावरील केदार नदी नजीक एका युवकास पोलिसांच्या पथकाने ६ देशी पिस्तूल, ७ मॅगझीन, १ जिवंत काडतूससह पकडले. दरम्यान, आरोपी दूरवरच्या राज्यातील निघाला. वसीम खान इलियास खान ( वय २२, रा. सिंगार पुन्हाना, जिल्हा नूहू, हरियाणा ) असे आरोपीचे नाव असल्याचे चौकशीत निष्पन्न झाले. जप्त करण्यात आलेल्या पिस्तूलांची किंमत १ लाख ८० हजार रुपये आहे. पोलीस अधीक्षक सुनील कडासने यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय चंद्रकांत पाटील, कर्मचारी विनोद शिंबरे, राहुल पवार, शेख इम्रान यांनी ही कारवाई केली. दरम्यान आरोपी वसीम खान विरुद्ध शस्त्र अधिनियम सन १९५९ च्या कलम ३, २५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संग्रामपूर न्यायालयाने आरोपीस ४ दिवसांची कोठडी सुनावली आहे.

# गाडगेबाबांना टाकरखेड भागीले येथे अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगांव राजा :** संपूर्ण महाराष्ट्र आपल्या कीर्तनाच्या अमृतवाणीतून स्वच्छतेचा संदेश देत देव दगडात नसून माणसात शोधा असे प्रत्येक कीर्तनात विचार व्यक्त करणारे थोर राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची १४८वी जयंती टाखरखेड भगीले येथे जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

यावेळी सरपंच प्रतिनिधी रवींद्र भागिले यांनी गाडगेबाबा यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत उपसरपंच नितेश देशमुख, ग्रामपंचायत सदस्य सचिन भागीले, गणेश देशमुख, ज्ञानेश्वर भागिले, प्रल्हाद भानुसे, लक्ष्मीबाई भागिले, देविदास पटावकर, तंटामुक्ती अध्यक्ष राजाराम भागिले, शालेय समिती अध्यक्ष संतोष भागीले, ग्राम विस्तार अधिकारी संजय चौधरी यांच्यासह असंख्य महिला व पुरुष ग्रामस्थ उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपसरपंच नितेश देशमुख यांनी केले.





# म.फुलेनगर येथे विपश्यना केंद्राच्या कामाचा शुभारंभ आ. फारुख शाह यांच्या हस्ते संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनाअंतर्गत म.जोतिबा फुले नगर येथे विपश्यना केंद्र बांधणे या कामाचा शुभारंभ आ. फारुख शाह यांच्या शुभहस्ते तक्षशिला बुद्ध विहार,म.जोतिबा फुले नगर,मोगलाई येथे संपन्न झाला.निव्वळ भपकेबाज कार्यक्रम न घेता धुळे शहरातील सर्व घटकांचे सर्वांगीन विकासाचे ध्येय डोळ्यासमोर असल्यानेच विपश्यना केंद्र सारखा अभिनव प्रयोग राबविता आल्याचे प्रतिपादन आ.शाह यांनी केले.

मोगलाई तक्षशिला बुद्ध विहार,म. जोतिबा फुले नगर, येथे बुद्ध विहार मंडळाचे अध्यक्षआनंदा उशिरे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या कार्यक्रमात आ.फारुख शाह यांनी आपल्या भाषणात सांगितले की मी निवडून आल्यानंतर शहरात समस्यांची प्रचंड मोठी जंत्री होती.ही एकप्रकारे मनपातील सत्ताधारी आणि पूर्वाश्रमीच्या लोकप्रतिनिधींच्या अकार्यक्षमतेची पावती होती.त्यामुळे मला शहरातील नागरिकांच्या प्रश्नांबाबतीत चिंतन करावे लागले आणि त्यातून समस्यांची सोडवणूक करण्याचा मार्ग प्रशस्त झाला.निव्वळ रस्ते,गटारी,कुंपण भिंत,उद्यान,पथदिवे यासारखी कामे करून चालणार नाही तर शहराचा बौद्धिक चेहरा बदलण्यासाठी अभ्यासिका,विपश्यनागृहाची निमिर्ती आवश्यक आहे म्हणून शहरात दोन विपश्यना केंद्र आणि चार अभ्यासिका मंजूर करून आणल्यात आणि आज त्या प्रत्यक्षात येत असल्याने विशेष आनंद होत असल्याचे प्रतिपादन आ.फारुख शाह यांनी याप्रसंगी केले.

अड.विलास झाल्टे, इंजि.अविनाश थोरात, ॲड.मधुकर भिसे,सलीम शाह,माजी नगरसेवक नासिर पठाण,गणी डॉलर, सईद बेग,एस.यू.तायडे,आनंद लोंढे,साहेबराव लोंढे,किसन बागुल,हरिश्चंद्र लोंढे,देविदास जगताप,प्रभाकर खंडारे,गुलाबराव लोंढे,निजाम सय्यद,बी.यू.वाघ,मधुकर निकुंभे,शरद वेंदे,संजय अहिरे,ईश्वर खैरनार, जेतवन मोरे,प्यारेलाल पिंजारी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आनंद सैंदाणे यांनी केले तर आभार  रवी नगराळे यांनी मानले.यावेळी  यांनी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी  भगवान बागुल,चंद्रकांत बागुल,ईश्वर जाधव,चंद्रभान लोंढे,विलास भामरे,देविदास घोडसे,तेजस उशीरे,प्रशिक भामरे, योगेश बिऱ्हाडे, यतीन सरदार,मुकुंद भामरे,सचिन अहिरे,कुणाल अहिरे,गौतम बिऱ्हाडे,अरिहंत सरदार,शुभम भामरे,अविनाश शिरसाठ,यश पवार,रोहित निकम,शुभम अहिरे,शुभम नेरकर,विशाल केदार,रवींद्र वाघमारे,नितीन बागुल,अमोल भामरे यांनी परिश्रम घेतले.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंबाबत धमकीची पोस्ट करणारा तरुण पुण्यातून ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांचा मुलगा खासदार श्रीकांत शिंदे यांच्याबद्दल समाज माध्यमांवर धमकीचा संदेश अपलोड केल्याप्रकरणी पुण्यातून १९ वर्षीय विद्यार्थ्याला मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतले. आरोपीला मुंबईला आणल्यानंतर याप्रकरणी गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात येईल, असे सूत्रांनी सांगितले.

आरोपी संगणक क्षेत्रातील पदवीधर असून त्याने कॉम्प्युटर ॲप्लिकेशनमध्ये शिक्षण घेतले आहे. त्यामुळे त्याला संगणक तंत्रज्ञानाबद्दल चांगली माहिती आहे. आरोपी मूळचा नांदेड येथील रहिवासी असून तो सध्या पुण्यामध्ये राहतो. पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, गुंड कसे बनावयचे या विषयावर एक पोस्ट अपलोड करण्यात आली होती. त्याला उत्तर म्हणून या १९ वर्षीय तरुणाने एक पोस्ट केली होती. त्यात या मुलाने ज्याचे लक्ष्य मुख्यमंत्री असेल, त्याला मी बंदुक द्यायला तयार आहे, अशा आशयाची पोस्ट केली होती. ही पोस्ट पाहिल्यानंतर पोलिसांना एक तक्रार प्राप्त झाली. त्याची पडताळणी केली असता हा प्रकार गंभीर असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले. त्यामुळे तत्काळ याबाबत समाज माध्यमाच्या प्रतिनिधींशी संपर्क साधून संबंधित प्रोफाईलचा वापर करण्याऱ्याबाबतची माहिती पोलिसांनी घेतली. त्यावेळी संशयीत पुण्यामध्ये असल्याचे पोलिसांना समजले. त्यानुसार एक पथक तातडीने पुण्यात दाखल झाले. त्यांनी संशयीत तरुणाला ताब्यात घेतले.प्राथमिक चौकशीत त्याचा गुन्ह्यात सहभाग निष्पन्न झाल्यानंतर त्याला घेऊन मुंबई पोलिसांचे पथक मुंबईला निघाले आहे. मुंबईत आणल्यानंतर याप्रकरणी पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून आरोपीला अटक करण्यात येईल, असे सूत्रांनी सांगितले.



जलनायक पत्रकार शिवाजी घाडगे यांना राज्य शासनाचा वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार घोषित झाल्याबद्दल माजी सनदी अधिकारी दत्तात्रय कडु पाटील व प्रगतशील शेतकरी शिवराम पाटील यांनी स्नेह सत्कार केला.

# पुणे-नाशिक रेल्वेमार्ग शिर्डीमार्गे नेण्यास  विरोध

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** प्रस्तावित पुणे-नाशिक रेल्वे मार्गाच्या मूळ आराखड्यात बदल करत हा मार्ग संगमनेर तालुक्याऐवजी आता शिर्डीमार्गे वळवण्याचे नियोजन केले जात आहे. या मार्गाच्या मूळ आराखड्यानुसार तो संगमनेर तालुक्यातून जाणे अपेक्षित असताना ऐनवेळी हा बदल का केला, असा प्रश्न उपस्थित करत आमदार सत्यजित तांबे यांनी उपरोक्त मार्ग शिर्डीमागे नेण्यास विरोध केला आहे. या संदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची त्यांनी भेट घेतली. रेल्वेमार्गाच्या मूळ आराखड्यात कुठलाही बदल न करता तो संगमनेरमधून नेण्याची मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

पुणे-नाशिक या दोन महानगरांना जोडणारा रेल्वे मार्ग महारेलच्या माध्यमातून उभारण्याचा निर्णय सरकारने घेतला. हा मार्ग संगमनेर तालुक्यातून नेण्याचे नियोजन झाले होते.

# जीवन संघर्षाच्या वाटा व काटा



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

आधुनिक केसरी

**संघर्षाच्या वाटेवर जो चालणारा जग बदलत असतो. बारकाईने जर समाजाचे निरीक्षण केले तर आपल्या लक्षात असे येते. जीवनाच्या वाटेवर काटे असतातच, म्हणून प्रत्येकाला जीवन संघर्ष हा करावाच लागतो. सुखाच्या पाठीमागे दुःख उभी असते. आपले अस्तित्व टिकविण्यासाठी या पृथ्वीतलावर सर्व सजीवांना संघर्ष करावाच लागतो. त्यामुळे जीवनात वाटेबरोबर काटेही येतात-मानवी जीवनामध्ये व्यक्तीला अनेक वाटेने मार्गक्रमण करीत जावे लागते.प्रसिद्ध साहित्यिक इंद्रजीत भालेराव म्हणतात, काट्याकुट्याचा तुडवीत रस्ता। चल माझ्या गावाकडे दोस्ता. म्हणून काही वाटा सुखाच्या तर काही वाटा दुःखाच्या असतात. सर्वच वाटा सरळ नसतात. काही वाटा डोंगरदऱ्यातून,चिखल पाण्यातून, जाणाऱ्या अवघड व त्रास देणाऱ्या असतात.**

पलीकडे जाण्यासाठी त्या गरजेच्या असतात. म्हणून तुम्ही हिंमतीने त्या वाटेने जा. यश तुम्हाला नक्की मिळेल. वाटा आडवळणाच्या असल्या तरी त्या ओलांडून जावावे लागते. तरच तो मनुष्य यशस्वी होतो. भांडणांमध्ये अनेक जण म्हणत असतात .माझ्या वाटेला लागू नको? वाट ही एक संस्कृती आहे. तो एक विचार आहे.आम्ही सरळ मार्गी माणसे आहोत. असे काही जण बोलतात. म्हणून सज्जनहो. चांगल्याच वाटेने जा. तुम्ही जर हिमतीने वागले तर तुम्हाला या जगात किंमत येईल. नाहीतर तुम्ही पळपुटे व्हाल. त्यामुळे तुम्हाला इज्जत राहणार नाही. आपल्या वर्तनातून, कर्तुत्वातून आपली ओळख सर्वांना व्हावी, आपण आपल्या जीवनाचे शिल्पकार आहोत. जीवन जगते वेळेस एकही क्षण वाया घालू नका. कोणत्याही क्षेत्रात गेले तर विरोधक असतातच म्हणून आपले कार्य अर्धवट सोडू नका. सर्व ठिकाणी जाऊन तुम्ही मोठे व्हायचे असेल तर तुम्हाला श्रम करावे लागतील. तेव्हा तुमचे जीवन सत्यम ,शिवम, सुंदरम होईल. स्वतःला लेखन, वाचन,चिंतन करून ज्ञान वाढवावे,आणि नेहमी माणुसकीची पेरणी करावी, मोह.माया, मत्सर, अहंकार या विकारापासून दूर राहावे. आपण काहीतरी समाजाचे देणे आहोत. म्हणून या मातीचे पांग फेडावे. जननी जन्मभूमी स्वर्गापेक्षा मोठी आहे. जोपर्यंत माणूस जिवंत आहे तोपर्यंत सर्वासोबत आनंदाने वागावे, भेटीगाठी, गळाभेटी करून घ्याव्यात.एका विचाराने राहावेत हसून खेळून मौजमजा करून जीवन जगावं. माजू नये,उतु नये ,घेतलेला वसा टाकू नये, असे काही ठिकाणी वाचले आहे. विचार सुंदर ठेवा. माणूस मेले की लोक जवळ सुद्धा येत नाहीत. त्याच्या शरीराला स्पर्श सुद्धा करत नाहीत. म्हणून गर्वाच्या भोवऱ्यात अडकू नका. खोटी श्रीमंती दाखवू नका. लाचारीचे जीवन जगू नका,कोणालाही भीक मागून नका, त्यामुळे तुमची इज्जत जाईल. घराण्याची शान कमी होईल. तुमचा आजचा संघर्ष तुम्हाला उद्याचे सामर्थ्य निर्माण करून देईल .त्यामुळे विचार बदला म्हणजे तुमचे आयुष्य बदलेल. आयुष्य हे अनमोल आहे ते सुखाने जगा, कष्ट करून मिळालेले समाधान जगावेगळे असते.म्हणून कष्ट करा. तुम्ही इतरांना दोन वेळेस धोका देऊ शकता? पण तिसऱ्या वेळेस तो तुम्हाला जबरदस्त धोका देणारच? हे लक्षात असू द्या. ज्याच्या मनात नेहमी तिरस्कार असतो तो माणूस जीवनात समाधानी नसतो, हिटलर शेवटपर्यंत सुधारला नाही आणि अनेक लोकांचा त्यांनी बळी घेतला त्यामुळे तो कायमस्वरूपी दुःखी झाला ,इतरांना नको त्या शब्दात बोलू नका, चांगला विचार करा . सुखदुःखात जे आपल्या सोबत असतात त्यांना कधीही विसरू नका. साधी राहणी असली तरी विचार उच्च ठेवा. वागण्यात नेहमी नम्रपणा असावा. दुसऱ्या बद्दल मनात अढी ठेवून वागू नका, म्हणून जिथे वाटा आहेत तेथे काटे आहेत, ते काटे साफ करूनच आपल्याला पुढे जीवनात जाता येते. नसता आपण वाट सोडून देऊन बाजूने चालला तर तुम्हाला अनंत अडचणी येतात. म्हणून काट्यांना घाबरू नका. काटे झाडा आणि पुढे जा तेव्हाच तुमचे जीवन सार्थक होईल. स्वार्थीपणाने वागून दुसऱ्याचे ओरबडून खाऊ नका. दुसऱ्याविषयी मनात करुणा, दया ,भावना असू द्या. परोपकार करा मनात मायेचा ओलावा असावा.भावना शून्य वागू नका. आनंदाने ज्ञान मिळवा. डोंगरदऱ्याखोऱ्या फिरवून निसर्गाचा आनंद घ्या, आपल्यावर ज्याने उपकार केले त्यावर निष्ठा ठेवा, निष्ठा घालून तुम्ही मोठे होत नाही, निष्ठा काय असते हे जाणून घ्या ,म्हणून आपण शूर आहोत, धैर्य दाखवावे या जगात चुकणाऱ्यांना शिक्षा आहेच, असे समजू नका की आम्हाला कोणीच काही करू शकत नाही, म्हणून आयुष्यात लोकांची हांजी हांजी करून लाचारी पत्कारू नका. दुराभिमान अजिबात बाळगू नका. हे सर्व सांगण्याचं कारण काय ?

तर सध्याला माणुसकी कमी होत आहे, कोणीच कोणाला विचारायला तयार नाही, म्हणून तुम्ही स्वच्छ मनानं तुमचं जीवन जगा, नवनवीन विचाराने मार्गक्रमण करा, मात्र भूमीचे व मातीचे ऋण फेडावे, ढोंग करणाऱ्या कोल्हाचे ऐकू नका, माकडे उड्या मारतात दरवर्षी घरे बांधू म्हणतात, आज पर्यंत त्यांनी घर बांधले नाहीत, कष्टाची फळे गोड व मधुर असतात इमानदार लाकूडतोड्या या बोधकथा तुम्ही शिकून घ्या, तरच आपण पुढे जाऊ शकतो, दिव्याने दिवा लागत जातो आणि सगळीकडे उजेडच उजेड होतो, म्हणून हे जीवन सुंदर आहे. असे म्हटले जाते, या सुंदर जीवनाला गालबोट लागू देऊ नका, सज्जनहो त्यासाठी आपण आपली ओळख जगाला चांगल्या पद्धतीने दाखवा. कर्तुत्वांने मोठे व्हा, गाभाभूत घटकांचा अभ्यास करा ,श्रमप्रतिष्ठा, वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा, वैज्ञानिक दृष्टिकोन ,स्त्री पुरुष समानता एवढे जरी कळाले तरी तुमचे जीवन सार्थक व परिपूर्ण होईल ,जिथे आपली किंमत होते तिथे आवश्यक जा, आपल्या शब्दांला किंमत नाही, तेथे काही बोलू नका. आपण एखाद्या ठिकाणी गेल्यास तेथील लोकांना जर त्रास होत असेल तर तिथे जाण्याचं सुद्धा टाळा, जास्त संकटे येऊ लागल्यास दोन



पावलं माघार घ्या. काही फरक पडत नाही. सीर सलामत तो पगडी पचास अटीतटीची लढाई करून जीव गमावू नका. तह करून मार्ग काढा. ओव्हरटेक करताना विचार करा हे जीवन पुन्हा नाही. सर्वांसोबत होता होईल तेवढे गोड बोलून काम करून घ्या. तिरस्काराने खुन्नसपणाने कामे होत नाहीत, येशू ख्रिस्तांच्या पायावर खिळे जरी ठोकले तरी त्यांना हे प्रभू यांना क्षमा करा. असे म्हटले,हे वाक्य लक्षात असू द्या. क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्यावर सुद्धा मारेकरी आले होते त्यांनी त्यांचे विचार परिवर्तन केले म्हणूनच ते आज महात्मा झाले हे तुम्ही ओळखा मोठे होण्यासाठी मारामारीव भांडणे करून तंटे ,वाद विवाद करून पुरस्कार मिळत नाहीत. शांत राहून अभ्यास करून चिंतन, मनन करून तुम्ही पुरस्कार मिळू शकता, व्यासपीठावर बसू शकता, चांगल्यांच्या रांगेत जाऊ शकता म्हणून कार्य करीत रहा, चांगल्या वाटेने जा, काट्याशिवाय वाट नाही, श्रमा शिवाय प्रतिष्ठा नाही गुलाबाला सुद्धा काटे आहेत तरी आपण गुलाब तोडून घेतोच,म्हणून तर गुलाब हा फुलांचा राजा आहे. जिथे मोठेपणा आहे तेथे कष्ट सुद्धा आहेत. कष्टाविना फळ नाही, कष्टाविना राज्य नाही, टाकीचे घाव सोसल्या वाचून देव पण मिळत नाही, म्हणून सज्जनहो, चांगले वर्तन करा, दिसामाशी काहीतरी लिहीत राहा, अशी शर्यत लावा की दुसऱ्याला धक्का न लावता जिंका, दुसऱ्याला धक्का देऊन आपण जिंकू शकत नाही. त्यासाठी कार्य करीत रहा. फळ मिळत राहतील.अभ्यास करीत रहा यश हमखास मिळत राहील. उणे -दुणे काढून भांडणं करून कोर्टकचेऱ्या करून आज कितीतरी जण वेळ वाया घालून तुरुंगामध्ये आहेत. दररोज पेपर मधून आपण अनेक बातम्या वाचतो, छोट्या छोट्या गोष्टीवरून संयम न पाळता दोन वर्षाची तीन वर्षाची शिक्षा भोगत आहेत. म्हणून संयम पाळा, जमत नसेल तर बोलू नका .बोलून वाद करू नका. दुसऱ्याच्या मोठ मोठ्या इमारती बघून मनात वाईट विचार आणू नका. तुम्ही सुद्धा मोठे डिगऱ्या करून नोकरी लावून घेऊन त्यांच्या पेक्षा इमारती मोठ्या बांधा, स्वाभिमानाने जगा दुसऱ्यांनी ओढलेल्या रेषा पुसू नका, तुमच्या रेषा त्या रेषेच्या खाली मोठ्या ओढून नाव कमवा, मानवतावादी विचारांने गुण्यागोविंदाने वागावे,ऐकावे जनाचे करावे मनाचे, कारण लोक कोणालाही नावे ठेवतात. त्यांचा फायदा संपला की आपली चेष्टा करतात हे कटू सत्य आहे. शारीरिक लढाई पेक्षा विचारांची लढाई ही महत्त्वाची असते. विचाराच्या लढाईतून एकमेकाचे गुणदोष कळून येतात. आजच्या लेखांमध्ये एवढेच सुखी जगा, सुखी रहा, दुसऱ्यांना सुद्धा सुखाने जगू द्या. ही अपेक्षा.

# तुका म्हणे ऐसे माकडाचे छंद । अवघे धंदधंद सिंदळीचे ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**मानवाच्या उत्पत्तीपासून ते आजतागायत खरे बोलणाऱ्यांचे हालच झाले आहेत. खरे बोलल्यामुळे अनेकांना लाठ्याकाठ्या झेलाव्या लागल्यात एवढेच काय अनेकांना आपल्या प्राणास मुकावे लागले आहे. प्राणास मुकलेले कुणी वेडे, चोर, दरोडेखोर, मूर्ख लोक नव्हते तर ते महान क्रांतिकारक, कवी, लेखक, सुधारक होते. त्यांनी आपल्या नव्या विचाराने आपला भोवताल आणि येणारा काळ जागवण्याचा आणि लोकांमध्ये सर्वकाळ वैचारिक परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला, म्हणून त्यांना आपल्या प्राणाची बाजी लावावी लागली. त्याची पर्वा त्यांनी केली नाही. त्यात अगदी सॉक्रेटीस, येशू ख्रिस्तापासून ते आत्तापर्यंतच्या दाभोळकर-कलबुर्गी पर्यंतचे सर्व लोक सहजच आपल्या समोरून जातील.**

याच सत्यापायी अनेकांना गृहत्याग करावा लागला, त्यात अग्रस्थानी महान सत्यशोधक, संबोधि भगवान बुद्ध, महात्मा ज्योतीराव फुले आदि महामानव आहेत! यांच्याच रांगेत ज्ञानोबा, चोखोबा, एकोबा आणि तुकोबाही बसतात! यांनी आपल्या काळातील लोकांना उपदेश करण्याचा प्रयत्न केला आणि त्याच्या बदल्यात त्यांना अक्षरशः अंगावर विस्तवाचे लोट झेलावे लागले. त्यांना मानवी जीवन अनमोल आहे, हे जीवन सुंदर आहे(!) हे माहित होते. जसे

**पुनर्वित्तं पुनर्मित्रं पुनर्भार्या पुनर्मही । एतत्सर्वं पुनर्लभ्यं न शरीरं पुनः पुनः ॥**

या संस्कृत श्लोकांप्रमाणे माणसाला गेलेले धन पुन्हा प्राप्त होऊ शकते, मित्र पुन्हा मिळू शकतात, एवढेच काय पत्नी आणि गेलेली जमीन इत्यादी गोष्टीसुद्धा पुन्हा पुन्हा प्राप्त होऊ शकतात, परंतु माणसाचा जन्म पुन्हा मिळणे अशक्य आहे. हे सर्वच ज्ञान या लोकांनी त्यांच्या लोकोद्धारक ग्रंथातून प्रतिपादन केले असतांनासुद्धा या महान लोकांना आपले अनमोल मनुष्य जीवन का त्यागावे लागले असेल? त्यांच्यासमोर अशी कोणती परिस्थिती उद्भवली असेल, जेणे करून त्यांना या अनमोल, सुंदर जीवनाचा त्याग करावा लागला? ऐन तारुण्यात, विशी, तिशी, चाळीशीत कुणाला तरी एवढे सुंदर जीवन त्यागावे वाटते का? मरावे वाटते का? असा विचार येण्याचे कारण म्हणजे जवळपास या सर्वच महापुरुषांना अल्पायुष लाभले किंवा त्यांच्यावर मरण लादले किंवा अन्य काही प्रकाराने त्यांनी आपले जीवन त्यागले तर कुणी नाविलाजाने वेगवेगळ्या उपाध्यांनी आपल्या अनमोल जीवनास पूर्णविराम दिला. या महापुरुषांना आपले जीवन त्यागण्याची भावना का उत्पन्न झाली असावी? खरंच त्या त्या वेळी त्यांचे काय झाले असेल? त्यांच्या पश्चात त्यांच्या हित शत्रूंनी त्यांच्या निर्वाणाबाबत काही थोतांड अथवा कपोलकल्पित कथा-काव्य तर रचल्या नसतील? असा संशय नेहमीच बळावत असतो. यातीलच एक महापुरुष म्हणजे जगद्गुरू तुकोबाराय! एकही दिवस शाळेत न गेलेली ही माणसे आपल्या लेखनाने अत्युच्च पदवी संपादन करणाऱ्या माणसांच्या डोक्याला मुंग्या आणतात. कधी कधी तर त्यांचे अभंग, वाङ्मय काहीच कळत नाही, वाचल्यानंतर अक्षरशः डोक्याचा भुगा होतो; तरीही त्यांच्या लेखनाचा अन्वयार्थ लागत नाही. असीम उपजत विद्वत्ता घेऊन आलेली ही माणसे दुर्दैवाने अल्पायुषी ठरली. राजेशाही काळ, कुठलेही स्वातंत्र्य नसतांना आणि कडेकोट वर्णव्यवस्था असतांना या धुरिणांनी तत्कालीन थोतांड,




देव-धर्माच्या नावावर सामान्यांची पिळवणूक करणाऱ्यांची, बुवाबाजी, कर्मकांड, देवभोळेपणा, धर्माच्या नावाखाली निर्माण झालेला भिक मागेपणा यावर आपल्या शब्दरूपी चाबकांचे सडेतोड वार केले. समाजासमोर अनेक प्रश्न उपस्थित करून स्वतःला श्रेष्ठ समजणाऱ्या सर्वांनाच निरुत्तर करून टाकले. तुकोबा एक एक अभंग लिहितांना सगळ्या बाबींचा खरा खरा विचार प्रकट करतांना

**गांठोळीस धन भाकावी करुणा । दावूनि सज्जना कींव पीडी ॥१॥ नाठेळाची भक्ति कुचराचें बळ । कोरडें वोंगळ मार खाय ॥ध्रु.॥ सांडोव्यासी घाली देवाची करंडी । विल्हाळ त्या धोंडी पूजा दावी ॥२॥ तुका म्हणे ऐसे माकडाचे छंद । अवघे धंदधंद सिंदळीचे ॥३॥ (अभंग क्र.१२६३)**

असे अभंग लिहितात. तुकोबांचा हा अभंग वाचल्या नंतर आपल्याला सहजच प्रश्न पडतो की; तुकोबाराय ह्या सर्व उपाध्या, दुषणे कुणाला लावत असतील बरं? तुकोबांनी या अभंगात कुणावर तोफ डागली आहे? कुणाच्या कार्याची आणि खोटारडेपणाची लक्तरे तुकोबांनी वेशीवर टांगली आहेत? निश्चितच हा तुमच्या माझ्या संशोधनाचा विषय होऊन जातो. इथे तुकारामांना समाजातील सर्वच ढोंगी, खोटारडे, फसवे, वेषधारी साधू, स्वार्थी संत, बोलके समाजसुधारक उघडे पाडायचे आहेत. संत तुकारामांना अनेकवेळा धर्ममार्तंडांचा का मार खावा लागला? विचाररुपी अनमोल रत्नाची खाण असणारा अभंग गाथा का बुडवावा लागला? याची उत्तरे तुकोबांच्या या आणि अशा अनेक तीक्ष्ण, तेजोमय अभंगात सापडतात. प्रस्तुत अभंगाचा अर्थ म्हणजे, धनाच्या लोभाने लोकांसाठी प्रार्थना किंवा सज्जनपणाचा दिखावा करून (आव आणून) समाजातील चांगल्या, सामान्य लोकांना छळण्याचे काम करणारे भोंदू, थोतांड लोकांना तुकोबांनी इथे सुनावले आहे. खोटारडी म्हणजेच नाठाळ असणारे कुटाळखोर, कुचळ म्हणजेच घाणेरडे, दाखवेगिरी करणारे वेषधारी संत केवळ कोरडे पाषाण असून त्यांची भक्ती ओंगळवाणी असून ते सर्व केवळ आणि केवळ लोकांचा मार खाण्याच्या लायकीचे आहेत. या थोतांड लोकांची पूजा म्हणजे देवांना अंघोळ घालतांना सांडव्यात म्हणजेच नदीच्या प्रवाहात देव आणि देवाचा करंडा वाहून जाईल अशी आहे. त्यानंतर देव गायब झाले म्हणून हे भोंदू, साधू लोक नदीतून एखादा दगड उचलून आणून यजमानाला त्या बेवारस दगडाची पूजा करायला लावतील. त्याच्यावर कळस म्हणजे त्या नदीतून आणलेल्या दगडाच्या अनेक वेल्हाळ गोष्टी सांगून सामान्य लोकांची फसवणूक करतील. लोकांना भाकड कथांमध्ये गुंगवून त्यांच्याकडून मोठ्याप्रमाणात धन, धान्य वसूल करतील. एवढेच काय, सांडव्यात वाहून गेलेले देव पुन्हा जाऊन पाण्यात डुबकी मारून शोधून काढतील आणि त्यांना बाजारात विकतील. असे हे लोकांची फसवणूक करणारे खोटारडे साधू-संत-पुजारी हे खरे भक्त नसून हा त्यांचा केवळ माकड छंद आहे. माकड ज्याप्रमाणे खोट्या खोट्या वाकुल्या दिविते त्याप्रमाणे पूजा-अर्चेच्या नावाखाली हे साधू, भोंदू समाजाची, सामान्य, भोळ्या-भाबड्या लोकांची दिशाभूल, फसवणूक, पिळवणूक करणारे हे चोर, लुटारू, दरोडेखोर आहेत. यांचे हे सर्व पूजारुपी कार्य म्हणजे यांचे सिंदळीचे म्हणजेच बाहेरख्याली स्त्री सारखे धंदे आहेत! जगद्गुरू तुकोबाराय व्यवस्थेवर असा खतरनाक, घणाघाती हल्ला चढवतात, जिथे भल्याभल्यांची भंबेरी उडते. काय करावे? याला कसे उत्तर द्यावे? याचे खंडन-मंडन कसे करावे? काहीच सुचत नाही. तुकोबांची भाषा मोठी मार्मिक आणि उपरोधिक आहे. लिहितांना सहज सुचणारे शब्द आणि थोतांडांची होणारी पोलखोल हे नेहमीच वाचकांना अंतर्मुख करून जाते. असे खरमरीत अभंग लिहून तुकोबांनी आपल्या जीवनात अनेक संकटांना ओढवून घेतले आहे. त्या सर्वच संकटांची त्यांना जाण असूनही त्यांच्या लेखणीने खरे निपजण्याचे महान पुण्यकर्म केलेले आढळून येते. असे लिहिणे निश्चितच काही साधी बाब नव्हती.माय-बाप वाचकहो, आजही असे भोंदू, समाजाची पिळवणूक करणारे बाह्य वेषधारी बुवा-साधू-संत गावोगाव फिरताहेत. दिवसाढवळ्या लोकांच्या डोळ्यात माती टाकली जात आहे. एवढेच काय आज वारकरी संप्रदायसुद्धा याला अपवाद राहिला नाही, ही मोठी दुर्दैवाची आणि लाजिरवाणी बाब म्हणावी लागेल. आज गावोगाव वारकरी अखंड हरीनाम सप्ताहाचे पेव फुटले आहे. त्याच्या जोडीने टीव्ही, मोबाईलवर सगळीकडे भजन-कीर्तनाचा अक्षरशः महापूर लोटला आहे. आज सगळेच साधू-संत-बुवा-बाबा इत्यादी लोक एका क्लिकवर उपलब्ध झाले आहेत. काय करावे? कुणाला ऐकावे? कुणाचे अनुसरण करावे? कुणाला काहीही सुचायला तयार नाही. त्यासाठी वारकरी संप्रदायाचे पुनर्विलोकन, सिंहावलोकन आणि सखोल समीक्षण करण्याची वेळ येऊन ठेपली आहे असे मला वाटते. कोणत्याही विचार अथवा पंथाची सातत्याने समीक्षा होणे काळाची गरज आहे. मित्रहो, एकवेळ अखंड हरीनाम सप्ताहात पहाटे पहाटे मंडपभर श्री ज्ञानेश्वरी पारायण करणारांची गर्दी असायची. आज सप्ताह मंडपात पाहायला गेले तर व्यासपीठावर माईक घेऊन बसलेला एक व्यक्ती आणि समोर एक किंवा दोनच पारायण करणारे लोक दिसतील. ही मोठी चिंतेची बाब म्हणावी लागेल. दुसरीकडे सप्ताहातील दुपारचे तुकाराम गाथा भजन बंद झाले आहे. त्याची जागा भागवत कथा किंवा रामायण कथांनी घेतली आहे. ज्ञानेश्वरी आणि गाथा याचे सखोल अवलोकन व्हावे आणि तो विचार समाजमनात खोलवर रुजला जावा यासाठी पयत्न होणे गरजेचे असतांना हे दोन्ही मूळ ग्रंथ बाजूला जाऊन तिसरेच काहीतरी सुरु आहे. याशिवाय अशा अनेक आक्षेपार्ह बाबी वारकरी संप्रदायात मुळ धरत आहेत. आपण सर्वांनी वेळीच या सर्व विघातक बदलांना थांबवून पहिल्यासारखा निका-निखळ-साधा-सोपा वारकरी संप्रदाय, अखंड हरीनाम साप्ताह टिकवून ठेवावा लागेल. असे झाले आणि त्याच्या जोडीने तुकोबांच्या सर्वच अभंगांचे मूलगामी चिंतन-मंथन होऊन समाजमनाची खोलवर मशागत होणे म्हणजेच तुकोबांच्या अभंगांचे वर्तमानात महत्व आणि त्याच्या जोडीने या तुकाराम नीतीचे सार्थक झाल्याशिवाय राहणार नाही! जय तुकोबाराय!

# नवी कार्यसंस्कृती : नवे समाजशास्त्रीय आकलन



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**१९५६ साली स्थापन झालेल्या भारतीय जनसंघाने एक पर्यायी राजकीय संस्कृती विकसित करण्याचा प्रयत्न केला. या संदर्भात जनसंघाचे संस्थापक पं. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी प्रथमतः पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या तुष्टीकरणाच्या धोरणाला कंटाळून मंत्रिपदाचा राजीनामा दिला आणि हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व आहे अशी धारणा घेऊन त्यांनी भारतीय जनसंघाची स्थापना केली. काश्मिरात त्यांनी घटनेचे ३७० कलम रद्द करावे आणि जम्मू-काश्मिरचा विशेष दर्जा काढून त्याला इतर राज्याप्रमाणेच स्थान असावे या मागणीसाठी सत्याग्रह केला. त्यांची प्रखर राष्ट्रनिष्ठा, सर्वसंग परित्याग करण्याची वृत्ती यामुळे ते अजरामर झाले. श्रीनगरमध्ये कारावासात असताना त्यांच्यावर विष प्रयोगही झाले. त्यांनी तेथे कारावासात असतानाच मातृभूमीसाठी प्राणार्पण केले. 'एक देश दो निशान नहीं चलेंगे, एक देश दो प्रधान नहीं चलेंगे' ही त्यांची ठोस भूमिका होती. एका देशात दोन पंतप्रधान कसे ?**

एका देशात दोन राष्ट्रध्वज कसे? असा त्यांचा सवाल रास्त होता. त्यामुळे श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे ऐतिहासिक कार्य अजरामर झाले. त्यांच्या कार्याची स्मृती म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या दुसऱ्या टर्ममध्ये घटनेचे ३७० कलम रद्द करण्याचे जे अभिवचन दिले होते ते पूर्ण केले आणि २०१९ मध्ये घटनेचे ३७० कलम रद्द करण्याचे ऐतिहासिक धाडसी पाऊल टाकले.

भारतीय जनसंघाचे दुसरे धुरीण आणि राष्ट्रीय प्रश्नांचा मूलगामी विचार करणारे तत्वज्ञ पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी एकात्म मानवदर्शन हा नवा सिद्धांत मांडला. त्यांचे विचार अलिकडेच २० खंडामध्ये एकत्रित प्रकाशित करण्यात आले आहेत. तसेच त्यांचे 'राष्ट्रचिंतन' हे पुस्तक देशाच्या भवितव्याचा समग्र विचार करणारे आहे. त्यांनी महात्मा गांधी आणि मानवेंद्रनाथ रॉय यांच्या हिंदुत्व आणि क्रांतीकारी मानवतावाद या विचारांची गुंफण करून नवे दर्शन विकसित केले. त्यांनी मांडलेला एकात्म मानवतावादाचा सिद्धांत हा भारताला सर्वांगिण प्रगतीकडे घेऊन जाणारा ठरला आहे. त्यांनी हिंदुत्वाचे रूपांतर एकात्म मानवतावादात केले आणि मानवाचा संपूर्ण विकास करण्याची ताकद हिंदुत्व विचारात आहे हे त्यांनी सिद्ध केले. जटिल भारतीय समस्यांना अस्सल भारतीय उत्तरे देण्याचा त्यांचा प्रयत्न होता. या देशातील मातीमध्येच इथल्या प्रश्नांची उत्तरे आहेत त्यासाठी ॲडम स्मिथ किंवा कार्ल मार्क्सकडे पाहण्याची गरज नाही. भांडवलशाही व साम्यवाद लवकरच कालबाह्य होतील हे त्यांची भाकीत खरे ठरले. १९९१ मध्ये रशियात साम्यवाद कोलमडला आणि चीनमध्ये आचके देत आहे. भारतामधील शेती, उद्योग, शिक्षण, आरोग्य, सुरक्षा अशा अनेक क्षेत्रात त्यांनी मूलगामी प्रश्नांची मूलगामी उत्तरे शोधली. त्यांनी मांडलेली अंत्योदयाची कल्पना ही विकासाचे नवे प्रमेय घेऊन पुढे आली. त्यांच्या अंत्योदय विचारांचा यशस्वी सफल प्रयोग प्रथमतः राजस्थानमध्ये भैरवसिंग शेखावत यांनी केला आणि भैरूबाबा राजस्थानचे तीन वेळा मुख्यमंत्री बनले आणि अखेर भारताच्या उपराष्ट्रपती पदापर्यंत पोहोचले. ज्या समाजावस्थेतून ते आलेले होते आणि ज्या संस्कारातून ते पुढे आले होते ते दीनदयाळ उपाध्याय यांचे संस्कार त्यांना राष्ट्राच्या सर्वश्रेष्ठ पदापर्यंत घेऊन जाणारे ठरले. अटलबिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण अडवानी यांनी दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रेरणेने देशसेवेचा वसा घेतला. दीनदयाळजी असे म्हणत असत, 'मला दहा अटलबिहारी वाजपेयीसारखे तरूण द्या मी देशाचे चित्र बदलून दाखवेन.' अटलजींनी सुशासनाचा एक उत्तम आदर्श साडेचार वर्षाच्या कार्यकाळात निर्माण केला. त्यांनी 'इंडिया शायनिंग' हे सूत्र घेऊन पुन्हा निवडणूक लढविली. पण त्यांच्या विचारांचे मर्म आणि महत्त्व त्या काळामध्ये मतदारांना कळले असते तर भारतीय जनता पक्ष पुनःश्च निवडून आला असता तर वाया गेलेली १० वर्षे केव्हाच भरून निघाली असती आणि भारत तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आजच झाला असता. परंतु नियतीला ते मंजूर नव्हते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४, २०१९ आणि आता २०२४ साली शिवधनुष्य इतके समर्थपणे उचलले आहे ही त्यामुळे परिवर्तनाची पहाट उदयास आली आहे. ज्याला आपण १९७७ साली दुसरे स्वातंत्र्य म्हणत होतो आणि २०१४ साली तिसरे स्वातंत्र्य असे म्हटले जात होते आता २०२४ मध्ये स्वातंत्र्याच्या सुवर्णयुगाचा अमृतकाळ आलेला आहे. या अमृतकाळामध्ये एक नवे आव्हान उभे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत मंडपममध्ये भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय अधिवेशनात प्रारंभीचे भाषण आणि नंतर निरोपाचे भाषण या दोन्ही भाषणांमध्ये या नव्या कार्यसंस्कृतीचा विचार यथार्थपणे मांडला आहे. तो नवयुगाचा जाहीरनामा आहे. भारतीय सांस्कृतिक क्रांतीची पहाट आहे. रिफॉर्म, परफॉर्म आणि ट्रान्सफॉर्म म्हणजेच सुधारणा, कृती आणि परिवर्तन ही तीन सूत्रे घेऊन त्यांनी २०१४ मध्ये कामकाजाला सुरूवात केली. परिवर्तनाचे रणशिंग फुंकले. संसदेत प्रवेश करताना लोकशाहीच्या मंदिराचे दर्शन घेऊन ते असे म्हणाले होते की, तीन पिढ्यांच्या समर्पणातून आणि त्यागातून हे सुवर्ण क्षण आले आहेत. त्या सर्व कार्यकर्त्यांच्या व शहीदांच्या मातृभूमीच्या सेवेसाठी त्यांनी केलेल्या त्यागाच्या परिश्रमातून हे फलित आले आहे आणि ते सर्वसिद्धीस नेण्याचे अभिवचन त्यांनी दिले. २०१४, २०१९ आणि आता २०२४ या तीन टप्प्यावर त्यांनी देशामध्ये ५० कोटी लोकांना दारिद्र्यरेषेच्या बाहेर काढले आहे. शिवाय त्यांनी लाखो तरूणांना रोजगार देण्यासाठी म्हणून नियुक्ती पत्रे दिली आहेत. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी त्यांचा आग्रह आहे. शेतकऱ्याला एम्. एस्. पी. म्हणजे मिनीमम सपोर्ट प्राईज देण्यासाठी त्यांनी केवढे प्रयत्न केलेत तेवढे भारतामधल्या कुठल्याही डाव्या किंवा समाजवादी सरकारने केलेले नाहीत ही काळ्या दगडावरची रेघ आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेती आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी केलेल्या प्रयत्नामुळेच आज डि.बी. टी. द्वारे शेतकऱ्यांना थेट सबसिडी हस्तांतरित होत आहे. पिक विमा योजनेच्या विविध नमुनेसुद्धा त्यांच्याच काळात साकार झाले आहेत. सेंद्रीय शेतीमधील अद्‌भुत असे प्रयोग आता भारतामध्ये इतके यशस्वी झाले आहेत की, शेतकऱ्यांचा मोठा वर्ग आता या शेतीकडे वळायला लागला आहे.

ई-मंडी किंवा देशभरामध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा इंटरनेट पद्धतीने विविध बाजारपेठा विकसित करून वस्तू व सेवा यांना रास्त भाव देण्यासाठी म्हणून त्यांनी केलेल्या प्रयत्नास इतिहासात तोड नाही. त्यामुळे अन्नधान्य, भाजीपाला, दुध उत्पादन यामध्ये भारत पहिल्या क्रमांकावर पोहोचत आहे व पोहोचला आहे हे सुद्धा आपण नमूद केले पाहिजे. देशातील छोटे आणि मध्यम उद्योग कोरोना काळामध्ये तग धरू शकले, उभारी घेऊ शकले आणि आज उद्योग क्षेत्रामध्ये जगात मंदी असताना भारतामध्ये मात्र समृद्धी आहे हे कसे घडले ते म्हणजे योग्य वेळी उद्योगधंद्यांना आर्थिक मदत, त्यांच्या समस्यांकडे विशेष लक्ष आणि जगाच्या बाजारपेठेमध्ये भारताच्या वस्तू, सेवा यांची निर्यात करण्यासाठी केलेला प्रयत्न.

'मेक इन इंडिया' चळवळीमुळे भारत आत्मनिर्भर होऊ शकला आहे. युरोपात इंग्लंड असो की अन्य देश असोत मुक्त व्यापारासाठी भारताने केलेले करार हे विविध देशांना प्रोत्साहित करणारे आहेत. अमेरिका, कॅनडा, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी इ. देशांशी असलेला पूर्वीचा व्यापार आता दुपटीने वाढला आहे. भारताच्या आर्थिक सामर्थ्यामुळे भारत जगामध्ये आज पाचव्या क्रमांकाच्या स्थानावर पोहोचला आहे आणि पुढील तीन वर्षात तो तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याच्या तयारीत आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी काळात भारताने केलेली ही एक दैदीप्यमान कामगिरी भारताला आत्मनिर्भर बनविण्यासाठी उपयुक्त ठरली आहे. आत्मनिर्भर भारताचे चार स्तंभ म्हणून शेतकरी, महिला, युवक आणि गरीब माणूस या चार घटकांचा विचार केल्यास पंतप्रधानांनी दिलेले वचन पूर्ण केले आहे. तसेच त्यांनी विकासाचे नवे तत्त्वज्ञान दिले त्यामध्ये समानता, शाश्वतता, सर्वसमावेशकता आणि सक्षमीकरण या तत्त्वांचा समावेश आहे. याशिवाय पंतप्रधान मोदी यांच्या मते, आत्मनिर्भर भारताचे पाच स्तंभ असून त्यामध्ये मजबूत अर्थव्यवस्था, सुविकसित संरचना आणि प्रगत तंत्रज्ञानावर आधारित नवी विकास प्रणाली तसेच गतिमान कार्यक्षम लोकसंख्या आणि मनुष्यबळाचा विकास यांचा समावेश होतो. त्या सर्वांच्या सबलीकरणावर निर्मला सितारामन यांनी नुकत्याच सादर केलेल्या अर्थसंकल्पात भर दिलेला आहे, पंडित दीनदयाळ उपाध्याय म्हणत असत, क्या मला स्थिर ध्रुव म्हणून काम करावयाचे आहे. भारतीय जनसंघ एक स्थिर सरकार देईल स्वतःचे परराष्ट्र धोरण, आर्थिक धोरण, शिक्षण धोरण असेल आणि ते स्वहितावर आधारलेले असेल. भांडवलशाही किंवा साम्यवाद यांचे आम्ही अंधानुकरण करणार नाही. आम्ही स्वावलंबी होऊ. स्वतःच्या प्रमेयावर आधारून आम्ही निर्धाराने वाटचाल करू.

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या एकात्म मानवतावादातील हा स्वावलंबनाचा मंत्र मोदी यांनी अनुसरला आणि त्यांनी आत्मनिर्भर भारताच्या दिशेने पाऊल टाकले. तसेच खादीला दिलेले समर्थन असो, लघुउद्योगांना दिलेला पाठिंबा असो किंवा महिला उद्योजकांना केलेले सहाय्य असो किंवा संरक्षण, उत्पादन क्षेत्रात घेतलेली प्रचंड झेप असो या सर्व गोष्टी दीनदयाळ उपाध्याय यांच्या आर्थिक सिद्धांतावर आधारलेल्या आहेत, ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. भारत मंडपममध्ये पंतप्रधानांनी केलेले भाषण हे याच सिद्धांताचा उच्चरवाने पुरस्कार करणारे आहे. त्यांनी म्हटले, मी स्वतःचे घर बांधले नाही पण कोट्यावधी गरीबांची घरे बांधू शकलो, यातच मला समाधान आहे. पहिल्या आरंभाच्या भाषणात आणि नंतर निरोपाच्या भाषणात त्यांनी भारतीय जनसंघाचे पायाभूत तत्त्वज्ञान आणि त्याची भारतीय जनता पक्षाने केलेली पाठराखण याबद्दल प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे कार्यकर्त्यांचे मनोबल वाढवले आहे, नवे चिंतन घडविले आहे. तसेच डॉ. हेडगेवार, मा. स. गोळवलकर गुरुजी, बाळासाहेब देवरस, राजेंद्रसिंह, सुदर्शनजी आणि मोहनजी भागवत या सर्वांच्या विचारातून संघाने जो आदर्श ठेवला त्या आदर्शाचे पालन करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. काळाचा प्रवाह बदलला. राजकारणीही बदलले. पण संघाचे तत्त्वज्ञान मात्र ध्रुवासारखे अढळ राहिले. त्यात कालानुरूप बदल झाले त्यामुळे हा ध्रुवतारा अधिक तेजस्वी बनला. स्वयंप्रकाशी बनला. भारत जगामध्ये आज न भूतो न भविष्यती प्रगती करत आहे. त्यामुळेच अमेरिकेचे



परराष्ट्रमंत्री ब्लिंकेन यांनी एके ठिकाणी असे म्हटले आहे की, राष्ट्रजीवनाच्या सर्व क्षेत्रामध्ये भारताची आश्चर्यकारक प्रगती पाहता, काहीतरी भारताच्या राष्ट्रजीवनात एक नवे मन्वंतर घडत आहे. नवे चैतन्य उदयास येत आहे ही गोष्ट लक्षात घ्यावी लागेल.आयोध्येत प्रभू रामचंद्राच्या मंदिराची प्राणप्रतिष्ठा झाली या प्रसंगी पंतप्रधानांनी केलेले भाषण हे सखोल आत्मचिंतन करणारे होते. तसेच त्यांनी आपल्या दुसऱ्या भाषणात भारत मंडपममध्ये सांगितलेला विचारसुद्धा पूजनीय डॉ. हेडगेवार आणि दीनदयाळ उपाध्याय यांच्या विचारांवर एक नवी इमारत बांधणारा ठरला आहे. 'ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालासे कळस असे संत बहिणाबाईंनी म्हटले होते त्या पद्धतीने 'हेडगेवारे रचिला पाया दीनदयाळ झालासे कळस' असे म्हणावे लागेल. तेव्हा गोळवलकर गुरुजी यांचे विचारधन असो, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे राष्ट्रचिंतन असो किंवा निर्मला सितारामन यांनी अर्थसंकल्पात घेतलेला दीनदयाळ यांच्या विचारांचा वसा असो त्यातून प्रकटणारे राष्ट्राचे चैतन्य प्रत्येक कण आणि क्षण जिवंत करणारे ठरले आहे.

देशातील सर्वात शेवटच्या माणसाची सेवा करण्याचे वचन दीनदयाळ उपाध्याय यांनी दिले होते. ते म्हणत असत की, भविष्यकाळामध्ये भारताला एक नवे पर्यायी असे तत्त्वज्ञान विकसित करून त्या तत्त्वज्ञानाच्या आधारे आपण आपले राष्ट्रजीवन चैतन्यदायी स्वरूपात विकसित केले पाहिजे हा त्यांचा मंत्र मोदी यांनी स्विकारला आणि ग्रामोदयातून भारत उदय ही कल्पना खुद्द दीनदयाळ उपाध्याय यांच्या जन्मगावापासून मथुराजवळील एका खेड्यामधून त्यांच्या जन्मशताब्दी दिनी पंतप्रधानांनी सुरू केली आणि ती कल्पना साकार केली. मोठी स्वप्ने केवळ पाहायची नसतात तर ती कृतीमध्ये आणायची असतात हे त्यांनी ओळखले. त्यामुळे तुम्ही स्वप्ने पहा, संकल्प करा, ते सिद्धीस नेण्याची खात्री आम्ही देतो हा त्यांचा विचार आत्मविश्वास जागृत करणारा ठरला आहे.

भारतीय जनसंघाबद्दल पेनसिल्व्हेनिया विद्यापीठातील प्रो. क्रेझ बेक्स्टर यांनी लिहिलेल्या 'द जनसंघ' या संशोधनपर ग्रंथात असे म्हटले होते की, हा पक्ष भारताला नव्या यशशिखराकडे घेऊन जाईल. त्यात सेवा आणि समर्पणावर आधारलेली नवी पर्यायी राजकीय संस्कृती भारतामध्ये विकसित करण्याचे सामर्थ्य आहे, असे त्यांनी नमूद केले होते. भाजपला लोकपक्ष बनविण्याचे श्रेय दीनदयाळ उपाध्याय यांच्या स्वयंभू प्रमेयाला द्यावे लागेल. काळाचा प्रवाह बदलला. हिंदुत्वाचे रूपांतर बाळासाहेब देवरस यांनी नवहिंदुत्वात केले. त्यांनी सामाजिक समरसतेचा विचार मांडला आणि मोहन भागवत यांनी जाती व्यवस्थेचा अंत असो की समाजातील उच्चवर्गीयांची मिरासदारी असो ती संपवण्याचे सुद्धा वचन दिले. परिणामी, देश, समाज आणि संस्थात्मक जीवनात बदल घडवून आणण्यासाठी संघाने प्रत्येक कार्यकर्त्याच्या रूपाने जे मिशन किंवा जीवनकार्य प्रस्थापित केले ते आता साकार होत आहे. येणाऱ्या भविष्यकाळात भारताला एक उज्ज्वल, बलशाली आणि संपन्न राष्ट्र बनविण्यासाठी करावयाच्या प्रयत्नाची सुरूवात भारत मंडपम येथे झालेल्या पंतप्रधानांच्या भाषणातून झाली आहे यात शंका नाही.

स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये एक नवी राजकीय संस्कृती विकसित होत आहे आणि ही राजकीय संस्कृती ध्येयवादावर, मूल्यनिष्ठेवर आणि समर्पणावर आधारलेली आहे. ही गोष्ट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत मंडपम येथे केलेल्या दोन भाषणांतून प्रकट होते. स्वातंत्र्य मिळाले तेव्हा शहीदांनी मातृभूमीविषयी काही स्वप्ने बाळगली होती आणि या स्वप्नांची सरफरोशांनी व्यक्त केलेल्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी ध्येयवादी कार्यकर्त्यांची एक मोठी फळी आवश्यक आहे हे लक्षात घेऊन डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी १९२५ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. डॉक्टरांनी सांगितले, या विराट समाज पुरुषामध्ये राष्ट्रचैतन्य जागृत केल्याशिवाय हा समाज खडबडून जागा होणार नाही. त्यासाठी त्यांनी त्याग, सेवा आणि समर्पणावर आधारलेल्या कार्यकर्त्यांची एक मजबूत फळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून उभी केली.

मा. स. गोळवलकर गुरुजींनी विचारधन दिले. त्यातून ५६ वेगवेगळ्या क्षेत्रात सेवाकार्य सुरू झाली. वनवासी कल्याण आश्रम असो, विश्व हिंदू परिषद असो की भारतीय मजदूर संघ असो किंवा अखिल भारतीय विद्यार्थी परिषद असो या सर्व संघटना एकेक क्षेत्रात घट्टपणे पाय रोवून उभ्या राहिल्या आणि त्या त्या क्षेत्रात त्या यशाच्या पहिल्या शिखरापर्यंत पोहोचल्या. या काळात पंडित श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी भारतीय जनसंघाची स्थापना केली आणि भारतीय जनसंघाने संघाच्या हिंदुत्वाचे रसायन स्विकारले आणि देशभक्तीचा आधार घेऊन एक नवीन संस्कृती विकसित करण्याचा प्रयत्न केला.

कालिकत येथील अधिवेशनात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी म्हटले होते की, 'राजा असो की रंक, अमीर असो की गरीब, झोपडीत राहणारा माणूस असो की पंचतारांकीत हवेलीत राहणारा माणूस असो त्या सर्वांच्यापर्यंत विकासाची मधुर फळे पोहोचविणे ही आमची सर्वांची जबाबदारी आहे. शेवटच्या गरीब व कष्टकरी माणसापर्यंत विकासाची फलिते पोहोचविणे हाच अंत्योदयाचा खरा अर्थ आहे. '

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी भारतीय समस्यांना भारतीय उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला. त्यांना माहित होते की, भारतासारख्या विकसनशील राष्ट्राला साम्यवाद किंवा भांडवलशाहीचे विचार पुरेसे परवडणारे नाहीत. आपल्याला गरज आहे, ती नव्या दृष्टीने जगाकडे पाहण्याची. हे लक्षात घेऊन त्यांनी हिंदुत्वाचे रूपांतर एकात्म मानवतावादाच्या वटवृक्षात केले आणि इंटिग्रेटेड ह्युमॅनिझम किंवा एकात्म मानवतावादाच्या आधारे देशाच्या सर्व जीवनात त्यांनी परिवर्तनाचा आग्रह धरला. शेती, उद्योग, शिक्षण, आरोग्य, सुरक्षा अशा कितीतरी क्षेत्रात त्यांनी मांडलेले विचार त्यांच्या राष्ट्रचिंतन या ग्रंथामध्ये प्रकट झाले आहेत. प्रा. शर्मा यांनी संपादन केलेल्या पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या विचारांचे २० खंड अभ्यासले असता, त्यांची भाषणे, त्यांनी विविध वृत्तपत्रांतून लिहिलेले लेखन, त्यांचे चिंतन पाहिले की आपणांस खरोखर थक्क व्हावेसे वाटते. कारण ते चंद्रगुप्त मौर्याची थोरवी सांगतात, त्या आद्य शंकराचार्यांच्या समाज सुधारणावादी हिंदुत्व विचारांचे कौतुक करतात आणि एवढेच नव्हे तर इतिहासाची सहा सोनेरी पाने ज्यांनी ज्यांनी पाहिली त्या प्रत्येक सोनेरी पानाचा ते नवा अर्थ सांगतात. त्यांची भाषणे, त्यांचे स्फुट लेख, त्यांचे छोटेखानी ग्रंथ आणि त्यांचा आता २० खंडातील प्रकट विचार हे सांगतो की, 'भारताला अनुकरणाची गरज नाही. स्वावलंबनाची गरज आहे.' हे सूत्र घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भर भारताची पायाभरणी केली. त्यांनी त्याचे पाच स्तंभ वर्णन केले आहेत. तसेच त्यांनी माझ्या दृष्टीने हे चार वर्गच फार महत्त्वाचे आहेत असे सांगितले. त्यामध्ये शेतकरी असो, तरुणांचा वर्ग असो, महिलांचा वर्ग असो, उद्योजक असो या सर्व चार स्तंभांच्या आधारे आम्हाला आमच्या देशाचे चित्र बदलावयाचे आहे असे त्यांनी सूचित केले. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे क्रांतदर्शी विचार त्यांनी जी - २० शिखर परिषदेच्या निमित्ताने खरोखर कृतीमध्ये आणले. 'वसुधैव कुटुम्बकम्' हे या परिषदेचे घोषवाक्य होते. चीनच्या विरोधाला न जुमानता हे त्यांनी ठामपणे ठासून सांगितले. त्यावेळी सर्वानुमते संमत झालेला जाहीरनामा जर आपण वाचला तर त्यामध्ये दीनदयाळ उपाध्याय यांच्या विचारांचे प्रतिबिंब उमटले असल्याचे दिसून येते. भविष्यकाळामध्ये देशाला अधिक बलवत्तर, अधिक संपन्न, अधिक सामर्थ्यवान करावयाचे असेल तर आपणास पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या मार्गाने जावे लागेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेला खादीचा विकास असो, संरक्षण, उत्पादन क्षेत्रामध्ये घेतलेली गगनभरारी असो, सूर्य व चंद्रावरील अवतरण असो किंवा त्यांनी लघुउद्योजकांना केलेले सहाय्य असो, महिला उद्योजकांच्या संघटनासाठी त्यांनी केलेले प्रयत्न असोत या सर्वांचा आधार कशामध्ये असेल तर पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या एकात्म मानवतावादी विचारांत आहे. तसेच बाळासाहेब देवरस यांचा समरसतेचा विचार समाजातील दुःखी कष्टी लोकांना एकत्र आणणारा ठरला आणि या समरसतेच्या विचारांच्या आधारेच अन्य मागासवर्गीय जमातीच्या कल्याणाचीही योजना विश्व कर्माच्या रूपाने साकार झालेली आहे.

उस्ताद सारखी अल्पसंख्यांकांची विकासयोजना असो किंवा विश्वकर्मासारखी बौद्ध तत्वज्ञानावर आधालेली योजना असो या दोघांचा आधार कोण असेल तर दीनदयाळ उपाध्याय यांचा आर्थिक विचार आहे ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे.

महिला उद्योजकांनी आज मोठ्या प्रमाणात उद्योग क्षेत्रामध्ये नवी क्रांती घडवून आणली आहे. या महिला उद्योजकांना प्रेरणा देऊन त्यांना मुद्रा योजनेत समाविष्ट करून घेणे असो किंवा महिला उद्योजकांना देशाच्या विविध क्षेत्रामध्ये भक्कम करण्यासाठी त्यांची शंभर कोट्याधीश किंवा लक्षाधिपती महिलांच्या विकासाची सूची तयार करण्याच्यादृष्टीने पंतप्रधानांनी केलेले प्रयत्न लक्षणीय ठरले आहेत. नजीकच्या भविष्यकाळामध्ये भारतामध्ये सर्व क्षेत्रामध्ये एक नवा विक्रम करून देशाला प्रगतीच्या यश शिखरावर घेऊन जाण्याचा संकल्प महत्त्वपूर्ण आहे. जय जवान व जय किसान या घोषणेला वाजपेयींनी जय विज्ञानाची जोड दिली तर मोदी यांनी त्यास जय अनुसंधानची जोड दिली. नव्या शैक्षणिक धोरणात भारतामध्ये संशोधन प्रतिष्ठान (इंडियन रिसर्च फौंडेशन) स्थापन करण्यात आले आहे. श्री. मोहनजी भागवत यांनी सबंध भारतामध्ये अल्पसंख्यांकांच्या कल्याणासाठी विविध पद्धतीने रचनात्मक कार्याला सुरूवात केली आहे. आतापर्यंत जे काही लोक नुसते बोलत होते त्याचा आदर्श न ठेवता प्रत्यक्ष कृती व कार्यक्रमाची यशस्विता असते हे लक्षात घेऊन त्यांनी या क्षेत्रात केलेले कार्य अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे. गंगेचा प्रवाह अखंडपणे वाहतो आहे आणि तो वाळूच्या कणाबरोबर सोन्याचे कण मागे ठेवत आहे. कालचक्र सतत फिरत असते. परंतु फिरत असलेल्या या कालचक्राला इतिहासाची जाणीव करून देण्याचे काम थोर पुरुषांना करावे लागते आणि ते कार्य दीनदयाळ उपाध्याय, डॉ. हेडगेवार, श्री गुरुजी आणि बाळासाहेब देवरस यांनी केले आहे. त्यांच्या दूरदृष्टीला आपण प्रणाम करूयात आणि त्यांचे विचार कृतीमध्ये आणण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे आपण स्वागत करूयात. ही दोन भाषणे त्यातील पाच तत्वे अत्यंत महत्त्वाची आहेत. पहिले तत्त्व म्हणजे भारतीय प्रश्नांना भारतीय उत्तरे शोधली पाहिजेत. दुसरे तत्त्व म्हणजे आपणास सामान्य माणसाच्या सक्षमीकरणावर भर दिला पाहिजे. तिसरे महत्त्वाचे तत्त्व म्हणजे रोजगार निर्मिती असो, उद्योग क्षेत्र असो या प्रत्येक क्षेत्रात स्वतःच्या भारतीय दृष्टीने काम केले तरच बदल होऊ शकतो. चौथी महत्त्वाची गोष्ट म्हणजे भविष्यकाळामध्ये कोणी रोजगार देणार नाही आपणास स्वतः स्वतःची रोजगार निर्मिती करावी लागेल आणि ती करण्यासाठी म्हणून भारतीय विचारावर आधारित रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे आणि पाचवे आणि सर्वात महत्त्वाचे तत्त्व म्हणजे शहरे आणि खेडी यातील अंतर भरून काढण्याचा प्रयत्न करणे. हा प्रयत्न करून पंतप्रधान मोदी यांनी दाखविलेली दृष्टी खरोखर लक्षणीय आहे. देशातील अप्रतिम रस्त्यांचे जाळे, तिप्पट वाढलेली विमानसेवा, रेल्वे मार्गाचे अत्याधुनिकीकरण ही सर्व उपलब्धी म्हणजे अमृतकाळातील चैतन्य होय. तेव्हा भविष्यकाळामध्ये भारताला एक महासत्ताक बनविण्याचे स्वप्न घेऊन कार्य करणाऱ्या लाखो कार्यकर्त्यांविषयी त्यांनी व्यक्त केलेला विश्वास एवढेच सांगतो की, 'आओ, हम सब मिलकर हाथ बढाये, इस धरतीपर स्वर्ग बनाये. '


# वीरांगणा कैकेयी

आधुनिक केसरी

**नि.रा.पाटील हे साहित्य क्षेत्रातील एक सन्माननीय नाव.अनेक ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. अगदी अभ्यासपूर्ण लिखाण.त्यासाठी कितीही कष्ट करण्याची तयारी. लेवा गणबोली शब्दकोश, लक्ष्मण, उर्मिला, लेवा अन्वयार्थ, महाराष्ट्रातील किल्ल्यांवरील पुस्तक अशा अनेक पुस्तकांची संपत्ती गाठीशी असलेले नि रा पाटील सर प्रसिद्धीपासून तसे लांबच राहतात. खरे तर साहित्य क्षेत्रात दोनतीन पुस्तके लिहून उड्या मारणारे अनेक स्वयंघोषित दिग्गज आज जागोजागी दिसत असतांना नि रा पाटलांसारख्या व्यक्ती मात्र कसल्याही सवंग प्रसिद्धीच्या मागे न लागता आपली साहित्य सेवा अखंड करत आहेत.त्यांच्या हातून ही साहित्य सेवा अशीच सुरू राहो.**

आज सरांचा कैकयी हा ग्रंथ वाचला.पुस्तकात हरवून जाणे काय असते ते आज ख-या अर्थाने कळाले. रामायणातील प्रत्येक पात्र हे श्रेष्ठ आहे अगदी रावण सुध्दा.पण कैकयी मात्र नेहमीच टिकेचीच धनी झाली आहे.असे पात्र अभ्यासून त्याला योग्य न्याय या कादंबरीत देण्याचा यशस्वी प्रयत्न लेखकाने केला आहे.एकूण ३४ संदर्भ ग्रंथांचा अभ्यास करून कैकयी व कैकयीशी संबंधीत केकयनरेश,दशरथ महाराज, महाराणी कौसल्या,लक्ष्मण, ऊर्मिला,मांडवी,भरत या सर्वांनाच विस्तृतपणे मांडले आहे.केकयनरेश व रूपगर्विता शुभलक्षणा यांची सौंदर्यवती कन्या कैकयी सर्वसामान्य दृष्टीकोनातून पाहिल्यास खलनायिकाच वाटते पण या कादंबरीतून कैकयी नव्याने समजत जाते.राणायणातील तिची भुमिका उमजत जाते.एकांतातील क्षणांदरम्यान केकयनरेश आपल्याला पशूपक्षांची भाषा समजते ही गोष्ट शुभलक्षणेला सांगू शकत नाही तेव्हा सुरू होते रामायण. शुभलक्षणा सोडून गेल्यानंतर कैकयीसाठी धाराऊ दायी म्हणून मंथरा कैकयीच्या आयुष्यात येते.मुख्य रामायण घडण्याआधी त्यातील पात्रांच्या या उपकथा ही तेवढ्याच महत्वाच्या आहेत.व त्या सखोलपणे मांडण्यात लेखक यशस्वी झाले आहेत. दोन महिन्यांची असतांनाच शुभलक्षणेच्या मातृप्रेमाला पारखी झालेली कैकयी व तिचे सात भाऊ मंथरेच्या वात्सल्य छायेखाली मोठे होतात.लाडात वाढलेली कैकयी अल्लड व खोडकर असली तरी निष्कपट होती हे वेळोवेळी उदाहरणांसकट लेखक विस्तृत करतात.याच खोडकरपणामुळे कैकयीला ऋषीमुनींचा शाप मिळतो की तुझ्या कृष्णकृत्यांनी तुझ्या पतीला प्राण गमवावे लागतील व तुझे सुंदर तोंड काळे समजून कुणी पाहणार नाही.कैकयीच्या या विवाहपूर्व घटना तिच्या पुढील आयुष्यावर परिणाम करतात. लेखकाने इथे मांडलेला एक प्रसंगही पुढील रामायणाची मुहूर्तमेढ आहे व त्याबद्दल कैकयीच पूर्ण अनभिज्ञ आहे. लेखकाने अगदी बारीक सारीक तपशील ही सखोल मांडला आहे.दशरथ कौसल्या विवाह विस्तृतपणे व सौंदर्यपूर्ण मांडला आहे. कुठेही एकाच प्रसंगात अडकून न पडता कादंबरीची प्रवाहितता समतोल ठेवली आहे.कैकयीशी संबंधित प्रत्येक घटनेला योग्य न्याय दिला आहे. बलाढ्य राजा दशरथ शूर, दानशूर,न्यायी असले तरी त्यांच्या हातून कळतनकळत घडलेल्या चुकासापेक्ष घटना भविष्यावर परिणाम कारक ठरतात.कैकयीच्या वडिलांना दिलेले वचन, श्रावण बाळाचा वध व त्याच्या आईवडिलांनी दिलेला शाप,पुत्रलालसेपोटी आपली व कौशल्याची मुलगी शांता हिला दत्तक देणे अशा अनेक गोष्टींचा विस्तृत उल्लेख या पुस्तकात आढळतो.सुमित्रेशी झालेल्या विवाहातच तिचे तात महाराज सौमित्र यांच्याशी होणारा वाद व आयुष्यभरासाठी सुमित्रेचे माहेराला मुकणे या घटना ही पुढच्या रामायणावर परिणामकारक ठरतात. कादंबरी जसजशी पुढे सरकत जाते तसतसा कैकयी बद्दलचा पिढ्यान पिढ्या भरलेला राग गळून पडतो. कैकयी अगदीच निरपराध,निरागस जाणवते.भावाने तिच्यासाठीच कोपभवन का बांधून घेतले हा विचार जेव्हा तिच्या मनात येतो तेव्हाही ती निरागसपणेच ते विचार मनातून झटकून लावते.रामायणातील प्रत्येक प्रसंग प्रत्येक पात्राच्या दृष्टीकोनातून सविस्तर व सखोल मांडण्यात लेखक यशस्वी झाले आहेत.

या कादंबरीत सर्वच पात्र स्वसंवाद साधत मांडलेली आहेत.अशा मांडणीसाठी लागणारी दूरदृष्टी,कौशल्य लेखकाकडे भरभरून आहे. लेखकाची लेखनशैली आपल्याला अनेक गाजलेल्या ऐतिहासिक कादंबरींची आठवण करून देते. अभ्यासुवृत्तीचा पिंड असलेले,संवेदनशील नि रा पाटील सर अशा ऐतिहासिक विषयांमध्ये नेहमीच



रमलेले असतात.या कादंबरीत नायिका कैकयीच्या एका चुकीने तिच्या नशिबात आलेली सामाजिक अवहेलना, निंदा, सामाजिक घृणा किती योग्य किती अयोग्य हे प्रत्येक पात्राच्या दृष्टीने मांडतांना लेखक कुठेही पक्षपाती होत नाही. विचारपुर्वक,सजकतेने, प्रगल्भपणे केलेली प्रामाणिक मांडणी हेच या कादंबरीच्या यशाचे गमक आहे. प्रत्येक पात्र घडणा-या घटनेकडे प्रगल्भतेने बघतो व लेखकही ते तेवढेच दमदारपणे मांडतो. घडणारे प्रसंग, चिंतन, मंथन, बोधामृत, सारासार विचार, सवती सवतींचे प्रेम, एकमेकांवरील विश्वास, जीवनामृत ह्या सर्वांचा सर्वांगसुंदर मेळ छान बसला आहे. कौसल्या,सुमित्रा,कैकयी यांचा एकमेकांवरील विश्वास, प्रेम,आदर मांडतांना दुसरीला आपल्या आरशात बघ्रतांना या तिन्ही राण्या आधी स्वतः ही त्या आरशात डोकावताना दिसतात.त्यामुळे रूढीपरंपरागत सवतीभाव मात्र कुठेही दिसून येत नाही.या कादंबरीत लेखक प्रत्येक पात्राचा दृष्टीकोन सविस्तर मांडतात.अगदी मांडवीचा सुध्दा.राम लक्ष्मण व सीता यांच्यामानाने भरत,सुमित्रा,मांडवी तसे दुर्लक्षितच पण लेखक या कादंबरीत त्यांना योग्य न्याय देताना दिसतात.आयुष्यभर रूपगर्विता,दशरथप्रिया,शुर,उत्तम व्यवस्थापक, रणांगणधुरीणी,हुशार म्हणून जगलेली कैकयी पुत्रप्रेमापोटी म्हणा किंवा पुढील घटनांसाठी नियतीने खेळलेला खेळ म्हणा एका क्षणात कुलक्षणी, कुलकलंकिनी ठरते.एक विरांगना क्षत्राणी खलस्त्री ठरते.आयुष्यभर नितीने मार्गक्रमण करणारी कैकयी नियतीच्या एका घावाने कलंकित होते.एक विरांगणा क्षत्राणी ते निर्भर्त्सनेचे विष पचवणारी कैकयी रामाच्या धेयपुर्तीसाठी युगानुयुगे खलनायिका ठरते. कैकयीचेही रामावर तेवढेच प्रेम असते.त्यामुळे त्यावेळी होणारी तिची घालमेल लेखकाने अचूक टिपली आहे.मांडवीने मांडलेल्या घटना आपल्याला रामायणातील इतर घटनांचा संदर्भ देतात व आपल्याला रामायणाशी जोडून ठेवतात.

या कादंबरीत राम जन्मापासून ते वनवासाला जातात तोपर्यंतचा प्रवास वर्णन केलेला आहे.या सगळ्यात राम लक्ष्मण संबंधापेक्षा राम भरत,राम कैकयी ही नाती इथे जास्त अभ्यासली गेली पाहिजे व ही गोष्ट लेखक नि रा पाटील चांगलेच ओळखून आहेत म्हणून ते या नात्यांतील विस्तृतपणा सखोलपणे मांडतात.त्यांची सुक्ष्म चिंतनशील वृत्ती , सुयोग्य मांडणी,भाषेची प्रवाहीतता सखोल संपूर्ण संशोधन, संदर्भ ग्रंथांचे विपूल वाचन यामुळे ही कादंबरी साहित्य क्षेत्रात नक्कीच मैलाचा दगड ठरेल.विश्वकर्मा प्रकाशनने प्रकाशित केलेली ही कादंबरीला प्राचार्य डॉ.श.रा.राणे यांची प्रस्तावना लाभली आहे.उत्कृष्ट वातावरणनिर्मिती,उत्कट प्रसंग, सुंदर शब्दपेरणी, तटस्थ दृष्टीकोन,सखोल चिंतन, काळानुरूप भाषाप्रवाह व संदर्भ, यामुळे ही कादंबरी वाचकांच्या मनावर आपली एक विशिष्ट छाप सोडते.

नि रा पाटील दादांच्या पुढील लिखाणासाठी शुभेच्छांसह प्रतिक्षेत.....

**कादंबरी _ कैकयी**
**लेखक_ डॉ.नि रा पाटील**
**प्रकाशक_ विश्वकर्मा प्रकाशन**
**किंमत _ ४०० रुपये**

सौ. माधुरी चौधरी संभाजीनगर
९४२१८६०८७३

# ऐतिहासिक ग्रंथ : ' खान्देशातील आंबेडकरी चळवळ खंड-२'



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**आंबेडकर चळवळीचा इतिहास हा देदीप्यमान आणि मार्गदर्शक आहे. तो आजच्या पिढीला, तरुणांना, कार्यकर्त्यांना निश्चितच दिशादर्शक ठरावा म्हणूनच खान्देशातील आंबेडकरी चळवळीचा दुसरा खंड प्रकाशित झाला आहे. एक नाविन्यपूर्ण ग्रंथ म्हणून 'खानदेशातील आंबेडकरी चळवळ खंड -२' हा ग्रंथ प्रा. गौतम निकम,प्रा. डॉ. सतीश मस्के, प्रतापराव साळुंखे, डी.एस.घोडेस्वार, वैशाली निकम आदींनी विमलकीर्ती प्रकाशन, चाळीसगाव च्या माध्यमातून प्रकाशित केला आहे. हा ग्रंथ चळवळीतील कार्यकर्त्याला, लेखकाला, संशोधकाला दिशा देणारा, मार्गदर्शन करणारा ठरेल यात शंका नाही.**

खान्देशातील आंबेडकरी चळवळ खंड -२' यामध्ये पंधरा प्रकरणाची मांडणी करून खानदेशातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा, आंबेडकरी चळवळीचा व आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांच्या कार्याचा इतिहास उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. आंबेडकरी विचार सर्व दूर पसरावा, पेरावा व त्यातून समाज जागृती घडावी, समाजात परिवर्तन व्हावे, चैतन्य निर्माण व्हावे म्हणूनच स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर खान्देशात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, कोर्ट केस, अन्याय अत्याचाराच्या कामाबाबत आले होते. त्या त्यावेळी त्यांनी इथल्या कार्यकर्त्यांना, समाजाला मार्गदर्शन केले आहे. थोरगव्हाण ता.रावेर जि. जळगाव, चाळीसगाव, असोदा, धुळे, जळगाव, जामनेर, नेरी, शेंदुर्णी, बोदवड, वरणगाव, एदलाबाद, सावदा, यावल, भुसावळ, अमळनेर इत्यादी गावांना भेटी देऊन, वसतिगृहाला भेटी दिल्या. प्रचारसभा घेतल्या. न्यायालया त कोर्ट केस जिंकून न्याय मिळवून दिला. एवढेच नाही तर रावेरच्या महारवाड्यात जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुलांना शिकवा, स्वच्छ रहा, स्वच्छ कपडे घाला, गावकीची कामे करू नका, गुरे ओढू नका असा उपदेशही केला. या सर्व विषयांचा आढावा यामध्ये म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे खान्देशातील दौरे आणि दस्तऐवज या पहिल्या प्रकरणात घेतला आहे. अस्पृश्य, कनिष्ठ वर्गाची जी हिन दीन अवस्था आहे. मृतप्राय जिने जगणे त्यांच्या वाट्याला येत आहे. मध्यम वर्गातल्या ज्या काही चळवळी आहेत त्या त्यांच्याकडे ढुंकूनही पाहत नाहीत. त्यांच्यासाठी काहीच कार्य करत नाहीत. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत असे की, अस्पृश्य वर्गाच्या हिताचे संरक्षण करणारी त्यांच्यात जागृती आणि उन्नती करणारी, त्यांच्यात आलेल्या शिथिलतेपासून व औदासिन्यापासून त्यांची सोडवणूक करून त्यांच्यात चैतन्य आणि अन्यायाच्या चिडीचा संचार करणारी एखादी संस्था असावी म्हणून त्यांनी २० जुलै १९२४ साली ' बहिष्कृत हितकारणी सभा ' स्थापन करून कार्य करण्यास सुरुवात केली. त्यांच्या या बहिष्कृत हितकारणी सभेमार्फत खानदेशात विविध ठिकाणी वसतिगृह उघडून समाजाला प्रगतीचा रस्ता दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर त्यांनी नंदुरबार, जळगाव,भुसावळ, चाळीसगाव, धुळे अशा विविध ठिकाणी जी काही समाज जागृतीची विविध कार्य केले. या विषयीची माहिती दुसऱ्या म्हणजेच ' बहिष्कृत हितकारणी सभेचं खानदेशातील कार्य आणि दस्तऐवज ' या प्रकरणात दिली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजाचे दमन, शोषण, दास्य मोठ्या प्रमाणावर होत असे. या सर्वातून अस्पृश्य समाजाची मुक्ती व्हावी म्हणून लढण्यासाठी शूर, शिस्तबद्ध व निग्रही कार्यकर्त्यांची लढवय्ये सैनिकांची गरज म्हणून त्यांनी ' समता सैनिक दला ' ची स्थापना २० मार्च १९२७ रोजी केली. हिंदू समाजातील स्पृश्य बांधवाकडून अस्पृश्य मानलेल्या समाज बांधवांवर होणाऱ्या अन्याय,अत्याचार,जुलूम, विषमता याला आळा बसण्याकरिता या दलाची स्थापना केल्याचे स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले. याच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्पृश्योध्दाराच्या चळवळीला यशस्वी करण्यासाठी धुळे (पश्चिम खान्देश) च्या कार्यकर्त्यांनी तन मन धनाने कार्य केले आहे. त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची संपूर्ण चळवळ यशस्वी करण्यासाठी धुळ्याचे समता सैनिक दल, जयभीम व्यायामशाळा, मिल चाळ, बलभीम महात्मा गायकवाड संघ, समतावादी दलित मंडळ, प्राणयज्ञ दल अग्रेसर होते. धुळे आंबेडकरी चळवळीचा बालेकिल्ला आहे. समता सैनिक दलाचे कॅप्टन व जयभीम व्यायाम शाळेचे वस्ताद कॅप्टन भीमराव चांगदेव साळुंखे, अण्णासाहेब लळिंगकर, दादासाहेब गायकवाड या घटनांचे साक्षीदार आहेत हे या खंडाच्या तिसऱ्या प्रकरणात मानले आहे. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १५ ऑगस्ट १९३८ साली ' स्वतंत्र मजूर पक्ष 'स्थापन केला. या पक्षाने पक्षाच्या घटना कायद्यानुसार निवडणूकीत भाग घेण्यास सुरुवात केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अत्यंत व्यापक दृष्टिकोन बाळगून सर्व मजुरांना, दलितांना, कष्टकऱ्यांना, शेतमजुरांना विकासाचा मार्ग दाखविणारा कार्यक्रम ठरविला होता. या पक्षाच्या माध्यमातून पक्षाचा जाहीरनामा प्रकाशित केला. याविषयीची ही माहिती या खंडात दिली आहे. त्याचबरोबर १९ जुलै १९४२ साली 'अखिल भारतीय दलित फेडरेशन 'स्थापन करण्यात आला. यामध्ये सार्वजनिक कल्याणाला महत्त्व दिले. ही एक राजकीय संस्था आहे. तिची तत्त्वे, पक्षाचे धोरण, पक्षाचा कार्यक्रम व विविध प्रश्नांचा आढावाही या खंडामध्ये घेतला आहे. याविषयीचीही सविस्तर अशी माहिती प्रकरण पाच-सहा मध्ये सविस्तर दिली आहे. अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजाची उन्नती करण्यासाठी त्यांच्या हातात राजकीय सत्ता देण्यासाठी धडपड करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. त्याचबरोबर स्पृश्य समाजाचा होत असलेल्या अन्याय अत्याचार धुडकावून लावणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य उत्तुंग आहे. म्हणून त्यांना नाशिक रोड येथील अस्पृश्य मानलेल्या वर्गातील नागरिकांनी १२ ऑक्टोंबर १९५६ रोजी दिलेले मानपत्र ही यामध्ये दिले आहे. जे मानपत्र मा. दादासाहेब गायकवाड यांच्या हस्ते अर्पण करण्यात आले. त्याचबरोबर सन्माननीय श्री. एन शिवराज, अध्यक्ष, अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष यांनीही धुळे येथे भेट दिली त्यांनाही दिलेले आय.जी.शहा यांचेही पत्र यामध्ये दिले आहे.




डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या प्रत्येक चळवळीत, आंदोलनात जळगाव जिल्हा हा अग्रेसर राहिलेला आहे.'स्वतंत्र मजूर पक्ष'स्थापन होण्याच्या अगोदरही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सहकार्याने, मार्गदर्शनाने काहीजण लोकल बोर्ड, नगरपालिका व ग्रामपंचायत यामध्येही प्रतिनिधी म्हणून निवडून आले होते. त्यामुळे धनाजी बि-हाडे, दिवाण चव्हाण, शामराव जाधव, रायला निकम, नामदेव सोनवणे, के.एल. तायडे, के.आर. वानखेडे, देवचंद मेढे, काशिनाथ वाघमारे अशी बरीच मंडळी विविध चळवळीत सहभागी होती. दौलत गुलाजी जाधव निवडणुकीत विजयी झाले. याबाबतची माहिती ही जयसिंग वाघ यांनी लेखात दिली आहे. आंबेडकरी चळवळीने सातत्याने समाजातील शोषित समूहाचा विचार केला. त्यामध्ये अस्पृश्य, आदिवासी, भटके विमुक्त, इतर मागासवर्ग, स्त्रिया आदींचाही समावेशी होतो. भिल्ल जमाती सामाजिक दृष्ट्या मागास आहे. भिल्लांच्या सामाजिक प्रश्नांची जाणीव आंबेडकरी चळवळ करत होती.

याविषयी'जनता'मुखपत्रात लिहूनही आले होते. दलित परिषदेत आदिवासींचा सहभाग होता.याविषयीची ही मांडणी डॉ. सुनिता सावरकर यांनीही या ग्रंथातील आपल्या लेखात मुद्देसूदपणे केली आहे. खानदेशात सत्यशोधक चळवळ ही खेड्यापाड्यात जाऊन पोहोचली होती. या सत्यशोधक समाजाचे २२ वे अधिवेशनही १९९१ साली बोराडी ता. शिरपूर जि. धुळे येथे भरले होते. या अधिवेशनाचे संयोजक स्वागत अध्यक्ष धुळे जिल्ह्याचे सत्यशोधक समाजाचे प्रमुख कार्यकर्ते व्यंकटराव रणधीर होते. ते फुले शाहू आंबेडकरी विचार सर्वसामान्य पर्यंत पोहोचत असत. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार, तत्त्वज्ञान आणि चळवळीची ढग आणि रग सर्वसामान्य पर्यंत घेऊन जाण्याचे कार्यही समाजप्रबोधनात्मक जलसा चळवळीने केली आहे. याच सत्यशोधकी व आंबेडकरी जलशांचे लोक खान्देशात पोहोचले होते. या खानदेशातील सत्यशोधक चळवळीविषयी व आंबेडकरी जलसा विषयाची माहिती डॉ. भगवान ठाकूर यांच्या लेखातून दिली आहे. त्याचबरोबर खान्देशात कामगार चळवळ, स्त्री चळवळ, प्रशिक सारखी विद्यार्थी चळवळही आंबेडकरी विचाराने जोमाने काम करत होती. विषमता, अन्याय, अत्याचार आणि गुलामी नष्ट करण्याचा प्रयत्न करत होती. या विषयीची माहिती ही पुरुषोत्तम पारधी यांनी त्यांच्या लेखात दिली आहे.

अस्पृश्य समाजाची सुधारणा करावयाची असेल, त्यांच्या प्रश्नांनवर आवाज उठवायचा असेल तर वृत्तपत्राची गरज असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जनता, बहिष्कृत भारत,मूकनायक, प्रबुद्ध भारत इत्यादी वृत्तपत्रे काढून समाज जागृती केली आहे. स्वतःही अग्रलेख लिहून समाजाला दिशा दिली आहे. त्याचप्रमाणे खानदेशातही आंबेडकरी विचारधारेंचे काही वृत्तपत्र चालवले जात असायचे. त्यातून आंबेडकरी विचार पसरविला जात असे. त्याचबरोबर खान्देशात 'दलित भारत'हे वृत्तपत्रही निघत असे. या अंकातील अग्रलेखाविषयीची भूमिका ही किशोर मेढे यांनी सविस्तरपणे सांगितले आहे. त्याचबरोबर इतर नियतकालिकांची यादीही यामध्ये जोडली आहे. त्याचबरोबर खान्देशात आंबेडकरी चळवळीच्या इतिहासाची साक्ष देणारे दस्तऐवज 'विमल कीर्ती'व'खानदेश चौफेर'या नियतकालिकाचाही वाटा फार मोठा आहे. याविषयीची माहिती आपल्या लेखातून प्रा. डॉ. सतीश मस्के यांनी दिली आहे. खान्देशातील प्रकाशित आंबेडकरी निवडक साहित्याचीही यादी यामध्ये दिली आहे. खान्देशातील अस्पृश्य जातीत मोठ्या संख्येने महार लोक होते. या जातीतील लोकांना अस्पृश्यतेची कामे करणे बंधनकारक केले होते. ते दूर करण्यासाठी आंबेडकरी चळवळीने केलेले कार्यही अत्यंत महत्त्वाचे आहे. महाड चवदार तळे व खान्देश, मंदिर प्रवेश सत्याग्रह, नाशिक मंदिर प्रवेश सत्याग्रह व खान्देश या संदर्भातील माहिती लेखक प्राचार्य डॉ. मी.ना.पाटील यांनी दिली आहे. खान्देशातील शैक्षणिक स्थिती, खान्देशातील अस्पृश्यांची शैक्षणिक स्थिती, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराच्या घोषणेचा खान्देशातील दलित समाजावर झालेला परिणाम याविषयीचा महत्वपूर्ण आढावाही प्राचार्य डॉ. मी.ना. पाटील यांनी घेतला आहे. बौद्ध महासभेचे कार्य खान्देशातील जळगाव या ठिकाणी १९५६ पासून सुरू केले. भारतीय बौद्ध महासभेच्या विविध शाखा विविध ठिकाणी स्थापन करून जळगाव, धुळे व नंदुरबार या ठिकाणीही जनजागृतीचे कार्य जोरदारपणे सुरू केले. त्याचबरोबर भुसावळ येथे ९ वे महाराष्ट्र बौद्ध साहित्य संमेलन भरवले. या संमेलनाचे अध्यक्ष डॉ. म.ना. वानखेडे हे होते. या संमेलनानंतर खानदेशामध्ये साहित्य निर्मिती होऊ लागली. बौद्ध साहित्यही निर्माण होऊ लागले. त्याचबरोबर कविरत्न वामनदादा कर्डक यांचाही मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

# पुणे ट्रॅफिक कोंडीमुक्त बनवण्याचा निर्धार : देवधर

## राष्ट्रसंत गाडगेबाबांच्या जयंतीदिनी 'समरसता सेवा पुरस्कारांचे' वितरण

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवार, २३ फेब्रुवारी रोजी पुण्यातील परीट समाजाच्या ज्येष्ठांचा तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांचा 'समरसता सेवा पुरस्काराने' सन्मान करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाची संकल्पना मांडणारे भाजपा नेते सुनील देवधर यांनी आपल्या मनोगतात ट्रॅफिक, प्रदूषणमुक्त पुण्याचा निर्धार व्यक्त केला. पुण्याला आंतरराष्ट्रीय स्तरावरील पर्यटनस्थळ बनवण्यासाठी सर्वांनी एकत्रित कार्य करूया असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

शुक्रवारी, वानवडी स्थित महात्मा फुले सांस्कृतिक भवनात राष्ट्रसंत गाडगेबाबा जयंती समारोह समितीने आयोजित केलेल्या या कार्यक्रमप्रसंगी माजी खासदार प्रदीप रावत, पुणे शहर अध्यक्ष धीरज घाटे, माजी आमदार जगदीश मुळीक, युवा नेते कुणाल टिळक, अभिनेते अजिंक्य देव, ओबीसी शहर अध्यक्ष नामदेव माळवदे, सामाजिक समरसता मंचाचे नंदकुमार राऊत, संजय गाते, दिनेश होले, लहुजी वस्ताद समाधी समितीचे सुखदेव अडागळे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने पुणेकर नागरिक उपस्थित होते. संत गाडगेबाबा वर राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त चित्रपट बनवणारे प्रसिद्ध ज्येष्ठ सिनेदिग्दर्शक पद्मभूषण राजदत्त आणि पुणे महापालिकेचे माजी उपमहापौर परीट समाजाचे नेते नाना नाशिककर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. राज्यसभेच्या नवनियुक्त खासदार डॉ. मेधाताई कुलकर्णी यांचा देखील विशेष अभिनंदनपर सन्मान करण्यात आला. यासमवेत १०० पेक्षा अधिक स्वच्छता करणाऱ्या हातांना यावेळी सन्मानित करण्यात आले.संत गाडगेबाबा यांनी समाज जागृतीचे मौलिक कार्य केले. ज्येष्ठ दिग्दर्शक राजदत्त यांनी बनवलेला 'देवकी नंदन गोपाला' हा चित्रपट पाहिला आणि गाडगेबाबा यांच्या विषयी अधिकची माहिती झाली. त्याचप्रमाणे गाडगेबाबा यांच्याकडूनच प्रेरणा घेऊन तरूणांनी पंढरपूर वारी दरम्यान निर्मलवारी सुरु केली. याच पार्श्वभूमीवर आपणही स्वच्छता राखून, पुण्याला स्वच्छ आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील पर्यटनस्थळ बनवूया, असा निर्धार सुनील देवधर यांनी यावेळी व्यक्त केला. कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहिलेले भाजपा राष्ट्रीय ओबीसी मोर्चाचे अध्यक्ष डॉ. के. लक्ष्मण यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या अनेक योजनांच्या माध्यमातून राष्ट्रसंत गाडगेबाबांचे स्वप्न कसे साकार करीत आहेत ते विस्ताराने सांगितले. यावेळी बोलताना माजी आमदार जगदीश मुळीक म्हणाले, " पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छता अभियान सुरु केले. आता आपल्याला येणाऱ्या काळात २०२७ सालापर्यंत पुण्याला स्वच्छ शहर बनवायचे आहे. त्याचप्रमाणे पुणे शहरात सुनील देवधर सातत्याने काम करत आहेत. विविध कार्यक्रम राबवत आहेत. ते पुण्याचेच आहेत. प्रचारक म्हणून त्यांनी पुर्वोत्तर राज्यांत काम केले आहे. त्यासाठी त्यांचे अभिनंदन करतो."

राज्यसभा खासदार म्हणून मला पक्षाने संधी दिली असून, हे पुणेकरांचेच आशीर्वाद आहेत, येणाऱ्या काळात पुण्यातील कामासाठी प्रामाणिकपणे काम करेन", अशा भावना राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांनी व्यक्त केल्या. यावेळी माजी उपमहापौर नाना नाशिककर म्हणाले की, "पुरस्कार देऊन ज्यांचा आज आपण सन्मान केला, ती सर्व मंडळी गेली अनेक वर्ष समाजाचे काम करत आहेत. गाडगेबाबांच्या विचारांचे हे कार्य असेच अविरत सुरु ठेवावे!" परीट समाजातील या स्वच्छता करणाऱ्या माता भगिनींना सन्मानित केल्याबद्दल त्यांनी सुनील देवधर आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे आभार मानले! कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मंदार खराडे यांनी केले.

# मतदार जनजागृतीकरिता धावले चंद्रपूरकर

## 'रन फॉर व्होट' मिनी मॅरेथॉनचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** 'एक मत..लोकशाही बळकटीकरणासाठी, नागरिकांच्या उज्वल भविष्यासाठी' या संकल्पनेवर आधारीत जिल्हा प्रशासन चंद्रपूरच्यावतीने आयोजित 'रन फॉर व्होट' मिनी मॅरेथॉनच्या माध्यमातून चंद्रपूरकरांनी मतदार जनजागृतीचा संदेश दिला. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, ताडोबा व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्रीय संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर, सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रंजित यादव, उपवनसंरक्षक श्वेता बोड्डू, निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार, जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्याम वाखर्डे, संग्राम शिंदे यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, विद्यार्थी आदींनी मिनी मॅरेथॉनमध्ये आपला सहभाग नोंदविला. याप्रसंगी मार्गदर्शन करतांना जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, लोकशाही प्रक्रियेमध्ये निवडणूक हा मुख्य केंद्रबिंदू आहे. स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदानाबद्दल नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी, या उद्देशाने 'रन फॉर व्होट' या मिनी मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. जेव्हा लोक आपल्या मतदानाच्या अधिकाराचा उपयोग करतात तेव्हा ख-या अर्थाने लोकशाही बळकटीकरणास मदत होते. गत निवडणुकीमध्ये चंद्रपूरमध्ये मतदानाची टक्केवारी कमी होती. यावर मात करण्यासाठी तसेच मतदानाविषयी नागरिकांमध्ये जनजागृती करणे, त्यांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्यासाठी आज चंद्रपूरकर धावले आहेत. येणा-या आगामी सार्वत्रिक निवडणुकीमध्ये सर्व मतदारांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन मतदानाचा हक्क बजावावा व देशाच्या प्रगतीला हातभार लावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी केले. यावेळी जिल्हाधिका-यांनी हिरवी झेंडी दाखवून मॅरेथॉनला रवाना केले. चांदा क्लब ग्राऊंड येथून सुरू झालेली मिनी मॅरेथॉन -जटपूरा गेट - गिरणार चौक - जोडदेऊळ - गांधी चौक



# एमपीएससी टॉपर नोकरी सोडून शाळा चालवतो हे अभिमानास्पद : रेखाताई खेडेकर

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** येथील ऑक्सफर्ड इंटरनॅशनल ड्रीम स्कुल मध्ये शनिवारी अँन्यूअल डे फंक्शन मोठ्या उत्साहात साजरे झाले. यावेळी चिखली विधासभा मतदारसंघाच्या माजी आमदार रेखाताई खेडेकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमास सुरवात झाली. अँन्यूअल डे करीता माजी सभापती उत्तमराव घोंगेपाटील, देऊळगाव राजाचे पोलिस निरीक्षक संतोष महल्ले, नगरपरिषद मुख्याधिकारी अरुण मोकळ, माजी सभापती रेणुका बुरकूल, संस्थाध्यक्षा प्रिया घोंगेपाटील, प्रीती पवार आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मनोगत व्यक्त करताना रेखाताई खेडेकर यांनी तरुणांनी शैक्षणिक क्षेत्रातील संधी ओळखुन वाटचाल करावी असे सांगितले आणि ऑक्सफर्ड इंटरनॅशनल ड्रीम स्कूल चे संस्थापक प्रमोद घोंगेपाटील यांच्यासारखा एक शेतकऱ्याचा मुलगा एमपीएससी मार्फत मिळालेल्या नोकऱ्या सोडून शैक्षणिक क्षेत्रामध्ये काम करतोय ही बाब तालुक्याच्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे असे प्रतिपादन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी पोवाडा, लावणी, पंजाबीनृत्य, आधुनिक नृत्यप्रकार, नाटक असे विविध कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकून घेतली. शाळेच्या वाटचालीचा मागोवा घेताना संस्थापक प्रमोद घोंगेपाटील यांनी शाळेकडून राबविल्या जाणाऱ्या ऑलिम्पियाड परीक्षा, डॉ. होमीभाभा परीक्षा, विविध शालेय स्पर्धा परीक्षांमधील विद्यार्थांनी मिळविलेल्या यशाचा मागोवा घेतला. तसेच शाळेच्या पुढील वाटचाल व भविष्यातील जिल्यातील अग्रगण्य शाळा बनविण्याचा मनोदय बोलून दाखविला. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वर्षभरातील उपलब्धींसाठी बक्षीस वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थेचे शरद घोंगेपाटील, ऋषिकेश घोंगेपाटील, उपमुख्याध्यापिका स्वाती भालेराव, शिक्षक लक्ष्मण खांडेभराड, रिता सूरोसे, वैशाली चेके, आदिंनी परिश्रम घेतली.



# मराठा आरक्षण प्रश्नी फलटण तालुक्यात रास्ता रोको आंदोलन

## तब्बल दोन किलोमीटरवर वाहने उभी

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**फलटण :** राज्यात मराठा आरक्षणाचा मुद्दा हा संवेदनशील होत चाललेला असून मराठा समाज बांधव हे आपल्या न्याय हक्कासाठी विविध स्वरुपाची आंदोलने करत आहेत.ज्यांनी मराठा बांधवांमध्ये लढण्याची जिद्द आणली. ते मनोज जरांगे पाटील यांनी आजही आंदोलनाचा मार्ग सोडलेला नाही. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकत मराठा समाज बांधव हे मार्गक्रमण करत आहेत. त्यांनी दिलेल्या प्रत्येक आदेशाचे पालन बांधवांकडुन करण्यात येत असते मनोज जरांगे पाटील यांनी राज्यातील मराठा बांधवांना रास्ता रोको आंदोलन करण्याचा आदेश दिला होता. त्यानुसार शनिवार दिनांक २४ फेब्रुवारी रोजी राज्यात सर्व रास्ता रोको आंदोलने करण्यात आली.हे आंदोलन फलटण तालुक्यातील ठीक ठिकाणी करण्यात आली.राज्य सरकारने मराठा समाजाला ओबीसी प्रवार्गातून आरक्षण द्यावे ही प्रमुख मागणी मराठा आंदोलकांनी केली. रास्ता रोकोने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.नंतर आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतले.कारवाई नंतर सोडून देण्यात आले. वाठार निंबाळकर परिसरात चिंच बन येथे पुसेगाव व सातारा तसेच बाह्य मार्ग असलेल्या पुणे कडे जाणारी वाहतूक ठप्प झाली होती. तसेच बारामती मार्गावर सांगवी पूल येथे सांगवी, सोमंथळी, अलगुडेवाडी, सोनगाव, सस्तेवाडी, येथील बांधवानी रास्ता रोको करीत बारामती मार्ग ठप्प केला होता. खुंटे येथील पूलावर खुंटे, शिंदेवाडी, चौधरवाडी,गारपिरवाडी येथील बांधवानी मार्ग रोखून धरला. होळ येथील मार्गवर होळ, जिंती, फडतरवाडी, भिलकटी,येथील बांधवानी मार्ग रोखीत एक मराठा कोटी मराठा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. फलटण लोणंद मार्गावर बडेखान येथे सुरवडी, साखरवाडी, काळज,निंभोरे, वडजल, काशीदवाडी, ढवळेवाडी, संगमनगर( नांदल )येथील तरुणांनी मार्ग रोखला. दरम्यान हा मुख्य मार्ग असल्याने येथे वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या. सातारा व पुणे या मार्गावर निरा पूल/जुना टोलनाका येथे लोणंद, पाडेगाव,तरडगाव, सालपे,तांबवे,चव्हाणवाडी येथील मराठा बांधवानी रास्ता रोको केला. तब्बल दोन किलोमीटर वरती वाहने उभी असल्याने लोणंद पोलिसांनी रास्ता रोको आंदोलकांना ताब्यात घेतले व पोलीस ठाण्यात नेहले.त्या नंतर कारवाई करून सोडून देण्यात आले. फलटण-आसू रस्त्यावर राजाळे येथे राजाळे, साठे फाटा, मठाचीवाडी, सरडे, धुळदेव येथील मराठा समाजाने मार्ग रोखून धरला होता. तसेच गोखळी पाटी येथे बारामती तसेच इंदापूर कडे जाणारा मार्ग ढवळेवाडी, पवारवाडी, तामखडा, हणमंतवाडी, गुणवरे मुंजवडी, शिंदेनगर, जाधववाडी( आसू )या बांधवानी रोखून धरीत आरक्षणाची मागणी केली. फलटण शिखर शिंगणापूर मार्गावर सोनवडी बु येथे नाईकबोमवाडी, तिरकवाडी, मिरढे, जावली, कोळकी येथील मराठा बांधवानी मार्ग रोखला होता. फलटण दहिवडी रस्त्यावर झिरपवाडी येथे भाडळी, निरगुडी, गिरवी, धुमाळवाडी, बोडकेवाडी, जाधववाडा, सासकल येथील मराठा समाजातील बांधवानी रास्ता रोको केला. फलटण पंढरपूर मार्गावर वाजेगाव निंबळक येथे निंबळक, पिंप्रद, टाकळवाडे, विडणी, माझेरी, राजुरी, बरड, बागेवाडी, शेरे शिंदेवाडी, कुरवली बु,यांनी मार्ग रोखून धरला.यावेळी प्रत्येक ठिकाणी मराठा क्रांती मोर्चा फलटण च्या वतीने एक एक समन्वयक यांनी सर्वांना एकत्र करीत हा रास्ता रोको यशस्वी केला. कोणताही अनुचित प्रकार घडणार याची खबरदारी पोलिस प्रशासनाकडून घेण्यात आली होती. रास्ता रोको हा कोणताही अनुचित प्रकार न घडता

# समान हक्क आणि अधिकार देण्याचे काम राज्यघटनेने केले

## प्रा. भक्ती पाटील यांचे लोणंद येथे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** रयत शिक्षण संस्थेचे शरदचंद्र पवार महाविद्यालय लोणंद येथे शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजना व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने एका विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानातून मार्गदर्शन करण्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून दहिवडी कॉलेज दहिवडी येथील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.भक्ती पाटील यांना आमंत्रित करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कला विभागाचे उपप्राचार्य प्रा.भिमराव काकडे होते.विचारमंचावर अहमदनगर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विजय गायकवाड,स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या चेअरमन प्रा.छाया सकटे आदी मान्यवर उपस्थित होते.प्रा.भक्ती पाटील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत असताना भारतीय संविधानावर आधारित स्वतःची मते व्यक्त केली.त्या म्हणाल्या की,भारताने संघराज्य व्यवस्था स्वीकारली आहे. सर्वांना समान हक्क आणि अधिकार देण्याचे काम राज्यघटनेने केले आहे.भारतातील सर्व लोकांना जोडण्या पाठीमागे राज्यघटना आहे. असा विश्वास त्यांनी संविधाना बाबत व्यक्त केला.तसेच त्यांनी बेरोजगारी,तरुण पिढी,सोशल मीडिया, संस्कारक्षम वाचन यावर सुद्धा भाष्य केले. प्रा.भक्ती पाटील म्हणाल्या की,भारतात



बेरोजगारी मोठ्या प्रमाणात आहे.आजची तरुण पिढी सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणात वापर करत आहे. प्रत्येकाच्या जोडीदारा बद्दलच्या अपेक्षा बदलल्या आहेत.तुल्यबळ जोडीदार निवडण्याला भर दिला जात आहे.स्त्रीच्या सौंदर्या पेक्षा बौद्धिक आणि आर्थिक सौंदर्याला महत्त्व दिले जात आहे. प्रत्येकाने आपले आयुष्य सहज आहे.असे समजू नये. नियोजनबद्ध व प्रामाणिकपणे कष्ट केले तर प्रत्येकाला यश मिळविता येते.योग्य मार्ग निवडणे काळाची गरज असते.आजच्या तरुणांनी आर्थिक साक्षर होणे आवश्यक आहे.अवांतर व संस्कारक्षम वाचनाची गरज आहे.त्याकडे आजची तरुण पिढी दुर्लक्ष करत आहे.असे सुद्धा प्रा.भक्ती पाटील यांनी म्हटले आहे.विजय गायकवाड यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले की, विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करत असताना मूळ पुस्तकाचे वाचन करून त्याची टिपण काढून अभ्यास करावा. तसेच अभ्यासा मध्ये सातत्य महत्त्वाचे असते. व्याख्यानाची प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय प्रा छाया सकटे यांनी करून दिला.महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा.सुभाष कदम,डॉ.दत्तात्रय अनारसे,शिक्षक,शिक्षकेत्तर सेवक,विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.पायल घोरपडे यांनी केले व डॉ संदीप शिंदे यांनी आभार मानले.



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त वार्ड क्र. 90 राजनगर- मुकुंदनगर येथे आयोजक शिवसेना ऊबाठा शाखा प्रमुख आनिल पवार पाटील, विठठल दामले, सुनील शहाने, विष्णु थोरे, अमोल टेकाळे, मुंजाजीह कनसे, ज्ञानेश्वर रनेर, शाहू लंबे पाटील, सुदंर शहाने, सुनिल नाराळे,कैलास रनेर, संजय रनेर, मुंजा रनेर उपस्थित होते.

# झरी येथे सैनिक भागचंद चंदवाडे यांचे गावात वाजतगाजत फेरी व स्वागत औक्षण

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे झरी येथील भारतीय सैनिक दलातील फौजी भागचंद ताराचंद चंदवाडे झरी हे २२वर्ष बॉर्डर वर सेवा देवून परतले (सेवानिवृत्त) झाल्यावर गावात नागरिकांनी डिजे लावून वाजतगाजत मिरवणूक काढत पुष्पहार श्रीफळ देऊन सत्कार सन्मानित करण्यात आले.यावेळी फौजी भाविक झाले होते गावात मिळालेले सन्मान गगनात मावेना असे फौजीला झाले होते.भारतीय सैन्य दलाची सैनिक श्री भागचंद ताराचंद चंदवाड़े, मुळगाव झरी हे भारतीय सैन्यातुन सेवानिवृत झाले, दिनांक, 19 फेब्रुवारी रोजी त्यांचे ग्रामपंचायत वतीने सरपंच श्री करण सिंह राजपूत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले आहे, त्यावेळी गावातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते सर्वांनी हार शाल श्रीफळ देऊन स्वागत केले तसेच त्यांच्या कुटुंबाने गावात सगळ्यांना पेढे वाटले 22 वर्षे सेवा करून ते गावात परत आले त्याबद्दल सर्व गावकऱ्यांनी त्यांचे मन भरून कौतुक केले या गावातील महिला व पुरुष प्रतिष्ठित उपस्थित होते.



# विद्यार्थीच नव्हे तर शिक्षकवृंद आणि पालकांनीही लुटला आनंद

## डी.जे.वॅलर्स इंटरनॅशनल स्कूलचा दियांशिका फेस्टिवल

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** शाळेमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम म्हटले की आपल्याला विद्यार्थी हे विविध गाण्यावर नृत्य करताना पाहायला मिळत असतात.विद्यार्थ्यांचा कलाविष्कार व त्यांच्या कला गुणांना वाव मिळावा. म्हणून हा सांस्कृतिक कार्यक्रम खूप महत्वाचा असतो. हल्ली या कार्यक्रमाचे स्वरूप खूप मोठे होत चाललेले आहे.विद्यार्थ्यांनाच नव्हे तर शाळेतील शिक्षकवृंद आणि पालकांना सुद्धा या सांस्कृतिक कार्यक्रमात नृत्य सादर करता यावे. म्हणून अनेक शाळा पुढाकार घेत असतात. असाच पुढाकार पणदरे ता.बारामती येथील सम्यक प्रतिष्ठान,पणदरे संचलित डी.जे.वॅलर्स इंटरनॅशनल स्कूल यांच्या वतीने घेण्यात आलेला आहे.नुकताच या शाळेचा दियांशिका फेस्टिवल हा सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी विद्यार्थीच नव्हे तर शालेय शिक्षकवृंद आणि पालकांनी सुद्धा पाल्याच्या समवेत नृत्य करत आनंद लुटला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुकुंद मोहिते हे होते.प्रमुख पाहुणे म्हणून बबनराव पवार हे उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून सम्यक प्रतिष्ठान पणदरे या संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा ज्योती मोहिते चव्हाण,उपाध्यक्ष दत्तात्रय चव्हाण,सुरज मोहिते,मंगेश मोहिते, ॲड.बकुल दोशी,विजय चोरघे,संगीता शहा व नूतन दोशी यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते. विविध स्पर्धांमध्ये यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. फेस्टिवलला जे दियांशिका हे नाव देण्यात आलेले आहे.ते नांव संस्थापक अध्यक्षा ज्योती मोहिते यांच्या मुलीचे नाव असून दियांशिकाचा वाढदिवस साजरा करण्यात आला.तसेच सर्व पालकांना व विद्यार्थ्यांना पाव-भाजीची मेजवानी देण्यात आली.तदनंतर विविध सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न करण्यात आले.मराठी ,हिंदी ,इंग्रजी व तामिळी गाण्यांवर विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले.यावर्षीच्या दियांशिका फेस्टिवलचे विशेष आकर्षण म्हणजे यावर्षीच्या कार्यक्रमांमध्ये फादर-डॉटर ,मदर-डॉटर, फादर अँड सन व कपल डान्स यांचा समावेश करण्यात आला होता.विद्यार्थ्यांबरोबर पालकांनाही आपली कला सादर करण्याची संधी मिळाल्याने व कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केल्याने पालकांनी समाधान व्यक्त केले.विद्यार्थ्यांच्या नृत्याला पालक व उपस्थित असलेल्या मान्यवरांनी विशेष दाद दिली.यावेळी अनेकांनी विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची शाब्बासकी सुध्दा दिली.दियांशिका फेस्टिवल हा यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या अध्यक्षा ज्योती मोहिते-चव्हाण,ज्ञानेश्वरी पवार,स्वाती कोकरे,सोनाली सोलनकर व सारिका खोमणे यांनी विशेष परिश्रम घेतले. स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड.सानिया शिंदे यांनी केले तर साऊंड सिस्टिम याचे संपूर्ण नियोजन श्रीनाथ चव्हाण यांनी बघितले.



आधुनिक केसरी

## लय भारी सुगरण



सौ. सविता खंडगावकर , नांदेड
संपर्क क्र. 7218340512

# वडा सांबर रेसीपी

**वड्यासाठी साहित्य :**
मुग डाळ २ वाटी, उडीद डाळ १ वाटी, २ सपाट चमचे मीठ, अर्धा चमचा जिरे, तेल.
२) सांभार किंवा रसम साठी साहित्य तुर डाळ अर्धी वाटी, १ कांदा, १ टमाटे, खोबरे आणि लसूण पेस्ट एकत्र मोहरी, जीरे, खडा हिंग पावडर, कसुरी मेथी, कढीपत्ता, सांभार मसाला किंवा धना पावडर, गरम मसाला, थोडीशी चिंच, अर्धा चमचा साखर,
मीठ, कोथिंबीर. ३) चटणी साठी साहित्य, हरभरा डाळ २ चमचे, हिरवी मिरची ४ ते ५ लसूण पाकळ्या ६, कोथिंबीर अर्धी वाटी, तेल मोहरी, जीरे, खडा हिंग पावडर कढीपत्ता दही, मीठ. **पुर्वतयारी :** समजा सकाळी डाळी भिजवलेल्या असतील तर दुसऱ्या दिवशी सकाळी वडे करता येतील. हे वडे चवीला अप्रतिम लागतात. हे वडे खाल्ल्यानंतर दुसऱ्या पध्दतीने केलेले वडे तुम्ही खाणारच नाही याची मी खात्री देते.
तर सकाळी दोन्ही डाळी वेगवेगळ्या भिजत घालून ठेवा. रात्री मिक्सर मधुन बारीक करून उभ्या भांड्यात ठेवा. कारण भिजवलेले पीठ बाहेर येणार नाही. आता २ चमचे हरभरा डाळ पाण्यात भिजत घाला. हि हरभरा डाळ दुसऱ्या दिवशी चटणी साठी लागते.
**दिवस दुसरा सकाळी :** अर्धी वाटी डाळ शिजवून घ्या. ज्यांना फक्त रसम आवडते त्यांनी डाळ नाही शिजवली तरी चालेल. चिंचेचा कोळ करून घ्या. खोबरे, लसूण एकत्र करून घ्या. गॅस चालू करून कढई ठेवा. दीड पळी तेल घाला. तेल तापले की मोहरी घाला. मोहरी तडतडल्यावर जीरे टाका. खडा हिंग पावडर टाका. कसुरी मेथी टाका. खोबरे लसूण पेस्ट टाका. कढीपत्ता टाका. खोबरे भाजत आले कि चिरलेला कांदा टाका तो गुलाबी रंगाचा झाला कि काश्मिरी लाल तिखट आणि मिरची पावडर टाका. आता चिरलेला टोमॅटो घाला. थोडे मीठ घालून टोमॅटो शिजला कि १ चमचा सांभार मसाला घालावा. नसेल तर १ चमचा धना पावडर टाका. थोडीशी साखर घाला. १ ते दीड तांब्या पाणी घाला. चिंचेचा कोळ व मीठ घाला. उकळी येऊ द्या. पाव चमचा गरम मसाला घालावा. हे झाले रसम तयार. ज्यांना सांभार हवा आहे त्यांनी शिजवलेली तुरीची डाळ घोटून यात घालावी. एक उकळी आणावी. सांभार तयार.
**चटणी :** मिक्सरच्या चटणी भांड्यात रात्री भिजवलेली हरभरा डाळ. खोबरे तुकडे, हिरव्या मिरच्या ४ ते ५ , लसूण पाकळ्या ६, कोथिंबीर घालून बारीक पेस्ट करावी. यात मोहरी, जीरे, खडा हिंग पावडर, कढीपत्ता यांची फोडणी करून घ्या. चटणी मध्ये मीठ टाकावे. पाहिजे तेवढी दाट, पातळ आपल्या आवडीनुसार करावी. त्यावर फोडणी टाका. चटणी तयार. यात आवडत असेल तर तुम्ही दही घालून शकता. वड्या चे पीठ घ्या त्यामध्ये मीठ व जीरे घालून छान फेटून घ्या. कढईत तेल तापले की ओल्या चमच्याने वडे तेलात सोडा. गॅस मंद असावा. खालुन थोडेसे गुलाबी झाले कि वडे पलटावेत. रसम, सांभार किंवा चटणी सोबत खाऊ शकता.



# शिवना टाकळी प्रकल्पाचे पाणी सोळा गावांना होणार उपलब्ध

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** कन्नड येथील शिवना टाकळी मध्यम प्रकल्पातून



वैजापूर तालुक्यातील १६ गावांना शेती सिंचनाचा लाभ देणा-या दहा किलोमीटर कालव्याचे नूतनीकरण व दुरुस्ती कामासाठी पाटबंधारे विभागातील उच्चस्तरीय समितीने ४४१ कोटीची सुधारित प्रशासकीय शासकीय मान्यता देण्यासाठी राज्य सरकारकडे शिफारस केली आहे. मंत्रिमंडळ बैठकीत या सुधारित प्रशासकीय मान्यतेवर अंतिम निर्णयाचा शिक्कामोर्तब झाल्यानंतर वैजापूर तालुक्यातील शिवना टाकळी प्रकल्पाचे पाणी कालव्याद्वारे १६ गावातील शेतक-यांना उपलब्ध होईल असे आमदार रमेश बोरनारे यांनी सांगितले.कन्नड येथे निर्मिती केलेल्या शिवना टाकळी मध्यम प्रकल्पातील पाणी साठा वैजापूर तालुक्यातील पोखरी, गारज, मनूर, साकेगाव, पाथरी, बाभुळगाव पिराची, बोरदहेगाव, राहेगव्हाण, धोंदलगाव, उंदिरवाडी, सोनवाडी, भायगाव गंगा, जांबरखेडा, भोकरगाव, मालेगाव, खिर्डी कन्नड, साळेगाव या गावाना देण्यासाठी २० वर्षापुर्वी कालव्याचे काम करण्यात आले होते. मात्र या कालवा अनेक ठिकाणी नादुरुस्त झाला तसेच धोंदलगाव ते बोरदहेगाव धरणा पर्यत कालव्याचे कामे, अनेक वर्षापासून अर्धवट स्थितीत असल्यामुळे या भागातील शेतक-यांना सिंचनासाठी हक्काचे पाण्यापासून वंचित होते.या भागातील सिंचन व्यवस्था सुरळीत करण्यासाठी आ.रमेश बोरनारे यांनी छत्रपती संभाजीनगर पाटबंधारे विभागातील अधिका-यांशी समन्वय साधून या कामासाठी नव्याने ४४१ कोटीचा सुधारित प्रशासकीय मान्यता मिळवण्याचा प्रस्ताव तयार करुन घेतला.



**उच्चस्तरीय समितीची शासनाकडे शिफारस :** शिवना टाकळी मध्यम प्रकल्प कालवा दुरुस्ती काम, भूसंपादन मोबदला, शेतक-यांना शेतात जाण्यासाठी पूल अशा सर्व बाबींचा विचार करुन ४४१ कोटीची सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव जलसंपदा विभागाची उच्चस्तरीय समिती समोर मंजूरीला ठेवला होता .२० फेब्रुवारी रोजी समितीचे अध्यक्ष तथा मुख्य अभियंता मादाडे , मुख्य अभियंता घोगरे , पगारे यांच्या त्रिसदस्यीय समितीने मंजुरी देऊन शासनाकडे अंतिम मंजुरीसाठी शिफारस केली आहे .

**वैजापूर तालुक्यातील १६ गावांना लाभ :**
शिवना टाकळी मध्यम प्रकल्पातील पाण्याचा लाभ कालव्याच्या नादुरुस्त तसेच काही भागात कालव्याचे कामच अनेक वर्षांपासून रखडले होते .त्या कामाला गती देण्याच्या भूमिकेतून छत्रपती संभाजीनगर पाटबंधारे विभागाने तयार केलेला ४४१ कोटीचा परिपूर्ण प्रस्तावाला उच्चस्तरीय समितीने हिरवा कंदील दाखवल्यामुळे १६ गावांना कालव्यातून पाणी साठा सिंचनासाठी उपलब्ध होईल असे आ .रमेश बोरनारे यांनी सांगितले .

# जेनेरिक औषधे ओळखण्यासाठी त्यावर वेगळा मार्क असावा

आधुनिक केसरी न्यूज

**बि.डी. रामपूरकर**

**जिंतूर :** तालुक्यात शासन स्तरावर जेनेरिक औषधांचा वापर वाढवण्यासाठी प्रयत्न केले जात असले तरी कुठलाही ठराविक मार्क नसल्याने सर्वसामान्यांना जनरिक औषधे कुठली हे ओळखणे कठीणच झाले आहे. त्यात एमआरपी वर सूट देण्याचे प्रमाणही मेडिकल न्याय वेगळेच आहे एकाच कंपनीच्या एकाच औषधांच्या किमतीत दोन दुकानात सारखेपणा नसल्याने सर्वसामान्यांना ही जनरिक औषधे ओळखता यावीत याकरता त्यावर विशिष्ट मार्क असावा. यासाठी शासन स्तरावर प्रयत्न होण्याची गरज असल्याची अनेक रुग्णांनी बोलून दाखवले. या अगोदर अनेक वर्षां पासुन केवळ ब्रँडेड कंपनीच्या औषधी उपलब्ध होत्या. परंतु त्याची दर अधिक असल्याने त्याला पर्याय म्हणून जनरिक औषधी समोर आली ब्रॅण्डेड कंपनी पेक्षा स्वत मिळत असल्याने हल्ली जनरिक औषधांचा वापर वाढलेल्या दिसून येतो आहे. दुकानांमध्ये गेल्यानंतर मात्र सर्वसामान्य रुग्णाला दुकान चालक आपल्याला जनरीक औषधी देतोय का? हे लक्षात येत नाही. त्यामुळे अनेक वेळा जेनेरिकच्या नावाखाली ब्रँडेड औषधी दिली जाते. कधीकधी जनरिक औषधी दिली तरी त्यावर असलेल्या एमआरपीच्या तुलनेत दिली जाणारी सूट देखील वेगळी आहे. म्हणजेच कुठे दहा टक्के तर काही दुकानावर 20% तर कुठे त्यापेक्षाही 70 टक्के सूट दिली जाते. यामुळे हे औषधी ओळखण्यासाठी त्यावर विशिष्ट मार्क असावा, अशी मागणी होत आहे. जिंतूर तालुका तसा डोंगराळ भाग असून ग्रामीण खेडेपाड्यांनी युक्त असा भाग आहे त्यामुळे ग्रामीण भागात तर जनरिक काय हे लवकर लक्षात येणे ही अवघड दिसून येते.

**एकाच औषधाची वेगवेगळ्या दुकानात वेगवेगळी किंमत :** आमच्या दैनिक आधुनिक केसरींच्या वार्ताहर यांनी खातर जमा करण्यासाठी एका रुग्णाला डायबिटीस साठी औषधे लिहून देण्यात आली . होती . ब्रँडेड कंपनीची 145 रुपये एमआरपी रुपयांना होती . तेच जनरिक मध्ये हेच घटक असलेले औषध 87 रुपयांमध्ये एमआरपी मिळते त्याला दुसऱ्या मेडिकल चालकाने 20% सूट देऊनही औषध दिले परंतु आणखीन एका मेडिकल कडे गेल्यानंतर तीच औषधी फक्त वीस रुपयांमध्ये उपलब्ध करून दिली .यात दोन्ही मेडिकल शॉप चालकांनी एकाच कंपनीचे जनरिक औषध उपलब्ध करून दिले परंतु किंमत मात्र खूप वेगळी वेगळी होती .

जेनेरिक औषधे ओळखण्यासाठी त्यावर काहीतरी वेगळा मार्ग असावा जेणेकरून विक्री किंमती बाबतही नियंत्रण राहील यामुळे सर्वसामान्यांची फसवणूक होणार नाही . शासन स्तरावर याबाबत लवकर निर्णय घेऊन कार्यवाही करावी .
**आजमत खान पठाण, नागरीक**

जनरिक औषधावर सर्वसामान्यांना ओळखण्यासाठी वेगळा मार्क असावयास हवा त्यामुळे औषधनिहाय किंमत वेगळी व त्यावर मिळणारा नफा ही सर्वसामान्यांच्याही लक्षात येण्यासारखी बाब आहे . किंमत वेगळी असल्याने ही औषधे आम्ही साधारण दहा ते वीस टक्के नफा ठेवून विक्री करतो .
**केमिस्ट अँड ड्रगिस्ट, व्यवसायिक जिंतूर .**

# डॉक्टर सीताराम जाधव यांना कृषिभूषण पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तेलवाडी जवळील प्रयोगशील शेती करून सेंद्रिय शेती चळवळ जनसामान्यांमध्ये रुजवणाऱ्या डॉ. सिताराम जाधव यांना सन 2020 चा मराठवाडा विभागातील प्रतिष्ठेचा कृषीभूषण पुरस्कार (सेंद्रिय शेती) घोषित झाला आहे अशी माहिती तालुका कृषी अधिकारी बाळराजे मुळीक यांनी दिली. यासंदर्भात अधिक माहिती देताना कृषी अधिकारी डॉ.बाळराजे मुळीक यांनी सांगितले की,शेती क्षेत्रात सेंद्रिय शेतीची कास धरून नाविन्यपूर्ण प्रयोग करीत डॉक्टर सिताराम जाधव यांनी या शेतीचा प्रचार प्रसार केला.वैद्यकीय क्षेत्रा सोबतच माणसाचे आरोग्य सुदृढ , रोगमुक्त राहावे यासाठी डॉ. जाधव यांनी शंभर देशी गिर गाईंचे पालन करून सेंद्रिय निविष्ठांचा प्रभावीपणे वापर केला. एकच पीक पद्धती न अवलंबता वेगवेगळी पिके घेतली .फळ पिके व भाजीपाला घेऊन ईतर शेतकऱ्यांना प्रेरित केले.खडखाळ जमिनीला सुपीक बनवले.मराठवाड्याच्या वातावरणात सेंद्रिय शेतीवर सफरचंदाची लागवड केली. मल्चिंग,



शेडनेट, गांडूळशेड गांडूळ खत यासोबतच सेंद्रिय शेती प्रचलित व्हावी यासाठी विविध प्रबोधनाचे कार्यक्रम आयोजित केले. देशी बियाणांचा अवलंब केला.किडनाशके तयार केली. खडक खोदून शेततळे तयार केले.या समग्र कार्याची दखल घेऊन सन 2020 चा सेंद्रिय शेती कृषी भूषण पुरस्कार डॉ. जाधव यांना घोषित झाला आहे .लवकरच राज्यपाल व मुख्यमंत्री महोदय यांच्या हस्ते समायोजित सत्कार करून हा सन्मान त्यांना प्रदान करण्यात येणार आहे. या यशाबद्दल केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, पालकमंत्री संदिपान भुमरे,अल्पसंख्यांक मंत्री अब्दुल सत्तार,डॉ.संजय गव्हाणे, आमदार उदयसिंग राजपूत, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भरतसिंग राजपूत, उदयोजक मनोज पवार,आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष सुभाष निकम पाटील,ईंजि. मिलिंद लक्ष्मीकांत पाटील, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या माजी व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.प्रतिभा अहिरे, तहसीलदार विद्याचरण कडवकर गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकणे, नगरपरिषदेचे प्रशासक नंदकिशोर भोंबे यांनी अभिनंद केले .



# किनगाव येथे संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** नगाव येथे नितीन भाऊ देशमुख यांनी केले यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून तालुका राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष बाबासाहेब तांदळे हे होते तर कार्यक्रमाला सरपंच मनिषा चव्हाण, उपसरपंच किशोर चव्हाण, देवनाथ सोनवणे यांनी मनोगत व्यक्त केले. संजय सोनवणे, भाऊसाहेब चव्हाण, सुदाम चव्हाण, रमेश चव्हाण, सुभाष चव्हाण, गणेश चव्हाण, प्रकाश चव्हाण, विलास चव्हाण, संताराम सोनवणे, ग्रामविकास अधिकारी अरुण चिते, सुरेश सोनवणे, शंकर चव्हाण, बाळु सोनवणे, सुधाकर तावडे प्रतिक सोनवणे पद्माकर तावडे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन बाळासाहेब शिंदे यांनी केले होते.

# वाहनाने घेतला पेट, एकाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** मुंबई नागपूर समृद्धी महामार्गावर भरधाव ट्रक रस्त्याच्या कडेला उलटून त्याला अचानक आग लागल्यामुळे झालेल्या भीषण अपघातात एक जण ठार तर दोन जण गंभीर झाले. आज शनिवारी मेहकर 'इंटरचेंज' जवळील चायगाव नजीकच्या मुंबई कॉरिडोर मधील चॅनेल नंबर २९० जवळ ही भीषण दुर्घटना घडली. अपघातग्रस्त 'ट्रक' समृद्धी महामार्गाने नागपुरवरुन मुंबईकडे जात होता. दरम्यान चालकाला डुलकी लागल्यामुळे भरधाव ट्रक चैनल नंम्बर २९० जवळ महामार्गाच्या कठड्याला तोडून रस्त्याच्या खाली उलटला. वाहनाने लगेच पेट घेतला.

# यज्ञ सोहळ्यात मोफत उपचार

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद वाडी येथे सात दिवसापासून यज्ञ सोहळा सुरू असून शुक्रवारी या यज्ञ सोहळ्याची सांगता होणार आहे. या यज्ञ सोहळ्यात मागील सात दिवसापासून येणारे भाविकांचे मोफत उपचार करण्याचे काम सुरू आहे. वडोद वाडी येथे यज्ञ सोहळ्यात गुरुदेव क्युअर्स होमीओपॅथिक हॉग्पीटल संभाजी नगर तर्फे मोफत आरोग्य शिबिर व उपचार डॉ. सुमित संतोष जांगडा बीएचएमएस एमडी (एचओएम), डॉ. श्रीमंत शिवाजी तिडके, डॉ.गोपाल जगदीश बरसाळे, डॉ. ओंकार शिवशंकर कफळे, डॉ.सत्यम संजय शिंदे, डॉ.आरती दिलीप मोरे, डॉ. वैष्णवी अतिश अंभोरे, डॉ. रेणुका दीपक मुंडा, डॉ. गायत्री गणेश वाघ, डॉ. स्नेहल एल अनामत शेजाव डॉ. धनश्री सुनिल विभुते] डॉ. विद्या अनिल विभुते. यांनी यावेळी सातशे भाविकांना मोफत उपचार दिले.





# कुणी कितीही विरोध केला तरी एमआयडीसी होणार

## आ. रोहित पवार : भांडेवाडी येथील जैवविविधता उधाण लोकार्पण सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**सुभाष माळवे**

**कर्जत :** कोणी कितीही ताकद लावली तरी एमआयडीसी होणारच असे प्रतिपादन आ. रोहित पवार यांनी भांडेवाडी येथील जैवविविधता उधान लोकार्पण सोहळ्यात केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बारामती ॲग्रोच्या विश्वस्त सुनंदा पवार होत्या. आ. रोहित पवार पुढे म्हणाले की, वनविभागाच्या ६२ एकरावर हा प्रकल्प होत असून हा संपूर्ण परिसर विकासित करण्यात येईल. जे जे नविन व लोकांच्या उपयोगी असेल ते ते करण्यासाठी मी तयार असून लोकांनी साथ द्यावी म्हणजे तुम्हाला मदत होईल जे जे वेग वेगळे असेल ते ते करू विविध विभाग च्या माध्यमातून विकास करायचा आहे सर्वात उत्कृष्ट कर्जत तालुक्यात करावे यासाठी सतत प्रयत्नशील असल्याने रोजगार हमी, पिण्याचे पाणी पुरवठा योजना, वेगवेगळ्या क्षेत्रात राज्यात आपण पहिल्या क्रमांकावर आहोत. पंचवीस वर्षांत एस. टी. डेपो करता आला नाही, अशी टीका करत एसटी डेपोचे नव्वद टक्के काम पूर्ण झाले असून लवकरच डेपो सुरू होईल असे स्पष्ट करत आ. पुढे म्हणाले की, पुर्वी कर्जतकर काय दाखवत होते पण आता बरेच काही दाखविण्यासाठी आहे. त्यामुळे घरा बरोबरच कर्जत शहरही आपआपल्या पाहुणे, नातेवाईक व मित्रपरिवार यांना दाखविले पाहिजे अशी अपेक्षा आ. पवार यांनी व्यक्त करून विकास हा वेगवेगळ्या स्वरूपात करायचा आहे. तर महसूल मंत्री तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी मोलाची मदत केली असल्याने विखे पाटील यांचे आभार यावेळी आ. रोहित पवार यांनी मानले. आ. रोहित पवार यावेळी बोलताना म्हणाले की, सध्या महाराष्ट्र राज्यात आ. रोहित पवार यांची चर्चा चालू आहे. पण ही चर्चा कर्जत जामखेड मुळेच आहे. तुम्ही माझ्या वर प्रेम केले मला आमदार म्हणून निवडून दिले




त्यामुळे माझी चर्चा असली तरी ती फक्त तुमच्या मुळेच आहे. यावेळी डी के वळसे म्हणाले की पुढील काळात माणसं कसे वाचवायाचे हा प्रश्न आहे जागतिक तापमान वाढीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात जगाला भेडसावत असून जग आभ्यास करत आहे. त्यामुळे वनसंपदा चे जतन व संवर्धन करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. व ती जबाबदारी समर्थ पणे पेलावी अशी अपेक्षा व्यक्त केली. तर यावेळी अमोल काळेकाळे , अनिल तोरडमल, पोपट खोसे, अशोक कविटकर आदींचे भाषणे झाली तर वनक्षेत्रपाल मोहन शेळके यांनी प्रस्ताविक केले शेवटी गणेश मिसाळ यांनी आभार मानले.



# शिवाजी महाराजांसारख्या धर्मनिरपेक्ष राजाची देशाला गरज : प्रा. डॉ. संजय शिंदे

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजी नगर :** आज भारताला छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या धर्मनिरपेक्ष राजाची खऱ्या अर्थाने गरज आहे, असे प्रतिपादन प्रा.डॉ.संजय शिंदे यांनी वसंतराव नाईक महाविद्यालय, छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित व्याख्यानात केले छत्रपती शिवाजी महाराज हे धर्म निरपेक्ष लोकशाही, स्त्रियां, लहान मुलं, धर्म ग्रंथ आणि श्रध्दास्थानाचा आदर करणारे मानवतावादी राजे होते. आपल्या राज्यातल्या बहुजन समाजाला आपले कुटुंब माणूण त्यांच्यातील स्वत्व जागे करून स्वराज्याची स्थापना केली, आपल्या राज्यात स्त्रियांवर अन्याय करणा-याला जब्बर शिक्षा ठोठावली,अठरा पगड जातीतील मावळे एकत्र करून जुलमी,अन्यायी राजवटीविरूध्द संघर्ष केला हे करत असताना कोणत्याही धर्माचा तिरस्कार केला नाही, शहाजी राजांच्या मृत्यूनंतर मॉ. जिजाऊ सती जायला निघाल्या परंतु हजारो वर्षांपासून चालत आलेली अनिष्ट प्रथा महाराजांनी १६६४ ला बंद केली आणि पुरोगामी विचाराला आपल्या घरातून सुरूवात केली, अन्याय करणा-या वतनदाराचे वतन खालसा केली आणि दलित, बहुजन समाजातील लोकांना गावचे पाटील केले, महारांजाच्या सैन्यात ५७/% मुस्लिम सैनिक होते त्यांच्याही धर्माचा आदर केला, महाराजांच्या आरमाराचा प्रमुख इब्राहिम खान, पायदळ प्रमुख नुरखा बेग, गुप्तहेर बहिर्जी नाईक, शिवाजी काशीद,अंगरक्षक जिवा महाला हया सगळ्या बहुजन समाजातील लोकांनवर विश्वास ठेवून आपल्या स्वराज्याची वाटचाल केली कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वसंतराव नाईक शिक्षण संस्थेचे सचिव नितीन राठोड हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ तेजनकर उपस्थित होते, डॉ.तेजनकर म्हणाले की, स्वराज्याच्या अगोदर महाराष्ट्रात प्रचंड अन्याय होत होता. व्यापारी सैन्याला भित होते सामान्य माणूस सैन्याला भित होते गरीबांचे जगने अवघड झाले होते म्हणून महाराजांनी स्वराज्याची संकल्पना पुढे आणली,छत्रपती शिवाजी महाराज हे मानवतावादी राजे होते, सर्व समाजाच्या लोकांचे हित कशात आहे ते बघून निर्णय घ्यायचे असे बहुजन प्रतिपालक राजे होते. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रबंधक, उपप्राचार्य प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य गीता कावळे यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. चंद्रकांत चोरघडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ बालाजी जोकरे यांनी मानले.

# वडांगळी यात्रेत पशुबळी विरोधात प्रबोधन

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** नवसापोटी उघड्यावरील दिल्या जाणाऱ्या पशुबळी विरोधात महाराष्ट्र अंनिसच्या नाशिक व सिन्नर शाखेच्या वतीने आज वडांगळी येथे भाविकांचे प्रबोधन करण्यात आले. प्रबोधन कार्यक्रम सुरू करण्यापूर्वी कार्यकर्त्यांनी जत्रेच्या परिसरात फेरफटका मारून उघड्यावर पशुबळी होतात किंवा कसे, तसेच इतर अनिष्ट, अघोरी प्रथांचे अवलोकन केले.

कत्तलखान्यात पशुबळी देणाऱ्या इसमाकडे चौकशी केली असता एकूणच उड्यावरील पशुबळी देण्यात आणि नवस करण्याच्या प्रमाणातही घट झाल्याचे समजले. पोलिसांनीही याला दुजोरा दिला. प्रत्यक्षात तसे दिसत होते. यवतमाळ बीड, वाशिम, गुलबर्गा इथून आलेल्या काही भाविकांशी चर्चा केल्यानंतर असे समजले की, ऐपत नसतानाही अनेक भाविक कर्जाऊ रक्कम घेऊन नवसपूर्तीसाठी आलेले होते. त्यानंतर कार्यकर्त्यांनी मंदिराच्या प्रांगणातच प्रबोधनाचा फलक लावून विशेषतः तरुण भाविकांचे आणि महिलांचे नवसापोटी पशुबळी देण्याच्या अनिष्ट व अघोरी प्रथेविरोधात प्रभावी प्रबोधन केले. नवस करू नये, असे संतांनी निक्षून सांगितलेले आहे, आणि उघड्यावर पशूबळी देऊ नयेत असा न्यायालयाचा आदेश आहे. त्याचे आपण पालन करावे असे सांगून कार्यकर्त्यांनी पुढे सांगितले की, पशुबळीसाठी येणारा खर्च हा कुटुंबाचे आरोग्य, शिक्षण व इतर आवश्यक गरजांसाठी करावा. या प्रबोधन प्रबोधन मोहिमेत अंनिसचे राज्य प्रधान सचिव डॉ.टी.आर.गोराणे, राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे, राज्य सदस्य राजेंद्र फेगडे, जिल्हा कार्याध्यक्ष डॉ. शामसुंदर झळके, कायदेशीर सल्लागार ॲड समीर शिंदे, अरुण घोडेराव, कॉम्रेड हरिभाऊ तांबे, महामित्र दत्ता वायचळे, मधुकर गिरी, प्रभाकर शिरसाठ, विजय खंडेराव, विजय बागुल, बस्तीराम कुंदे, बापु चतुर, प्रमोद काकडे तसेच सिन्नर व नाशिकचे कार्यकर्ते सहभागी झालेले होते.





# राजूर येथे रोहिदास महाराज जयंती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजुर :** मन मैं चंगा तो कठोती मैं गंगा या उक्तीप्रमाणे तत्कालीन समाजातील अनिष्ट प्रथा व जातीभेदाच्या भिंती गाडून स्वातंत्र्य,समता आणि बंधुत्वाच्या मूल्यांवर आधारित मानवतेची शिकवण देणारे थोर समाजसुधारक तथा संत रोहिदास महाराज यांची 647 वी जयंती राजुर येथील ग्रामसंसद कार्यालयात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम मान्यवरांचे हस्ते थोर संत रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले.यावेळी गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टदार सुधाकरराव दानवे, सरपंच भाऊसाहेब भुजंग, उपसरपंच संतोष मगरे, सहकार बोर्डाचे अध्यक्ष बाबुराव खरात,भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते भगवानराव नागवे, प्रा.बाळासाहेब बोराडे,ग्रामसेवक प्रमोद पुंगळे, ग्रामपंचायत सदस्य विनोद डवले,पंढरीनाथ करपे, मुसा सौदागर, राहुल दरक,परमेश्वर पुंगळे,आप्पासाहेब पुंगळे, सतीश सोनुने,भगवान निंबाळकर,गजानन टेपले, राजू सोनवणे,अंकुश सोनवणे,भगवान सुद्रिक,सोमीनाथ रगडे, विजय काकडे यासह ग्रामस्थ व चर्मकार बांधव उपस्थित होते.

# लोकस्वराज्य आंदोलनच्या वतीने संत शिरोमणी रविदास महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** दि. 24 फेब्रुवारी रोजी सकाळी नऊ वाजता कॅनॉट परिसर, सिडको येथे लोकस्वराज्य आंदोलनच्या वतीने संत शिरोमणी रविदास महाराज यांची जयंती मोठ्या आनंदाने आणि हर्षोल्लासात साजरी करण्यात आली. यावेळी संत रविदास महाराजांच्या प्रतिमेला प्रा. बी.आर.पारस्कर यांनी पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्रा. पारस्कर म्हणाले की, संत रविदास महाराजांनी भारतभर फिरून समाज सुधारणेचे महान कार्य केले. मन चंगा तो कटोटी मे गंगा असे, महान विचार संत रविदास महाराजांचे होते. त्यांना देशातील समाज सुधारकांमधे अग्रणीस्थान आहे. संत रविदास यांना अनेक नावांनी ओळखल्या जाते. त्यांचे नाव हे सूर्याप्रमाणे तेजस्वी असल्याने रविदास असे ठेवण्यात आले. ते एक कुलभूषण कवी होते. त्यांनी केलेल्या रचना, दोहे आजही गुरू ग्रंथ साहिबमधे आपल्याला वाचायला मिळतात.यावेळी प्रदेशाध्यक्ष नामदेव गायकवाड, ज्येष्ठ नेते दशरथ मानवतकर, जिल्हाध्यक्ष अतुल खंडगावकर आदी उपस्थित होते.





# मराठा समाजाच्या वतीने चिंचोली फाटा येथे रास्तारोको

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** सरकारने सगेसोयरेचा जो अध्यादेश काढला आहे त्याची तात्काळ अमलबजावणी करून सकल मराठा समाजाला न्याय मिळवून द्यावा यासाठी मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी राज्यभर रास्तारोको करून जनआंदोलन करण्याचे आवाहन समाजाला केले होते. त्या पार्श्वभूमीवर राजुर-भोकरदन रस्त्यावरील चिंचोली फाटा येथे सकल मराठा समाजाच्या वतीने सरकारच्या विरोधात रस्तारोको आंदोलन करण्यात आले. शनिवारी सकाळी ११ ते १ या दरम्यान एकत्र येऊन राजुर-भोकरदन रस्त्यावरील चिंचोली फाटा येथे सकल मराठा समाजाच्या वतीने रास्तारोको आंदोलन करून सगेसोयरे अध्यादेशाची तात्काळ अमलबजावणी करण्याची मागणी सकल मराठा समाजाच्या वतीने शासनाला करण्यात आली.यावेळी छत्रपती शिवाजी महाराज की जय,जिजाऊ जय शिवराय अशा घोषणा देण्यात आल्या. मराठा समाजाने केलेल्या रस्तारोको आंदोलनामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्या होत्या.यावेळी महिलांसह मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनादरम्यान कुठे अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणात बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



# संत शिरोमणी रविदास महाराज यांची जयंती मोठ्या आनंदाने आणि हर्षोल्लासात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** तालुक्यातील श्री क्षेत्र लोणी बू येथील ग्राम पंचायत कार्यालयात आज दिनाक 24 फेब्रुवारी 2024 रोजी सकाळी नऊ वाजता संत शिरोमणी रविदास महाराज यांची जयंती मोठ्या आनंदाने आणि हर्शोल्लासांत साजरी करण्यात आली. यावेळी संत रविदास महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. असून त्यांनी केलेल्या समाजोपयोगी कार्यावर प्रकाश टाकण्यात आला. संत रविदास महाराजांनी भारतभर फिरून त्यांनी समाज सुधारणेचे महान कार्य केले. मन चंगा तो कटोटी मे गंगा असे महान विचार संत रविदास महाराजांचे होते. त्यांना देशातील समाज सुधारकांमधे अग्रणी स्थान आहे. संत रविदास यांना अनेक नावांनी ओळखल्या जाते. त्यांचे नाव हे सूर्या प्रमाणे तेजस्वी असल्याने रविदास असे ठेवण्यात आले. ते एक कुलभूषण कवी होते. त्यांनी केलेल्या रचना, दोहे आजही गुरू ग्रंथ साहिबमधे आपल्याला वाचायला मिळतात. अशा थोर समासुधारकांची जयंती लोणी बू येथील ग्राम पंचायत मधे साजरी करण्यात आली. यावेळी ग्राम पंचायत सरपंच राजू चौगुले,ज्येष्ठ मार्गदर्शक भावलाल बनपुरे, भीमराव काने,रामभाऊ बनपुरे, यांच्यासह किशोर करगे, संतोष इंगोले, दशरथ पारवे,आत्माराम राऊत, संजय बनपुरे, संतोष बनपुरे, ग्राम पंचायत सदस्य निलेश बोडखे, भास्कर नरवाडे, अरविंद इंगोले, विनोद बोडखे, रामेश्वर टकले, प्रवीण बोडखे संतोष खेलबाडे, रवी बोडखे, प्रकाश पारवे, किशोर पारवे आदी उपस्थित होते.

# आ. प्रशांत बंब यांच्या विकास निधीतून 10 कोटी 84 लक्षांच्या विकासकामांचे उदघाटन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यात मा.आमदार प्रशांतजी बंब साहेब यांच्या विकास निधीतुन विविध विकास कामांचा लोकार्पन व शुभारंभ भारतीय जनता पार्टी चे जिल्हा अध्यक्ष संजय खंबायते, आमदार बंब साहेबांचे स्वीयसहाय्यक रज्जाक पठाण, जिल्हा सरचिटणीस एल.जी.गायकवाड,भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, विधानसभा निवडणुक प्रमुख विकास कापसे, तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे,यांच्या प्रमुख उपस्थितीत आज करण्यात आला. त्यामध्ये भडजी येथे जिल्हा नियोजन समिती मार्फत मा.आमदार प्रशांतजी बंब साहेब यांच्या शिफारसीनुसार 36 लक्ष रुपये च्या 3 शाळा वर्गखोल्याचे लोण्याचा आज करण्यात आले. देवळाणा येथील राष्ट्रीय महामार्ग 752 ते देवळाणा (बु) ते हरीजन वस्ती की.मी.0/00 ते 4/800 रक्कम 3 कोटी लक्ष रुपयाचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे उदघाटन करण्यात आले. देवळाणा येथील जिल्हा परीषद शाळेसमोरील नदीवरील पुल बांधकाम करणे 2 कोटी 50 लक्ष रुपयाचे उदघाटन करण्यात आले. भांडेगाव ते खांडीपिपंळगाव रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे 2 कोटी रुपये भांडेगाव येथे जलसंधारण विभागाच्या दोन केटीवेअर 1कोटी 59 लक्ष रुपयाचे उदघाटन करण्यात आले. माटरगांव येथे कब्रस्थानला वॉल कंपाऊड करणे 5 लक्ष रुपये (आमदार निधी) उदघाटन करण्यात आले. वडोद (कान्होबा) येथे वडोद ते कानिफनाथ मंदिर रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे इ.जी.मा.कि.मी 0/200 कि.मी. ते 1/200 रक्कम 1कोटी 4 लक्ष रुपयाचे उदघाटन करण्यात आले. येसगांव 1 येथे मा.आमदार प्रशांतजी बंब साहेब यांनी केलेल्या शफिारसीनुसार 25/15 योजनेअंतर्गत 10 लक्ष रुपयांचे व शादीखान्याचे व 10.लक्ष रुपये कब्रस्थानला सैरक्षण भिंत बांधकाम करणे.25/15 अंतर्गत गावांतर्गत पेव्हर ब्लॉक बसवणे 5 लक्ष अशा विविध 10 कोटी 84 लक्ष रू विकास कामाचे लोकार्पण व उदघाटन भारतीय जनता पार्टी चे जिल्हा अध्यक्ष संजय खंबायते, आ. प्रशांत बंब साहेबांचे स्वीयसहाय्यक रज्जाक पठाण, जिल्हा सरचिटणीस एल.जी.गायकवाड, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, विधानसभा निवडणुक प्रमुख विकास कापसे, तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे, माजी सभापती गणेश नाना अधाने, माजी उपसभापती प्रकाश चव्हाण, दिनेश अंभोरे, शहर अध्यक्ष परसराम बारगळ, अध्यात्म आघाडीचे जिल्हा अध्यक्ष अजिनाथ जाधव, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष सतीश खंडागळे, सहकार आघाडी अध्यक्ष सुरेश जाधव, बाबासाहेब औटे, गणेश वाकळे, सरपंच बाबासाहेब वाकळे, राजु वाकळे, सुरेश वाकळे, विजय वाकळे, हारुण शेख, रत्नाकार वाकळे, बाळु वाकळे, बाजीराव वाकळे, मुख्याध्यापक शेळके सर, चव्हाण सर, ज्ञानेश्वर गवळे, शालेय समिती अध्यक्ष रामेश्वर वाकळे, शिवनाथ गायके, सुमित चाबुकस्वार, अविनाश वेताळ, रामेश्वर चव्हाण, भाऊसाहेब चव्हाण, विलास चव्हाण, सतिश जैस्वाल , राहुल चव्हाण, उपसरपंच शिवकन्या चव्हाण, योगेश काळे, उपअभियंता कोलते साहेब, जे.ई.चव्हाण साहेब, संदिप कामठे, संदिप निकम, रामेश्वर वेताळ, संतोष वाकळे, आनंदा काटकर, सतिश चव्हाण, दिलीप वाकळे, मच्छिंद्र वाकळे, शेख कादरभाई, बंडु चव्हाण, द्वारकादास जाधव, भागचंद जोनवाल, प्रेमसिंग जोनवाल, तसेच तालुक्यातील लोकप्रतीनीधी पदाधिकारी, व कार्यकर्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# आठवडाभरानंतर पाणीपुरवठा तोही दूषित

## पाण्याची समस्या सोडवा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) गटाचे मनीष नरवडे यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील अनेका भागांना आठवडाभरानंतर पाणीपुरवठा झाला. त्यातही दुषित पाणीपुरवठा होत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. गुरुवारी सिडको एन ६ येथील संभाजीकॉलनीत थेट ड्रेनेज मिश्रीत पाणीपुरवठा झाल्याने नागरिकांतून संताप व्यक्त करण्यात आला आहे. वारंवार तक्रारीनंतरही महापालिका दुलक्षच करीत असल्याचा आरोप नागरिकांनी केला. शहरवासियांना दोन दिवसाआड पाणीपुरवठा करण्यासाठी दहा दिवसांपूर्वी महापालिका पाणीपुरवठा विभागाने आठ तासांचा शटडाऊन घेत जायकवाडी, फारोळा जलशुद्धीकरण केंद्र परिसरात जून्या १२०० मि.मी. व्यासाच्या जलवाहिनीला नवीन ९०० मि.मी. व्यासाची जलवाहिनी जोडली. या जोडणीसाठी घेण्यात आलेला शटडाऊन ८ हून ३३ तासांवर गेला, त्यामुळे दोन दिवस शहरात निर्जळी राहिली. त्यानंतर सलग तीन वेळा जलवाहिनी फुटल्याने आणखी निर्जळीचा सामना करावा लागला. सिडको एन ६ भागात 10 दिवसानंतर पाणीपुरवठा करण्यात आला. परंतु, नळ- द्वारे ड्रेनेज मिश्रीत पाणी आल्याने नागरिकांतून संताप व्यक्त करण्यात आला. ड्रेनेज चोकअप होत असल्याने त्याचे पाणी जलवाहिनीतून घरात येत आहे. याबाबत अनेकवेळा मनपाकडे तक्रारी केल्या. परंतु, त्याकडे दुर्लक्षच होत आहे. मनपाने तातडीने समस्या मार्गी लावावी, अशी मागणी रिपाइं (खरात गट) मनीष नरवडे यांनी निवेदनाद्वारे मनपा प्रशासनाला केली आहे



# शांताराई उच्च माध्यमिक विद्यालय उच्च माध्यमिक शालांत परीक्षा सुरळीतपणे सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील ताजनापूर येथील शांताराई उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये उच्च माध्यमिक शालांत बारावीची परीक्षा सुरळीतपणे सुरू असून महाविद्यालयाचे केंद्रप्रमुख केंद्र संचालक कोमल मुळे यांच्या नियंत्रणाखाली एकूण विद्यार्थी 184 पैकी 166 विद्यार्थी परीक्षा देत आहेत या ठिकाणी कॉफी मुक्त अभियानाचे बैठक पथक तैनात करण्यात आले असून सुरळीतपणे पार पडले असून कॉफी मुक्त व भयमुक्त वातावरणात परीक्षा होत असल्याची खात्री करीत आहेत तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य गणेश काळे केंद्र संचालक श्रीमती कोमल मुळे रनर वाघ पी.व्ही अमोल दांडेकर यांनी काम पाहिले.



# जिजाऊसृष्टीवरील विकास कामांसाठी ४९ कोटी ७१ लाख

## आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे यांच्या प्रयत्नांना यश

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांचे जन्मस्थळ



असलेल्या सिंदखेडराजा विकास आराखड्यातील जिजाऊ सृष्टी येथील विकास कामांकरिता ४९ कोटी ७१ लाख रुपये निधी मंजूर झाला असून त्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. जिजाऊ सृष्टी येथे येणाऱ्या जिजाऊ भक्तांच्या सोयी सुविधांसाठी तसेच जिजामातेंच्या जन्मस्थळाच्या विकासासाठी आ डॉ.शिंगणे यांचे मंत्रालय त्यावर साततत्याने पाठपुरावा सुरू होता. जिजाऊ जन्मस्थळाचा विकास व्हावा यासाठी आमदार शिंगणे यांच्या प्रयत्नातून खालील कामांना निधी मंजूर करण्यात आला असून प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

यामध्ये जिजाऊ सृष्टी सिंदखेड राजा येथे प्रशासकीय इमारत, सोव्हेनियर शॉप व कॅफेटेरिया बांधकाम करणे साठी ११ कोटी ३० लक्ष,महीला पर्यटक व कलाकारांसाठी निवासी व्यवस्था बांधकाम करणे रु.१४ कोटी ५९ लक्ष,सांस्कृतिक सभागृह व निवासी व्यवस्था बांधकाम करणे. रु.१५ कोटी ९९ लक्ष ,प्रार्थना व प्रबोधन कक्षचे बांधकाम करणे करिता रु. ७ कोटी ८३ लक्ष, असा एकूण ४९ कोटी ७१ लाख एवढा निधी आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे यांच्या प्रयत्नांतून मंजूर झाला आहे. त्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून मंजूर कामांमधून मातृतीर्थ सिंदखेडराजा शहर व जिजाऊ सृष्टीच्या विकासामध्ये भर पडली जाणार आहे. याच बरोबर शहरातील विविध भागामध्ये ८२ लाख ८३ हजार सातशे पंच्याहत्तर रुपये निधी नवे विद्युत रोहीत्र बसविणे तसेच इतर विद्युत कामे याकरिता प्राप्त झाला असून त्याला प्रशासकीय मान्यता देखील प्राप्त झाली आहे.



# महिला, मुलींसाठी कायदेविषयक कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**पान वडोद :** महिला समुपदेशन केंद्र पोलीस स्टेशन शहर सिल्लोड यांच्या वतीने जिल्हा परिषद प्रशाला येथे मुलींसाठी कायदेविषयक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री.बी.एस. पाटील होते तर उद्घाटक व प्रमुख वक्ते म्हणून एडवोकेट श्रीमती रुपाली जाधव, एडवोकेट आकाश जाधव, बार्टीचे समतादुत उमाकांत बोराडे व मनोहर अपार, महीला समुपदेशन केंद्राचे विशाल पाईकराव आणि आरती जाधव हे होते. यावेळी एडवोकेट श्रीमती जाधव यांनी सांगितले की मुलींनी आपल्या कायदेविषयक अधिकाराविषयी जागरूक असले पाहिजे. बार्टीचे उमाकांत बोराडे यांनी मुलींच्या शिक्षणविषयी अत्यंत महत्वाचे मार्गदर्शन केले. महीला समुपदेशक केंद्राचे विशाल पाईकराव यांनी समुपदेशन केंद्र काय आहे त्याचे कामकाज कसे चालते त्यातून मुलींना काय मदत होते याविषयी सखोल असे मार्गदर्शन केले.



# पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीत कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे निषेध आंदोलन !

आधुनिक केसरी न्यूज

**पारनेर :** केंद्र शासनाने दोन दिवसांपुर्वी कांदा निर्यातबंदी उठविण्याबाबत निर्णय घेतल्याचे प्रसिध्दी माध्यमांचे माध्यामातुन बातम्या आल्या त्यामध्ये 3 लाख मे. टन कांदयाची निर्यात करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे प्रसिध्द करण्यात आले होते. त्यामुळे कांदा उत्पादकांना थोडया प्रमाणात भाव वाढीची अपेक्षा लागली होती. पण शासनाने या बाबत कोणतीही अधिकृत शासन निर्णय अथवा नोटीफिकेशन काढले नाही.त्यामुळे दुसऱ्याचे दिवशी थोडीफार भावात सुधारणा झाली होती. परंतु शासनाचे वतीने कोणताही निर्णय न घेता 31 मार्च 2024 पर्यंत निर्यात बंदी कायम ठेवण्यात आल्याची सांगण्यात आले.त्यामुळे कांदा उत्पादक,व्यापारी यांना मोठया प्रमाणात आर्थिक फटका बसुन कांदा उत्पादकांचे आशेवर पाणी फिरवले गेले. त्यामुळे लगेचच कांदयाचे भाव बाजार समित्यांमध्ये गडगडल्याचे दिसुन आले या सर्व बाबीचा निषेध करण्यासाठी पारनेर कृषि उत्पन्न बाजार समिती येथे कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी एकत्र येवुन निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांनी गेल्या तीन ते चार वर्षापासुन कांदयाचे उत्पादन खर्च ही भागत नसतांना शासन फक्त पिकवणाऱ्यां पेक्षा खाणाऱ्यांचा जास्त विचार करीत आहे.

शेतकऱ्यांचे कोणत्याही शेतमालाला सध्या कवडी मोल भाव मिळत आहे. त्यामुळे शेतकरी खऱ्या अर्थानी कर्ज बाजारी झालेला असुन आता आत्महत्ते शिवाय शेतकऱ्यांपुढे पर्याय नसल्याचे तीव्र भावना शेतकरी वर्गातुन व्यक्त करण्यात आल्या. यावेळी व्यापारी वर्गा मार्फत ही शेतकऱ्यांना पाठींबा देवुन व्यापारी हे शेतकऱ्यांचे शेतमालाला योग्य भाव देण्याचा प्रयत्न करतात. परंतु शासनाने अशा निर्णयामुळे भावातील चढ उतारामुळे व्यापारी वर्गाला आर्थिक फटका बसतो असे व्यापारी असोसिएशन तर्फे सांगुन निषेध व्यक्त करण्यात आला.यावेळी बाजार समितीचे सभापती बाबासाहेब तरटे यांनी केंद्र शासनाची भुमिका नेहमी शेतकरी विरोधी असुन यापुर्वी ही आम्ही निर्यात बंदी उठविण्याबाबत मागणी केली. पण शासनाने शेतकऱ्यांची फसवणुक केलेली असुन याबाबत शेतकऱ्यांनी शासनाचे विरोधात रस्त्यावर उतारण्याचे आवाहन करण्यात आले व शेतकऱ्यांचे आंदोलनाला नेहमीच बाजार समितीचे सर्व संचालक मंडळाचा पाठींबा राहील असे जाहीर करुन सर्व कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे वतीने निषेध व्यक्त करण्यात आला.

# बसस्टँड परिसरात चौपदरीकरण न झाल्यास उपोषणाचा इशारा

## पाणी मारीत नसल्याने वाहन -चालक धुळीने त्रस्त

आधुनिक केसरी न्यूज

**सुरेश बोकील**

**पीरबावडा :** पाल फाटा ते राजुर या महामार्गावर जवळपास सहा महिन्यापासून सिमेंट रस्त्याचे काम चालू आहे सदरील रस्त्यावर तळेगाव ,टाकळी कोलते, पिरबावडा ही बाजारपेठेची गावे असून तळेगाव व टाकळी कोलते या ठिकाणी बस स्टँडच्या परिसरात चौपदरीकरण आणि नाल्यांचे काम सुरु करण्यात आले आहे.परंतु पीरबावडा हे पंचक्रोशीतील मोठी बाजारपेठ असून या गावात आजूबाजूच्या जवळपास वीस पंचवीस गावांतील नागरिकांचे रोज व्यवहारासाठी येणे जाणे असते. शिवाय येथे बँक,शाळा, बाजार आदीसाठी बाजूच्या गावातील नागरिकांना दररोज यावे लागते. त्यामुळे येथे मोठ्या प्रमाणात रहदारी असते. तरीसुद्धा पिरबावडा या गावाला

> रस्ता खोदून तीन महिने उलटून ही ह्या रस्त्याचे काम होत नसल्याने धुळीने दुकान, घर तसेच आरोग्य तर बिघडतच आहे परंतु छोटे-मोठे अपघात होत आहेत यासाठी संबधित ठेकेदार कंपनीने सदरील काम लवकर चालू केले नाही तर गावात रस्ता रोको करण्यात येईल.
> **(कलीम शेख दुकानदार)**

चौपदरीकरणातून वगळण्यात आले आहे. त्यासाठी पिरबावडा ग्रामपंचायतीने दोन महिन्यापूर्वी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे व सार्वजनिक बांधकाम विभाग छत्रपती संभाजी नगर यांच्याशी पत्रव्यवहार केला आहे.

त्या अनुषंगाने केंद्रीय मंत्री यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग अधीक्षक अभियंता यांना पत्राद्वारे कळवले आहे की संबंधित कामाची दखल घेऊन काम मार्गी लावावे. परंतु अद्यापही या कामाची दखल घेतली गेली नाही. शिवाय नुकत्याच झालेल्या पिरबावडा येथील ग्रामसभेत सुद्धा चौपदरीकरणाचा ठराव घेण्यात आलेला आहे. जवळपास दिड किलोमीटर रस्ता चे काम बंद असल्यामूळे या रस्त्यावरून ये जा करणाऱ्या वाहनधारकांना धुळीचा व खराब रस्त्याचा सामना करावा लागत आहे. या धुळीमुळे या रस्त्यावर छोटे-मोठे अपघात घडत आहेत. तसेच आरोग्याला सुद्धा बाधा पोहोचत आहे. शिवाय व्यावसायिक या धुळीमुळे त्रस्त झाले आहे. तसेच या रस्त्यावर संबंधित ठेकेदार पाणी मारत नसल्याने धुळीचे प्रमाण वाढले आहे. तरी संबंधीत विभागाने तात्काळ दखल घेत चौपदरीकरणाचे काम मार्गी लावावे नसता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या छत्रपती संभाजी नगर येथील कार्यालय समोर उपोषण करण्याचा इशारा सरपंच डॉ. सारंग गाडेकर व ग्रामस्थांनी दिला आहे.



# सावळदबारा ग्रामपंचायत कार्यालयात संत गाडगेबाबा जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील ग्रामपंचायत कार्यालय येथे संत गाडगेबाबांची जयंती साजरी करण्यात आली. गावाचे सरपंच शिवगंगा शिवाआप्पा चोपडे, उपसरपंच मो आरिफ मो लुखमान व ग्रामपंचायत सदस्य मोहन सुरडकर यांनी गाडगेबाबांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची चर्चा केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा योगेश चोपडे मुख्याध्यापक यांनी केले. प्रा योगेश चोपडे मुख्याध्यापक यांनी संत गाडगे महाराजांबद्दल आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले की, गाडगे महाराज हे गोरगरीब दीनदलित यांच्या अज्ञान, श्रद्धा, अस्वच्छता कार्यकर्ता उच्चाटन समाजासाठी सुधारक होते. तीर्थंडापाणी देव रोकडा सज्ज धोनी ।" असे सांगतो दीन, दुबळे, अनाथ, अपंगांची सेवा करणारे थोर संत म्हणजे गाडगेबाबा. "देवळात जाऊ नका, मूर्तिपूजा करू नका, सावकाराचे कर्ज काढू नका, अडाणी विसरा, पोथी-पुराणे, तंत्र, देवस्की, चमत्कारी गोष्टींवर विश्वास ठेवा." अशी शिकवण आयुष्यभर त्यांनी लोकांना दिली. माणसात देव शोधला या संताने देवणग्यांतील लोकांतून रंजल्या-गाल्या, अनाथ लोकांसाठी ठिकाणाठीकाणी धर्मशा, अनाथालये, आश्रम, व विद्यालये सुरू केली. रंजले-गांजले, दीन-दुबळे, अपंग-अनाथ हेच त्यांच्या नजरेवर झंझ्या, खापरच्या तुकडीची टोपी, एका कानात कवडी, तर एकत्रित कानात फुटक्या बांगडीची काच, एका झाडू, जुळके असा त्यांचा वेश. त्यांच्या या जयंतीमुळे आज या ठिकाणी आपण गावामध्ये अशा प्रकारे त्यांची शिकवण स्वच्छता मोहीम समाजातली असली पाहिजे, असे ते म्हणाले, निगुडे उपपंच गुरुदास गवंडे यांनी संत गाडगेबाबाबद्दल आपले विचार व्यक्त केले, गाडगेबाबा अज्ञान, अंधश्रद्धा, भोळे समजूती, अनिष्ट रूढीपरंपरा दूर. पूर्ण पूर्ण वेचले. यासाठी त्यांनी कीर्तनाच्या मार्गाचा अवलंब केला. आपल्या कीर्तनात ते श्रोतच विविध प्रश्न विचारून त्यांची अज्ञानाची, दुर्गुण व दोषांचे दोष देत असतात. त्यांचे उपदेशही साधे, पुढे असते. चोरी करू नका, सावकार कर्ज काढू नका, व्यसनाच्या आहारी



जाऊ नका, देवा-धर्माच्या नावाश्यकता तुमची हत्या करू नका, जातिभेद व अस्पृश्य पालू असे ते सांगतात. देव दगड हा माणसात नसतो त्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला. ते संत तुकाराम महाराजांना आपले गुरू मानीत. 'मी कोणाचा गुरू नाही, कोणी शिष्य नाही' असे मला वाटते. आपले विचार साध्या भोळ्या लोकांना समजण्यासाठी ते ग्रामीण भागाचा उपयोग करत असते. गाडगेबाबांनी संत तुकारामांचे नेमक्या अभंगांचा मुबलक वापरही वेळो केला. 'देवभोळे माणसापासून ते नास्तिकापर्यंत, कोणत्याही वयोगटातील लोकांना गाडगेबाबा आपल्या कीर्तनात गुंतवून ठेवतात, आपले तत्त्वज्ञान पटवून देत असतात. त्यांच्या कीर्तनाचे शब्दचित्रे करणे माझे शब्दबाहेरचे काम आहे ! असे उद्गार बाबांचे चरित्रकार प्रबोधनकार ठाकरे काढले होते. गाडगे महाराज ईश्वर हे पश्चिम आहे ही नावकी सत्ता असलेले संत आणि गोरगरीब, दीनदलित सुरक्षित ऐकिक व आध्यात्मिक विकास होण्यासाठी अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता उच्चाटन करण्यासाठी तळमळीने कार्य करणारे होते. दीन, दुबळे, अनाथ, अपंगांची सेवा करणारे थोर संत म्हणजे गाडगेबाबा. उपसरपंच मो आरिफ मो लुखमान यांचे आभार व कार्यक्रमाची सांगता केली. यावेळी प्रा योगेश चोपडे, उपसरपंच मो आरिफ मो लुखमान,मोहन सुरडकर, माजी ग्रामपंचायत सदस्य फकीराभाऊ तडवी, पत्रकार जब्बार डी तडवी, तडवी, जेष्ठ पत्रकार गोकुळसिंग राजपूत, ग्रामविकास सेवक सुधीर भालेराव,आणिल राजपूत,सुरज राजपूत मुंबई,नरेश देशमुख, ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# भिकीबाई मोहनलाल गुगळे विद्यालयाचे एन.एम.एम.एस. शिष्यवृत्ती परीक्षेत १५ विद्यार्थी उत्तीर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**अजय नजन**

**भातकुडगाव :** सन २०२३-२४ मध्ये घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये भिकिबाई मोहनलाल गुगळे विद्यालयामधील इयत्ता आठवीतील १५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.उत्तीर्ण विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे कु.पवार ज्ञानेश्वरी किशोर कु. कंठाळी संस्कृती दादासाहेब उदागे ओंकार रामनाथ कंठाळी चैतन्य संदीप कु.शिंदे कावेरी शिवाजी उदागे ओंकार संदीप कु.उदागे श्रेया विक्रम कु.पवार श्रद्धा ज्ञानेश्वर कंठाळी संदेश संजय शिवम राम वाघ कु.उदागे ऋतुजा रघुनाथ काळे गणेश अशोक कु.शिंदे रूपाली रवींद्र कु.शिंदे ज्ञानेश्वरी बाबासाहेब कु.बढे प्रणाली विक्रम मिळाले. विद्यालयाच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे प्रमुख पाहुणे प्राचार्य सुनिल पंडीत जिल्हाध्यक्ष व राज्य सहसचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळ भाग्योदय विद्यालयाचे प्राचार्य ज्ञानदेव बेरड शिशु संगोपन संस्थेचे चेअरमन दिलीपजी गुंदेचा व्हाईस चेअरमन दशरथ खोसे सेक्रेटरी र.धो कासवा विद्यालयाचे मुख्याध्यापक भिकाजी गावडे यांनी अभिनंदन केले.तसेच सर्व सेवकवृंद, पालक व ग्रामस्थ यांनी हार्दिक अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन गणेश राऊत यांनी केले तर आभार अशोक मिसाळ यांनी मानले

# धर्म संस्थापनेसाठीच भगवंताचा अवतार : राघवेंद्र बुवा रामदासी

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासे :** नगरीचे ग्रामदैवत श्री मोहिनीराजांच्या यात्रा उत्सवाच्या निमित्ताने आयोजित सात दिवशीय श्रीमद भागवत कथेची शुक्रवारी दि.२३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी भक्तिमय वातावरणात उत्साहात सांगता करण्यात आली.धर्म संस्थापनेसाठीच भगवंताचा अवतार झाला असून आपले जीवन घडविणाऱ्या भगवंत व गुरूला जीवनात आपलेसे करा असे आवाहन भागवत कथाकार राघवेंद्र बुवा रामदासी यांनी यावेळी बोलताना केले. सात दिवस चाललेल्या भागवत कथेच्या प्रसंगी सकाळी प्रसाद गंधे गुरुजी यांनी भागवत संहिताचे वाचन केले तर दुपारी २ ते ६ वेळेत सज्जनगड येथील भागवताचार्य राघवेंद्र बुवा रामदासी यांनी आपल्या सुश्राव्य वाणीतून कथेद्वारे निरूपण केले.जेव्हा जेव्हा धर्मावर संकट येते तेव्हा तेव्हा धर्म रक्षणासाठी व धर्म संस्थापनेसाठी भगवंताचा अवतार होत असतो हे सर्व काही शास्त्रानुसार चालते म्हणून शास्त्र हे महत्वाचे असून त्याची टिंगल टवाळी कधीही करू नका,सदगुरूची कृपा आपल्यावर झाली तर त्याला काहीही कमी पडत नाही म्हणून जीवनात भगवंत व गुरूला आपलेसे करा व आपल्या जीवाला घडविणाऱ्या सदगुरू चरणी शरण जा असे आवाहन राघवेंद्र बुवा रामदासी यांनी यावेळी बोलताना केले. सात दिवस चाललेल्या भागवत कथेच्या निरुपण प्रसंगी रामदासी बुवांनी उभाविकांना मंत्रमुग्ध केले कथेच्या प्रसंगी बेलापूर येथील चंदन परांजपे यांनी उत्कृष्ट हार्मोनियमसह गायनाची तर नेवासा येथील कृष्णा कुलकर्णी यांनी तबला वाद्याची उत्कृष्ट संगीत साथ दिली. भागवत कथेच्या समारोप प्रसंगी श्री मोहिनीराज मंदिराचे मुख्य पुजारी भालचंद्र बडवे,पत्रकार गुरुप्रसाद देशपांडे व सौ.स्मिताताई देशपांडे,पत्रकार अशोक डहाळे व सौ.कल्पना डहाळे, पत्रकार सुधीर चव्हाण व सौ.संगिता चव्हाण, कृष्णा कुलकर्णी, सौ.व श्री प्रदीप औटी, सौ. व श्री गणेश परदेशी,सौ.व श्री निलेश जोशी,विजय कावरे व सौ.मंदाताई कावरे,संतोष गव्हाणे व सौ.अर्चना गव्हाणे, सौ.व श्री गोसावी सर,सौ.व श्री एकनाथ कुटे,सौ. व श्री नंदकिशोर पाराशरे, श्रीसंजय कुलकर्णी,शैलेंद्र शिंगणे,बालूकाका जोशी,श्री व सौ चिकटे यांच्या हस्ते सपत्नीक महाआरती करण्यात आली. यावेळी झालेल्या भागवत कथा सांगता सोहळयाचे सूत्रसंचालन डॉ. प्रणव जोशी यांनी केले यावेळी उपस्थित भाविकांनी प्रसादाचे वाटप करण्यात आले.



# दुर्गम गाजदीपूरचे दळणवळण होणार सुलभ

## वन विभागाच्या हद्दीतून रस्ता करण्यास परवानगी

आधुनिक केसरी न्यूज

**पारनेर :** वडगाव सावताळलगत असलेल्या दुर्गम गाजदीपुरचे दळणवळण स्वातंत्र्यानंतर प्रथमच सुलभ होणार आहे. वडगांव सावताळ ते गाजदीपुर हा रस्ता करण्यासाठी वन विभागाच्या उपवनसंरक्षक सुवर्णा माने यांनी मान्यता दिली असून लवकरच या कामाला सुरूवात होणार आहे. वन विभागाच्या हरकतीमुळे या रस्त्याचे काम पिढयान पिढयांपासून खोळंबले होते. आमदार नीलेश लंके यांनी वन विभागाकडे वारंवार केलेल्या पाठपुराव्यास यश आले असून लवकरच या रस्त्याच्या कामाला सुरूवात होणार आहे. स्थानिक आमदार निधीअंतर्गत वाडगांव सावताळ ते गाजदीपुर या रस्ता कामासाठी अनुसूचित जमाती व इतर पारंपारीक वन निवासी अधिनियम २००६ मधील कलम ३/२ अंतर्गत वन विभागाची मंजुरी मिळविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंत्यांनी वन विभागाकडे प्रस्ताव सादर केल्यानंतर टाकळी ढोकेश्वर येथील वन परिक्षेत्र अधिकारी यांनी बांधकाम विभागाच्या प्रतिनिधींसोबत स्थळ पाहणी करून वन विभागास अहवाल सादर केला. गाजदीपुर फॉरेस्ट गट क्र.३ मधील ०.७६ हेक्टर वन क्षेत्रामधून हा रस्ता प्रस्तावित आहे. मुळ सर्वे नंबर ६८ मधील गट नंबर ३मधून १ हजार ९०० मिटर लांबी व ४ मिटर रूंदीचा हा रस्ता राखीव वन क्षेत्रातून जाणार आहे. टाकळी ढोकेश्वरच्या वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या अहवालानंतर .७६ हेक्टर वन क्षेत्र खुले करण्यास माने यांनी मान्यता दिली आहे. या कामास मंजुरी मिळाल्याने गाजदीपुरसारख्या दुर्गम गावात जाण्यासाठी तेथील आदीवासी बांधवांची होणारी परवड थांबणार आहे. पावसाळयात या भागातील आदीवासींना मोठया समस्यांना समोरे जावे लागत असे. या आदिवासी बांधवांची जिव्हाळयाची मागणी आ. नीलेश लंके यांनी उचलून धरीत वन विभागाच्या परवानगीसाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यास अखेर यश आल्याने लवकरच या रस्त्याचे काम पुर्ण होणार आहे.





**नांदूरपठार–कळसचेही दळणवळण सुलभ :** शेजारी असलेल्या नांदूरपठार व कळस या गावांमधील दळणवळणही वन विभागाने या दोन गावांमधील रस्ता करण्यासाठी यापूर्वीच मान्यता दिल्याने सुलभ झाले आहे . यापूर्वी दोन्ही गावांशी संपर्क करायचा झाल्यास पुणे जिल्हयातील आणे, गुळंचवाडी, बेल्हे या मार्गाने नांदूरपठार वरून ३५ किलोमीटर अंतर पार करून कळस येथे पोहचावे लागत असे . आ . लंके यांच्या प्रयत्नांतून वन विभागाने या दोन गावांतील रस्त्यासाठी परवानगी देण्यात आल्याने दोन गावांतील अंतर ६ किलोमीटरवर आले असून या रस्त्यावरून वाहतूकही सुरू झाली आहे .

**गाजदीपुरकरांची कृतज्ञता :** गाजदीपुर रस्त्याच्या कामाची वर्षानुवर्षांची मागणी आ . नीलेश लंके यांनी पाठपुरावा करून पुर्ण केल्याने गाजदीपुरच्या आदिवासी बांधवांनी आ . नीलेश लंके यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे .

# वाशी शहरात दहशतीचे वातावरण, शहर कडकडीत बंद

## दोन गटात झालेल्या हाणामारीने व अवैध धंद्याने जनसामान्यांचा जीव टांगणीला

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** जिल्ह्यातील वाशी शहरात शिवजयंती मिरवणुकीमध्ये काही मुलामध्ये डिजे समोर नाचण्याच्या कारणावरून कुरबुर झाली होती. नंतर या भांडणाचे स्वरूप वाढतं जाऊन दी-22रोजी रात्री सात ते आठच्या दरम्यान दोन गटांमध्ये तुंबळ हाणामारी झाली.

यामुळे शहरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहर पोलिसांची बघ्याची भूमिका, मटक्याचे, गुटख्याचे, जुगाराचे, गावठी दारू चे तसेच अवैध धंद्याचे वाढलेले प्रमाण त्यामुळे शहरात गुंडगिरी वाढत आहे.

याच कारणामुळे शहरातील तणावपुर्ण वातावरणात काही दुर्घटना घडू नये म्हणून वाशी शहरातील व्यापारी वर्गाने आज दी 23 रोजी दुपारपर्यंत कडकडीत बंद पाळला आहे.

एकीकडे दुष्काळी परिस्थिती ने शेतकरी तसेच व्यापारीवर्ग हवालदिल अन् त्यात भाजी मार्केट किराणा व इतर बाजारपेठा बंद यामुळे घरचे झाले थोडे व्याह्याने धाडले घोडे अशिच अवस्था वाशीकरांची झालेली आहे. अत्यंत शांतता प्रिय असणारे हे वाशी शहर गेल्या काही दिवसांपासून अवैध धंदे, राजकीय तेढ, तरुणातील वाढती गुन्हेगारी प्रवृत्ती यामुळे आज शहरातील जनसामान्य लोक दहशतीत वावरत आहेत. वाशी शहरातील पोलीस प्रशासन अजून किती दिवस बघ्याची भूमिका बघणार? असा संतप्त सवाल वाशी नागरिकांमधून होत आहे. या रोजच्या वाढत्या भांडणामुळे एखाद्याचा बळी गेल्यावरच पोलिसांना जाग येणार का? अवैद्य धंद्यातून हप्ते वसुलीत गुंग असणाऱ्या पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांना या सामान्यांची हाक ऐकू आली तर शहरातील दहशतीचे वातावरण निवळण्यास मदत होईल असेही ज्येष्ठ नागरिकांमधून बोलले जात आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in




# शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबिराचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** एम.आय.टी. पॉलिटेक्निक रोटेगाव येथे छत्रपती शिवाजी महाराजांची 394वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शिव व्याख्याते श्री. सचिन पाटील कुऱ्हाडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज आदर्श मातृभक्त होते असे सांगितले. महाराजांचे विचार आणि आचार आपण अंगीकारले पाहिजे, तरच आपल्याला महाराज खऱ्या अर्थाने कळाले, असे म्हणता येईल. यावेळी त्यांनी महाराजांची अर्थनीती, शेतीविषयक धोरणे, माता-भगिनींचा आदर, आरमार विषयक धोरणे, जलदुर्गांचे व किल्ल्यांचे महत्व, आदर्श व्यवस्थापन, अशा विविध विषयांवर प्रकाश टाकला. यावेळी संस्थेचे प्राचार्य प्रा.किशोर पाटील, अधिकारी वर्ग प्रा.डी.पी. आव्हाळे, प्रा.एन.आर.सोनवणे यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कु.प्राची कुंदे, कु.समृद्धी गायकवाड, सचिन सूर्यवंशी, अभिषेक पवार, कु.प्राजक्ता राजपूत यांनी शिवाजी महाराजांचे विचार विद्यार्थ्यांसमोर मांडले तर कु.महिका राजस, कु.ऋतुजा महेर, कु.शितल जेवूघाले यांनी पोवाडा सादर केला. याप्रसंगी सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी आणि मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थितीत होते. सुत्रासंचालन कु.श्रध्दा सरोदे व कु.ऋतुजा थोरात यांनी तर आभार प्रदर्शन कु.अश्विनी काळे हिने केले. तसेच शिव जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यात एकूण 38 विद्यार्थी आणि प्राध्यापक यांनी रक्तदान करून आपला सहभाग नोंदविला. छत्रपती संभाजीनगरच्या दत्ताजी भाले रक्तपेढीच्या सहकार्याने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी संस्थेचे प्राचार्य प्रा.किशोर पाटील यांनी रक्तदानाचे महत्त्व विशद केले, तसेच सर्व रक्तदात्यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी प्रा.व्ही.जी.तळेकर, प्रा.यु.एच.चव्हाण, सर्व विभाग प्रमूख प्रा.जी.ए. भिसे, प्रा.एस.एन.पाठक, प्रा.व्ही.एम.जाधव, प्रा. एस. राम, प्रा.सागर सहाणे तसेच सर्व प्राध्यापक वृंद, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. दत्ताजी भाले रक्तपेढीचे आप्पासाहेब सोमासे व त्यांचे सहकारी यांनी मोलाचे योगदान केले. या दोन्ही उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रा.डॉ.वाय.ए.कवडेसर, महासंचालक प्रा.मुनिषजी शर्मा यांनी सर्व विद्यार्थ्यांचे तसेच सर्व प्राध्यापक वृंद, कर्मच्याऱ्याचे अभिनंदन केले.

# मुख्यमंत्री माझी शाळा स्पर्धेत सिनगाव जहागीर जि.प. शाळा अव्वल

आधुनिक केसरी न्यूज

**देउळगाव राजा :** महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने यावर्षी आयोजित करण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या स्पर्धेमध्ये देऊळगाव राजा तालुक्यातील जिल्हा परिषद सिनगाव जहागीर ही शाळा स्थानिक स्वराज्य संस्था गटातून प्रथम आली तसेच खाजगी शाळांच्या गटातून देऊलगाव राजा हायस्कूल देऊळगाव राजा ही शाळा प्रथम आली. देऊळगाव राजा तालुक्यातील जिल्हा परिषद नगरपालिका व खाजगी शाळा यांचा अत्यंत हिरीरीने या स्पर्धेत सहभाग दिसून आला. या स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन शाळांची रंगरंगोटी सजावट व शाळांमध्ये विविध उपक्रम राबविले... त्यामुळे शाळेतील शिक्षक, विद्यार्थी यांचा उत्साह वाढला.. स्थानीक स्वराज्य संस्था गटातून प्रथम क्रमांक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सिनगाव जहाँ, द्वितीय क्रमांक छत्रपती शिवाजी महाराज न प हायस्कूल देऊळगाव राजा तृतीय क्रमांक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा टाकरखेड भागीले . खाजगी शाळा गटातून प्रथम क्रमांक देऊळगाव राजा हायस्कूल दे राजा द्वितीय क्रमांक प्रबोधनकार ठाकरे विद्यालय सरांबा व तृतीय क्रमांक राणी लक्ष्मीबाई आश्रम शाळा शिवणी अरमाळ या शाळांना मिळाला.

तालुका स्तरावर प्रथम बक्षिक 3 लाख , द्वितीय बक्षिस 2 लाख व तृतीय बक्षिस 1 लाख या प्रमाणे आहे...

या उपक्रमासाठी जि प बुलढाणा चे CEO श्री विशाल नरवाडे व शिक्षण अधिकारी श्री बी आर खरात यांचे मार्गदर्शना खाली, तालुका स्तरावर मुकेश माहोर गटविकास अधिकारी, अरूण मोकळ मुख्याधिकारी, दादाराव मुसदवाले गटशिक्षण अधिकारी, भास्कर वाघमारे विस्तार अधिकारी, युनूस पठाण प्रशासन अधिकारी, बबन कुमठे गट समन्वयक., विनोद सोनुने अधिक्षक पोषण शक्ती योजना.. सर्व केंद्रप्रमुख , सर्व विषय साधन व्यक्ती, सर्व मुख्याध्यापक व शिक्षक यांनी सहभाग घेतला.



# खंडाळा येथे संत गाडगेबाबा जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** तालुक्यातील जिल्हा परिषद प्रशाला खंडाळा येथे माणसात देव सांगणारे संत गाडगेबाबा यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी गावातील विविध ठिकाणी विद्यार्थी व शिक्षक यांनी स्वच्छता फेरी काढून स्वच्छता केली. यासाठी मुख्याध्यापक अलाउद्दीन शेख , शिक्षक अशोक दारवंटे, ज्ञानेश्वर बहाळस्कर, इद्रिस मोगल,श्रीगोविंद त्रिभुवन, श्रीमती कल्पना गवारे, श्रीमती रेखा भालेकर, श्रीमती स्वेता बहिरट तसेच सर्व शिक्षा अभियान अभियंते सोमवंशी यांनी परिश्रम घेतले प्रसंगी विद्यार्थ्यांची महत्वपूर्ण उपस्थिती होती.

# 'अष्टपैलू' अशोक सराफ हे मराठी मातीतील अस्सल हिरा : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## अशोक सराफ यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज



**धाराशिव :** आपल्या अविस्मरणीय भूमिकांनी अष्टपैलू असणाऱ्या अशोक सराफ यांनी प्रेक्षकांची अभिरुची संपन्न केली. अवघ्या महाराष्ट्राला त्यांनी पोट धरुन हसवले. प्रसिद्धीचे इतके वलय मिळूनही त्यांनी कधीही जमीनीशी नातं तोडलं नाही. खऱ्या अर्थाने ते मराठी मातीतील अस्सल हिरा आहेत, अशा भाषेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांच्या कार्याचा गौरव केला. मराठी चित्रपटसृष्टी साठी जे जे आवश्यक आहे, त्या सर्व सुविधा राज्यात उपलब्ध करून देण्याचा आणि जगाला हेवा वाटेल अशी फिल्मसिटी आपण तयार करू, असे प्रतिपादन त्यांनी केले.

महाराष्ट्र शासनाकडून दिला जाणारा राज्याचा सर्वोच्च नागरी सन्मान असणारा "महाराष्ट्र भूषण" पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना तर मानाचा "गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार" ज्येष्ठ पार्श्वगायक सुरेश वाडकर यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रदान आज करण्यात आला.त्यावेळी मुख्यमंत्री श्री शिंदे बोलत होते. याशिवाय, मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीसाठी आपल्या कलेच्या माध्यमातून अनेक वर्ष योगदान देत रसिकांची व कलासृष्टीची सेवा करणाऱ्या ज्येष्ठ कलावंतांना दिला जाणारा राजकपूर जीवनगौरव आणि विशेष योगदान पुरस्कार, चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव आणि विशेष योगदान पुरस्कारही यावेळी प्रदान करण्यात आले. या समारंभास राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई शहर पालकमंत्री दीपक केसरकर, आमदार मनीषा कायंदे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, महाराष्ट्र राज्य चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.अविनाश ढाकणे आणि सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे आदींची उपस्थिती होती.

यावेळी मुख्यमंत्री श्री शिंदे, म्हणाले की, अष्टपैलू, हा शब्द ज्याला खऱ्या अर्थाने ज्यांना लागू होतो ते नाव म्हणजे अशोक सराफ आहे. सलग ५० वर्षे असंख्य भूमिका करुनही ज्यांच्यात अभिनयाची आणि नवं काही तरी करून दाखविण्याची त्यांची भूक अजूनही कायम आहे.

अशोक सराफ हे वयाचा अमृत महोत्सव साजरा करत असताना राज्य सरकारचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार त्यांना देण्यात येतोय, हा अवघ्या महाराष्ट्रासाठी केवळ अभिमानाचाच नाही तर अमृताहूनही गोड क्षण असल्याचे त्यांनी सांगितले.

गेल्या वर्षी ज्येष्ठ गायिका आशाताई भोसले आणि ज्येष्ठ निरुपणकार तिर्थरूप नानासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरवण्याची संधी मला मिळाली. यावर्षी अशोक सराफ यांचा आपण गौरव करत आहोत. त्यांनी त्यांच्या अभिनयाने मराठी रसिकांवर राज्य केले. प्रसिद्धीचे इतके वलय मिळूनही सराफ यांनी कधीही जमीनीशी नातं तोडलं नाही, असे त्यांनी सांगितले. मराठी रसिकांनीही त्यांच्या अभिनयावर भरभरुन प्रेम केले. त्यांच्याप्रमाणेच सुरेश वाडकर यांनी अत्यंत कष्टपूर्वक आपली सांगितीक कारकीर्द उभी केली.

**अशोक सराफ हे मराठी चित्रपटाचा चेहरा : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

आजचा दिवस सगळ्यांसाठी आनंदाचा दिवस आहे . चित्रपट पुरस्कारांचा बॅकलॉग भरून काढला . आज आपले कलाविश्व समृध्द करणारे अनेक मोठे कलावंत येथे आहेत . चित्रपट सृष्टीला आणि आपल्या जीवनाला समृध्द करणारी ही मंडळी आहेत . अशोक सराफ यावर्षी ७५ वर्षाचे झालेत . त्यांच्या अमृत महोत्सवात आपण त्यांना महाराष्ट्र भूषण देत आहोत . मराठी चित्रपटाचा चेहरा हे अशोक सराफ आहेत, अशी भावना उपमुख्यमंत्री श्री . फडणवीस यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केली .

ते म्हणाले की, मराठी, हिंदी चित्रपट सृष्टी, नाटक यामध्ये सर्व पद्धतीच्या भूमिका अशोक सराफ यांनी साकारल्या . त्यांनी साकारलेला नायक हा स्वप्नातील नव्हे तर खऱ्याखुऱ्या जीवनातील नायक वाटायचे . त्यांचे चित्रपट पाहून आम्ही मोठे झालो . याशिवाय, सुरेश वाडकर यांनी गेल्या कित्येक वर्षे त्यांच्या सुरेल आवाजाने रसिकांचे मनोरंजन केले . ज्या लोकांनी आपले जीवन आनंदमय केले, त्यांना पुरस्कार देण्याची संधी आपल्याला मिळाली, अशी भावनाही यांनी यावेळी व्यक्त केली .

**महाराष्ट्राची भूमी ही कलाकारांची खाण : मंत्री सुधीर मुनगंटीवार**

सांस्कृतिक कार्य मंत्री श्री . मुनगंटीवार म्हणाले की, महाराष्ट्र हे जसे आर्थिक शक्तिकेंद्र आहे तसे ते सांस्कृतिक शक्तिकेंद्र आहे . महाराष्ट्राची भूमी ही आता कलाकारांची खाण झाली आहे . या कलावंतांचा सन्मान करताना सांस्कृतिक कार्य विभाग सोनेरी झाला असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली .

**रसिक प्रेक्षकांचे प्रेम कायम हृदयात राहील : अशोक सराफ**

महाराष्ट्रातील एक क्रमांकाचा पुरस्कार तुम्ही मला दिलात, याचा खरोकर आनंद आहे . माझ्या जन्मभूमी आणि कर्मभूमी ने माझा गौरव केला . महाराष्ट्र भूषण मिळणाऱ्यांची यादी भाली मोठी . त्यात मला स्थान दिले ही माझ्यासाठी भाग्याची गोष्ट आहे . पन्नास वर्षात प्रवासात ज्यांनी मला कळत नकळत का होईना त्यांनी मदत केली आहे, ही सगळी त्यांची किमया आहे . सर्वात महत्वाचे म्हणजे रसिक प्रेक्षक . जे आवडले तर डोक्यावर घेतात . रसिकांना आवडलं पाहिजे हाच दृष्टीकोन ठेवला . रसिकांनी प्रेम दिले . ते उपकार मी कधीच फेडू शकणार नाही . माझ्या हृदयात हे प्रेम कायम राहील, अशी भावना यावेळी अशोक सराफ यांनी व्यक्त केली .

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर